आपले काम—आपले जीवनसर्वस्व

तरुण भारती

आपले काम – आपले जीवनसर्वस्व

स. आ. सप्रे

नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः ।
शरीरयात्राऽपि च ते न प्रसिध्येदकर्मणः ।।

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

प्रथम संस्करण 1980 (शके 1902)
चौथे पुनर्मुद्रण 1992 (शके 1914)
© स.आ. सप्रे, 1980
रुपये 13·50
In Praise of Work (*Marathi*)
संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क,
नवी दिल्ली-110 016 द्वारा प्रकाशित.

सतत काम करीत राहिले तरच मनुष्याचा विकास शक्य आहे. काम हाच माणसाचा मित्र आहे, शिक्षक आहे आणि त्राता आहे. कामामुळे माणसाचे नीतिधैर्य टिकून राहते. माणूस आत्मनाश टाळू शकतो. प्रत्येक क्षेत्रातील शिस्तबद्ध काम हाच आधुनिक संस्कृतीचा पाया आहे. सर्वांनी निष्ठापूर्वक काम करीत राहिले तरच आपली गरिबी नाहीशी होईल. हेच तत्त्व लेखकाने प्रस्तुत ग्रंथात विशद केलेले आहे.

श्री. स. आ. सप्रे हे महाराष्ट्र राज्य शासकीय मुद्रण व लेखनसामग्री विभागाचे संचालक म्हणून नुकतेच निवृत्त झाले आहेत. आता त्यांनी 'इन्स्टिटच्यूट फॉर दि स्टडी ऑफ लेबर' ही संस्था स्थापन केली आहे. प्रशासन व मुद्रणकला या विषयावर लेखकाने इतरही लिखाण केलेले आहे.

प्रस्तावना

नेपल्समध्ये सहलीस गेलेल्या एका श्रीमंत प्रवाशाने तेथील सर्वांत आळशी भिकाऱ्यास काही बक्षीस देण्याचे ठरविले. त्याला बारा भिकारी उन्हामध्ये स्वच्छंदपणे लोळत पडलेले दिसले. तेव्हा त्याने त्यातल्या सर्वांत आळशी भिकाऱ्यास आपण एक लिरा देणार असल्याचे जाहीर केले. त्याबरोबर अकरा भिकारी तात्काळ उठून त्याच्यासमोर उभे राहिले. तेव्हा त्याने तो लिरा बाराव्या भिकाऱ्यास दिला. ही मनोरंजक कथा सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ बर्ट्रांड रसेल यांनी आपल्या 'इन प्रेज ऑफ आयडलनेस' या पुस्तकात सांगितली आहे.

बर्ट्रांड रसेल यांनी वरवर जरी आळशीपणाची स्तुती केली असली तरी ते स्वत: मात्र अविश्रांत उद्योगात निमग्न असत. ते सुटीमध्ये उन्हाळ्यात पायी दूरदूरच्या सहली काढीत. परंतु या सहलींमध्येही ते एकसारखी आपल्या मित्रां-बरोबर तत्त्वज्ञानाचीच चर्चा करीत. निसर्गसौंदर्य पाहावे आणि हलक्या फुलक्या गोष्टीत मन रमवावे हे त्यांना पसंत नव्हते. त्यांच्या प्रचंड उद्योगप्रियतेचे एक उदाहरण म्हणून 'दि प्रिन्सिपिआ मॅथेमॅटिका' ह्या ग्रंथाचा उल्लेख करता येईल. अव्याहत दहा वर्षे या प्रचंड गहन ग्रंथाचे लिखाण चालू होते. ॲरिस्टॉटलनंतर

तर्कशास्त्रावरचा हा सर्वांत महत्त्वाचा ग्रंथ समजला जातो. ह्या विलक्षण परिश्रमामुळे आपले व्यक्तिमत्त्वच बदलले असावे असे उद्गार त्यांनी काढले आहेत. परंतु आयुष्याच्या अखेरीपर्यंत त्यांचे काम असेच जोमाने चालू होते. वयाच्या नव्वदाव्या वर्षी दररोज ते बारा तासांहून अधिक काम करीत असत. शहाणा माणूस आपण कामात निमग्न असतानाच आपल्याला मृत्यू यावा अशी इच्छा करतो असे अर्थपूर्ण उद्गार त्यांनी काढले आहेत.

परंतु आज मात्र कामाकडे लोक तुच्छतेने पाहतात आणि लोक कामापासून दूरदूर जात आहेत असे दृश्य दिसते. जवळजवळ सर्व लोक वैफल्याने ग्रासलेले दिसतात आणि ते योग्यच आहे असे म्हणण्याचीही फॅशन निघाली आहे. जवळ-जवळ प्रत्येकाला असे वाटते की आपल्या कामाचा योग्य तो मोबदला आपणांला मिळत नाही. आपले काम कंटाळवाणे आहे आणि त्यात काहीही रस नाही अशी तक्रार असंख्य लोक करतात. याच्या उलट काहींची अशी तक्रार आहे की आपल्या कामाचे कोणीच गुणग्रहण करीत नाही. 'कमी काम व अधिक आराम' या तत्त्वाचा पुरस्कार करणारेही अनेक पंडित आहेत. आधुनिक जगातील कामाचा साचेबंदपणा व त्याचे नीरस स्वरूप याबाबत असंख्य पुस्तके उपलब्ध आहेत. अर्थात कामामध्ये विविधता असणे इष्ट आहे. काम करणाऱ्याला त्यामध्ये आनंद व अभिमान वाटावा अशी त्याची शक्यतो पुनर्रचना करण्याची खरोखरच जरुरी आहे. खरीखुरी गाऱ्हाणी शक्यतो लवकर मिटविली पाहिजेत. परंतु माणसाचे संपूर्ण समाधान असे कधी होतच नाही आणि काही प्रमाणात गाऱ्हाणी ही राहणारच. त्याचबरोबर निरुद्योगीपणातून निर्माण होणारा कंटाळा किंवा उपासमार यापेक्षा साचेबंद काम अनेक पटींनी बरे. भरपूर काम केल्यानंतरच विसाव्याचा आनंद लुटता येतो. व्होल्टेअर या फ्रेंच कादंबरीकाराने आपल्या 'कॉंदिद्' या चिरंतन कादंबरीत काढलेले दूरदर्शी उद्गार अविस्मरणीय आहेत. "कंटाळा हे मानवी जीवनातील सर्वांत मोठे अरिष्ट होय. आणि कामामुळेच माणूस कंटाळा, दारिद्र्य आणि दुर्गुण या तीन मोठ्या अरिष्टांपासून स्वतःचे रक्षण करू शकतो."

ह्या पुस्तिकेचा उद्देश अगदी सोप्या रीतीने असा सांगता येईल, "काम हाच माणसाचा मित्र आहे, शिक्षक आहे आणि त्राता आहे. कामामुळे माणसाचे नीतिधैर्य टिकून राहते. माणूस आत्मनाश टाळू शकतो. प्रत्येक क्षेत्रातील

शिस्तबद्ध काम हाच आधुनिक संस्कृतीचा पाया आहे. आर्थिक विकासाची ही गुरुकिल्ली आहे. सर्वांनी निष्ठापूर्वक काम केले तरच आपली गरिबी नाहीशी होईल. कामामुळे माणसाचे व्यक्तिमत्त्व, त्याचा समाज, त्याची संस्कृती यांचे संवर्धन होते."

माणूस आपल्या कामातून आपला समाज निर्माण करतो आणि या समाजामुळेच परत त्याचे व्यक्तिमत्त्व घडविले जाते. विविध तऱ्हेच्या उपभोगांची लयलूट करून खरी मनःशांती लाभत नाही तर आपल्या कामात सदैव निमग्न असणारी व्यक्तीच खरीखुरी सुखी असते.

या प्रश्नाचा तत्त्वज्ञानात्मक, मानसशास्त्रीय वा समाजशास्त्रीय सखोल तात्त्विक विचार करणे हा या पुस्तिकेचा उद्देश नाही. सर्वसामान्य माणसाने आपल्या कामाकडे प्रेमाने का पाहावे व त्याचा आदर का राखावा हे समजावून सांगणे हा या पुस्तिकेचा साधासुधा उद्देश आहे. या पुस्तिकेचा सिद्धांत एका वाक्यात सांगता येईल : काम म्हणजे आपल्या आयुष्याचा एक भाग नसून ते आपले जीवनसर्वस्व आहे.

❑ ❑

बौद्ध धर्मीयांच्या मते कामामुळे कमीत कमी तीन गोष्टी साधता येतात. माणसाला आपल्या अंगी असलेल्या गुणांचा उपयोग व वाढ करण्याची संधी मिळते; अहंभाव सोडून इतर लोकांच्या बरोबर सहकार्याने कार्य करता येते आणि चांगले जीवन जगण्याकरिता आवश्यक अशा वस्तू व सेवा निर्माण करता येतात. या दृष्टिकोनाचे परिणामही अपार आहेत. कामगारास आपले काम अर्थशून्य, नीरस, कंटाळवाणे वाटून त्यापासून त्याला वेड लागेल वा मनस्ताप होईल अशा रीतीने त्याची योजना करणे हा जवळजवळ एक गुन्हाच आहे. त्यातून माणसापेक्षा वस्तूबद्दल अधिक आस्था दिसून येते. त्यात माणुसकीचा अभाव दिसून येतो आणि जीवनातील सर्वात प्राथमिक स्वरूपाच्या गोष्टींसाठी माणसाचा आत्मविनाश व्हावा इतकी ओढ दिसून येते. कामाऐवजी विश्रांतीचा विचार करणे हेही जीवनाबद्दलच्या एका मूलभूत सत्याबद्दल संपूर्ण अज्ञान दाखविण्यासारखे आहे. हे सत्य म्हणजे काम व विश्रांती हे जीवनाचे परस्पर पूरक घटक असून त्यांची फारकत केल्यास कामामधून मिळणारा आनंद नाहीसा होईल आणि विश्रांतीचे सुखही लाभणार नाही.

स्मॉल इज ब्यूटिफुल—ई. एफ्. शूमाकर

सुखा आंग देऊं नये । प्रेत्नें पुरुषें सांडूं नये ।
कष्ट करितां त्रासों नये । निरंतर ।।

व्यापकपण सांडूं नये । पराधेन होऊं नये ।
आपलें वोझें घालूं नये । कोणी येकासी ।।

—श्रीसमर्थ रामदास

एक

कामाचे विश्व

कामाचे विश्व हे चमत्कारिक खरेच, पण तितकेच ते मनोवेधक आहे. ह्या विश्वाचा एक विशेष म्हणजे तेथे आपल्याला सदैव असमाधान, अशांतता नांदत असल्याचे आढळेल. तसेच तेथे नित्य उलथापालथी चालू असतात आणि तरीही या विश्वातच माणूस आपली कर्तबगारी दाखवितो आणि खराखुरा सुखी होतो. या विश्वाचा औद्योगिक क्षेत्रात मोडणारा भाग तर विशेष ज्वालाग्राही असतो आणि अस्थिरता हा तर त्याचा जणू स्थायीभावच आहे. याची काही उदाहरणे देता येतील. दुर्गापूर पोलाद कारखान्यात काम करणाऱ्या एका सामान्य कामगाराने त्याच्या अधिकाऱ्याने सांगितल्याप्रमाणे पहार आणण्याचे नाकारले व शेवटी त्याचे पर्यवसान मोठ्या संपात झाले. हे त्या कामगाराचे नेहमीचेच ठरवून दिलेले काम होते. १९२६ साली इंग्लंडमध्ये जो मोठा सार्वत्रिक संप झाला त्याची सुरुवातही एका अनपेक्षित घटनेतून झाली. 'डेली मेल' वर्तमानपत्र ज्या मुद्रणालयात छापले जात होते तेथील छपाई यंत्रावर काम करणाऱ्या कामगारांनी 'राजाकरिता आणि देशाकरिता' या मथळ्याचा अग्रलेख छापण्याचे नाकारले. त्यांच्या मते तो अग्रलेख जागकाच्या होता. १९७२ मध्ये अमेरिकेतील

जनरल मोटरच्या कारखान्यातील कामगारांनीही संप पुकारला. परंतु त्याची कारणे अगदी निराळी होती. त्यांची मागणी अधिक पगाराची नव्हती. त्यांना पाहिजे होते चांगले अर्थपूर्ण काम. आपले नोकरीतील जीवन उच्च प्रतीचे असावे ही त्यांची मागणी होती. या कामाच्या वर्णपटाच्या दुसऱ्या टोकाला विलक्षण अशा गोष्टी साध्य झालेल्या आढळतात. जपानमध्ये १९५३ ते १९६१ या कालावधीत औद्योगिक उत्पादन २१७ पटींनी वाढले, हे आश्चर्यकारक होय. युनायटेड स्टेट्समध्ये १९६५ ते १९७० या कालावधीत दर घटकी उत्पादनाचा खर्च बावीस टक्क्यांनी वाढला. याच्या उलट जपानमध्ये ही वाढ फक्त तीन टक्केच झाली यावर विश्वासच बसत नाही. आता तर संपत्तीच्या आणि चांगल्या कामाच्या शोधार्थ लोक जगाच्या एका टोकाहून दुसऱ्या टोकास जात आहेत. उदाहरणार्थ, पश्चिम जर्मनीमध्ये खुद्द कोरियामध्ये नाहीत इतक्या कोरियातील परिचारिका आहेत. तुर्कस्तानच्या ग्रामीण भागात आता सुदृढ पुरुषच उरले नाहीत. साठ लाख परदेशी कामगार युरोपमधील सामुदायिक बाजारपेठेच्या प्रदेशात काम करीत आहेत. तसेच स्वित्झर्लंडमध्येही दहा लाख परदेशी कामगार आहेत.

अमेरिका हा सर्व राष्ट्रांमधील संपन्न असा देश खरा. परंतु त्याचे खास वैशिष्ट्य असे की बेकार तरुणांचे प्रमाण सर्व जगात तेथेच सर्वांत जास्त आहे. भारतातील बेकारीचा प्रश्न तर आता पराकोटीला पोहोचलेला आहे. भारतामध्ये सेवायोजन कार्यालयांमध्ये नोंद केलेल्या बेकार लोकांची संख्या चार कोटींहून अधिक आहे. त्याखेरीज भरपूर काम नसणारे किंवा अंशकालिक काम करणारे लक्षावधी लोक आहेत. कामामधून माणसामाणसाचे जे संबंध निर्माण होतात, त्यातून आधुनिक जगाची निर्मिती होते. माणसाच्या जीवनात त्याच्या कामाला मध्यवर्ती स्थान आहे. बेकार माणसास कोणत्याच समाजात कोणतेच स्थान असत नाही. तो अगदी एकाकी असतो. त्यामुळे त्याची दारुण निराशा होते. एका बेकार कामगाराने आपली व्यथा पुढील शब्दांत व्यक्त केली आहे: "मी आतून जणू काय जळतो आहे. आणि असे वाटते की मला कोणी तरी चाटीत आहे. माझ्या घरातील स्वास्थ्य आणि मुलांवरचा माझा अधिकार माझ्या नोकरीवर अवलंबून आहे हे कधी मला कळलेच नाही." आपले आयुष्यच सर्वथा कामावर अवलंबून आहे.

काम हे बहुसंख्य लोकांचे उदरनिर्वाहाचे साधन आहे. परंतु कामाचा वर्णपट बहुरंगी आहे. त्याला अनंत छटा आणि रंग आहेत. माणसाच्या गरजा आणि त्याच्या भावना यांच्यामध्ये फार वैचित्र्य आहे. या गरजा पुरविणारी आणि भावनांचे जास्तीत जास्त समाधान करणारी एकमेव कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे काम होय. म्हणून माणूस फक्त पैशाकरिता काम करतो असे म्हणणे योग्य नाही. अगदी आदिम समाजामध्येदेखील लोकांना उपभोग्य वस्तू महत्त्वाच्या वाटतात याचे कारण म्हणजे, या गोष्टींमुळे समाजात मानसन्मान, आदर आणि सत्ता प्राप्त होते.

मॅलिनोवस्की या थोर मानवशास्त्रज्ञाने असे दाखवून दिले आहे की ट्रोब्रिअँड बेटावरचे लोक आपल्या उदरनिर्वाहाकरिता आवश्यक आहे त्यापेक्षा पुष्कळच अधिक धनधान्य निर्माण करतात. बागकाम हे त्यांच्यासाठी केवळ उदरनिर्वाहाचे साधन नाही. त्यापासून त्यांना आनंदही मिळतो. तो म्हणतो :

"बागकामाचाच विचार केला तर या बेटावरील मूळचे लोक, त्यांना प्रत्यक्षात आवश्यक असलेल्या धनधान्यापेक्षा पुष्कळच अधिक पिकवितात. आपल्याला खाण्याकरिता लागणाऱ्या अन्नधान्याच्या दुप्पट पीक ते सरासरीने काढतात आणि विशेष म्हणजे इतके धान्य पिकविण्याकरिता आवश्यक आहे त्यापेक्षा पुष्कळच अधिक परिश्रम ते करतात. आपली बाग सुंदर दिसावी म्हणून ते आपला बराच वेळ खर्च करतात आणि मेहनत घेतात. आपली बाग स्वच्छ व नीटनेटकी असावी म्हणून ते दक्ष असतात आणि सर्व दगडमाती, पालापाचोळा वगैरे काढून टाकतात. आपल्या जादूच्या समारंभाकरिता आणि आपल्या जनजातीच्या पद्धतीनुसार आपल्या बागेची केवळ शोभा वाढविण्यासाठी ते हे सर्व करतात. याप्रमाणे जमीन अगदी स्वच्छ केल्यानंतर ती लागवडीकरिता तयार झाल्यावर हे लोक आपल्या जमिनीचे लहान लहान चौरस भाग पाडतात. त्यांची लांबी रुंदी फक्त काही यार्ड असते. हे सर्व पूर्वप्रथेनुसार आपली बाग सुंदर दिसावी म्हणून करण्यात येते."

प्राण्यांनाही आपल्या अन्नाकरिता व निवाऱ्याकरिता काही काम करावे लागते. उदाहरणार्थ, अत्यंत शिस्तबद्ध कामाबद्दल मुंग्यांची ख्याती आहे. मुंग्यांच्या वसाहतीत वांझ मुंग्यांच्या समूहाकडे वारुळे बांधण्याचे व अन्न गोळा करण्याचे काम असते. त्याचप्रमाणे मधमाश्या फार सुव्यवस्थितपणे काम करतात. परंतु

माणसाचे काम प्राण्यांच्या कामापेक्षा अनंत पटींनी संपन्न असते. मार्क्स म्हणतो, "अगदी अकार्यक्षम अशा वास्तुशास्त्रज्ञाचे काम उत्कृष्ट अशा मधमाश्यांच्या कामाशी तुलना करता, अगदी निराळे असल्याचे स्पष्ट होते. कारण वास्तुशास्त्रज्ञ आपले वास्तुशिल्प प्रत्यक्षात उभे करण्यापूर्वी त्याचा आराखडा आपल्या कल्पनाशक्तीच्या साहाय्याने मनात उभा करतो."

मॅस्लॉ या मानवतावादी मानसशास्त्राच्या जनकाने असे म्हटले आहे की व्यक्तीचा चांगला विकास झाला म्हणजे काम हे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे एक अविभाज्य अंग होते. अशा लोकांचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या कामातूनच कळू शकते. आयुष्यभर मॅस्लॉने मनोविकृतींचा विचार केला. अखेरीस त्याने मानसोपचार पद्धतीने माणसाला सुधारता येते ही कल्पना सोडून दिली. माणूस सतत सौख्याच्या शोधात असतो. परंतु सुख हे काही प्रत्यक्ष मिळविता येत नाही. ते एक सुव्यवस्थित, सातत्याने केलेल्या अर्थपूर्ण कामाचे उपफलित आहे. मॅस्लॉने या बाबतीत शेवटी जो अभिप्राय व्यक्त केला तो अगदी साधाच पण विलक्षण अर्थपूर्ण आहे. तो म्हणतो, " आपल्या नशिबी जे काम आहे किंवा आपल्या वाट्याला जे काम आले आहे किंवा जे महत्त्वाचे काम करणे अगत्याचे आहे ते अगदी सर्व शक्ती पणाला लावून करणे यातूनच माणसाला मोक्षप्राप्ती होते."

कामामुळे अनेक सूक्ष्म मार्गांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचे परिपोषण होते व ते अधिक संपन्न होते याची बहुधा आपल्याला पूर्ण कल्पना नसते. आपल्या जीवनाला कामामुळेच अर्थ प्राप्त होतो आणि आपण सुखी होतो. लोक जेव्हा आपल्या कामावर उत्कटतेने प्रेम करतात तेव्हाच उच्च दर्जाची संस्कृती निर्माण होते. ह्या अत्यंत साध्या परंतु अत्यंत अर्थपूर्ण सिद्धांताचे मनोवेधक पद्धतीने विवेचन करण्याचा प्रयत्न या पुस्तिकेत केला आहे.

□ □

दोन

कामामुळे तीन मोठ्या अरिष्टांचे निवारण होते : कंटाळा, दुर्गुण आणि दारिद्र्य

व्होल्टेअर हा फ्रेंच साहित्यिक म्हणजे एक चमत्कारच होय. असा विनोदी लेखक बहुधा आजपर्यंत झाला नाही. 'काँदिद्' ही त्याची कादंबरी त्याच्या सर्व कादंबऱ्यांमध्ये अधिक विनोदी समजली जाते. या कादंबरीमध्ये मानवी जीवनाचा सखोल विचार केलेला आहे. माणसाच्या जीवनात इतक्या अमंगल गोष्टी का हा तिचा विषय आहे. एका टीकाकाराने या कादंबरीचे यथार्थ वर्णन केले आहे. तो म्हणतो, " काँदिद्बद्दल विचार करावा तेवढा थोडाच. परत परत वाचली पाहिजे अशी ही कादंबरी आहे. रूक्ष विश्लेषणाने तिचे मर्म कळू शकत नाही. ही कादंबरी व्होल्टेअरच्या आपल्या सर्जनशीलतेवरील प्रभुत्वाची साक्ष देते. कादंबरीच्या विषयाला संपूर्णत: अनुरूप अशी व्होल्टेअरची शैली आहे. ही एक परिपूर्ण अशी कलाकृती आहे." तिचे कथानक अगदी थोडक्यात पुढे दिले आहे :

काँदिद् हा मनमिळाऊ आणि गोड स्वभावाचा तरुण वेस्टफालिया या परगण्यात एका सरदाराकडे आश्रित म्हणून राहात असतो. सरदारकन्या कुंनिगोंडे हिच्यावर त्याचे नितांत प्रेम असते. ह्या सतरा वर्षांच्या सतेज लावण्यवतीचा वर्ण ताज्या गुलाबाप्रमाणे मोहक असतो. कोणीही भुलावे असे तिचे रूप असते. एके

दिवशी रात्रीच्या भोजनानंतर भोजनगृहातून बाहेर पडताना कुनिगोंडे ही आपला हातरुमाल खाली टाकते. तो काँदिद् अलगद उचलतो. तेव्हा ती अगदी निरागसपणे त्याचा हात आपल्या हातात घेते. तितक्याच निरागसपणे तो तिचे अगदी उत्कटतेने व सहजसुंदरपणे चुंबन घेतो. त्यांचे अधरमीलन होते, डोळे लकाकतात आणि गुडघे थरथरू लागतात. . .परंतु हे सर्व काही पाहिल्यामुळे सरदाराचा संताप अनावर होतो व तो काँदिद्च्या पार्श्वभागावर लाथ मारून त्याला घरातून हाकलून लावतो. या अनुचित वर्तनाबद्दल कुनिगोंडेची आई तिचे कान चांगलेच पिरगाळते.

'काँदिद्' कादंबरीची कथा म्हणजे नायक काँदिद्च्या नशिबी आलेल्या चित्रविचित्र अनुभवांचे हृदयस्पर्शी वर्णन होय. काँदिद्च्या जीवनात एका मागोमाग झपाट्याने झालेल्या अनर्थकारक घटनांची ही हकिगत आहे. या कथेतील पात्रांना फाशी दिले जाते, भोसकण्यात येते, जाळण्यात येते, त्यांना फटके मारण्यात येतात, त्यांच्या अवयवांची छाटाछाट करण्यात येते, त्यांच्यावर जबरी संभोग करण्यात येतो, बलात्कार करण्यात येतो, ठार मारण्यात येते. त्याचबरोबर काहींना ताबडतोब व्याधिमुक्तही करण्यात येते. लिस्बन येथील धरणीकंप काँदिद् पाहातो. पॅरॉग्वे येथील जेसुइट राज्यास तो भेट देतो. एका निग्रो गुलामास मालकाने फार मारहाण केलेली असते. त्याच्याबरोबर तो सहानुभूतीने बोलतो. त्याचबरोबर या कथानकाला काही चांगली आनंददायक बाजूही आहे. काँदिद् एलडोरॅडो नामक एका काल्पनिक देशासही भेट देतो. तेथील इमारती गगनचुंबी असतात. सार्वजनिक चौकात निर्मळ पाण्याची, गुलाबपाण्याची, उसाच्या रसाची अशी विविध तऱ्हेची कारंजी सतत उडत असतात. एलडोरॅडोमध्ये तुरुंग नाहीत. तेथील 'शास्त्रांचा प्रासाद' पाहून तर काँदिद्ला विलक्षण आनंद होतो. या प्रासादातील दोन हजार फूट लांबीच्या गॅलरीमध्ये विविध तऱ्हेची गणिती आणि शास्त्रीय उपकरणे ठेवलेली असतात. परंतु या संपन्न, ऐश्वर्यशाली, सुंदर देशातही त्याचे मन रमत नाही. अंतर्यामी तो दु:खीच असतो कारण त्याची प्रियतमा त्याच्याजवळ नसते.

इकडे कुनिगोंडेपुढेही असेच दुर्दैव वाढून ठेवलेले असते. काँदिद्ची हकालपट्टी झाल्यानंतर लवकरच एके दिवशी रात्री ती झोपेत असताना परदेशीय सैनिक त्यांच्या वाड्यावर हल्ला करतात व तिच्या मातापित्यास ठार मारतात. एक

सहा फूट उंचीचा सैनिक तर तिच्यावर जबरी संभोग करण्याचा प्रयत्न करतो. ती त्याचा प्राणपणाने प्रतिकार करते. या झटापटीत तो नराधम तिच्या डाव्या मांडीवर जखम करतो. परंतु सुदैवाने त्या सैनिकाचा कप्तान तेवढ्यात तेथे येतो आणि तिची सुटका करतो. परंतु त्याची तिला भारी किंमत द्यावी लागते. त्याची रखेली म्हणून तिला काही काळ राहावे लागते. त्याचे कपडे धुणे व स्वयंपाक करणे ही कामे तिला करावी लागतात. परंतु तीन महिन्यांतच तो तिला कंटाळतो. तो कफल्लकही झालेला असतो व तो तिला बायकांचे वेड असलेल्या एका ज्यूला विकतो. परंतु या ज्यूलाही एकट्याला तिचा उपभोग घेणे शक्य होत नाही. त्यात त्याला प्रमुख धर्मन्यायाधीशाची भागीदारी स्वीकारावी लागते. सोमवार, बुधवार व सुटीच्या दिवशी ती ज्यूकडे असते तर इतर दिवशी ती धर्मन्याया-धीशाची असते. शनिवारी रात्री ती कोणाची याबद्दल क्वचित त्या दोघांमध्ये तंटाही होतो. अशा सुरस घटनांची मालिका या कादंबरीत आहे.

अशा अरिष्टांच्या आणि अनर्थांच्या फेऱ्यातून बाहेर पडल्यावर कौंदिद् व कुनिगोंडे यांचे पुनर्मीलन होते व ते कॉन्स्टन्टिनोपलजवळ एका लहान शेतावर स्थायिक होण्याचे ठरवितात. परंतु कौंदिद् मनातून खिन्नच असतो. त्याचा पुरता भ्रमनिरास झालेला असतो. कुनिगोंडेचे लावण्य लुप्त झालेले असते. ती विद्रूप दिसते, स्वभाव भांडखोर झालेला असतो आणि तिचे वागणे अगदी असह्य झालेले असते. तिच्याशी विवाहबद्ध होण्याची त्याला मुळीच इच्छा उरलेली नसते. परंतु तिच्या अत्याग्रहामुळे शेवटी तो विवाहबद्ध होतो.

एक प्रश्न कौंदिद्ला सतत अस्वस्थ करतो. " मानवी जीवनात इतके दुःख का, इतक्या अमंगल गोष्टी का? माणसे इतक्या वाईट रीतीने का वागतात, दुसऱ्यांवर जुलूम का करतात? ते इतक्या क्रूरपणे व निर्दयपणे का वागतात? माणूस कधी तरी खरोखर सुखी आणि सुसंस्कृत होऊ शकेल का?"

एक दिवस असे हे कंटाळवाणे आणि नीरस जीवन असह्य झाले असताना त्यांच्यापैकी एक म्हातारी म्हणते :

" मला हे कळत नाही की सर्वांत वाईट काय? निग्रो चाच्यांनी शंभर वेळा जबरी संभोग करणे, आपला एक नितंब कापून टाकला जाणे, परकीय सैनिकांच्या दुतर्फा रांगेतून जाताना त्यांचा मार खाणे, फटके खाणे, फाशी जाणे, अगदी तुकडे तुकडे केले जाणे किंवा आतापर्यंत ज्या आपत्तीतून आपण

गेलो त्या आपत्तीतून जाणे हे वाईट आहे की आत्यंतिक निरुद्योगीपणामुळे येणारा विलक्षण कंटाळा हा जास्त वाईट आहे?"

त्यांच्या शेताजवळ राहात असलेल्या तुर्कस्तानमधील सर्वश्रेष्ठ तत्त्ववेत्त्याचा त्यांनी याबाबत सल्ला घेण्याचे ठरविले. या शिष्टमंडळाचे नेतृत्व पॅंग्लॉस याने स्वीकारले.

"माणसासारखा चमत्कारिक प्राणी का निर्माण करण्यात आला आहे या प्रश्नाने आम्ही अगदी बेचैन झालो आहोत. आपण त्यावर आम्हांला काही मार्गदर्शन करावे अशी आमची इच्छा आहे." पॅंग्लॉसने त्या तत्त्ववेत्त्यास म्हटले.

तो मुसलमान साधू म्हणाला, "तुमचा या प्रश्नाशी काय संबंध आणि ही नसती चौकशी कशाला?"

"आदरणीय महाराज, या जगात खरोखर पुष्कळच अभद्र गोष्टी आहेत" कॉंदिद् अदबीने म्हणाला.

"मग त्यात आश्चर्य कसले? जेव्हा आपले महाराज इजिप्तला जहाज पाठवितात तेव्हा त्या बोटीवरचे उंदीर सुखी आहेत का याबद्दल ते काही काळजी करतात का?" तो साधू म्हणाला.

"मग काय करावयास पाहिजे?" पॅंग्लॉस म्हणतो.

"तुमचे तोंड बंद ठेवा" तो साधू म्हणतो.

त्यावर पॅंग्लॉस म्हणतो, "आमची अशी अपेक्षा होती की कारण व परिणाम यांचा संबंध, निरनिराळया संभाव्य जगांतील सर्वोत्कृष्ट जग, अभद्र गोष्टींचे मूळ, आत्म्याचे मूळ व जगाची पूर्वप्रस्थापित एकात्मता याबद्दल आपल्याबरोबर काही उपयुक्त चर्चा करता आली असती."

त्यावर तो साधू उठला आणि ते समोर असतानाच त्याने दरवाजा धाडकन बंद केला.

असली ही तात्त्विक चर्चा शुष्क आणि वायफळ असते, असे त्याला सुचवावयाचे असते.

ही चर्चा चालू असतानाच तेथील मंत्रिमंडळाचे दोन सदस्य व एक न्यायाधीश यांचा गळा दाबून खून केल्याचे वृत्त येते. पॅंग्लॉस या घटनेने अधिकच विचारमग्न होतो. आपल्या शेताकडे परत जात असताना आपल्या दरवाजात नारिंगाच्या

वृक्षांच्या सावलीत स्वच्छ हवा खात बसलेला एक निरोगी, सतेज आणि आनंदी वृद्ध शेतकरी त्याच्या दृष्टीस पडतो. पँग्लॉस त्याला विचारतो, "कोणत्या न्यायाधीशाचा गळा दाबून खून करण्यात आला?" तो शेतकरी म्हणतो, "मला काहीच कल्पना नाही. कॉन्स्टन्टिनोपलमध्ये काय घडते याची मी कधी फिकीर करीत नाही. फक्त माझ्या बागेतील फळे, फुले, भाजीपाला मी तेथे विक्रीला पाठवितो. आणि तेवढेच मला पुरे आहे."

तो शेतकरी काँदिद्, पँग्लॉस व मार्टिन यांना आपल्या घरी उपाहाराला बोलावितो. पूर्वी कधीही त्यांनी पाहिले नव्हते इतके तेथील उपाहाराचे पदार्थ अप्रतिम असतात. फराळानंतर शेतकऱ्याच्या दोन मुली पाहुण्यांच्या दाढीला अत्तर लावतात.

हा थाट पाहून काँदिद् त्या शेतकऱ्यास म्हणतो, "तुमची शेतीवाडी फार मोठी आणि सुपीक असली पाहिजे."

"छे हो, फक्त वीस एकर. माझ्या मुलांच्या मदतीने मी ती पिकवितो. एक मात्र खरे की आमच्या कामामुळे कंटाळा, दुर्गुण आणि दारिद्र्य या अमंगळ अरिष्टांपासून आमचे संरक्षण होते." तो शेतकरी सहज बोलून जातो.

परंतु हे अर्थपूर्ण उद्गार काँदिद्च्या विचारांना अधिकच चालना देतात. तो मार्टिन आणि पँग्लॉस यांच्याकडे वळून म्हणतो, "आपण आतापर्यंत सहा राजांचा पाहुणचार घेतला. परंतु हा शेतकरी त्यांच्यापेक्षा अधिक भाग्यवान दिसतो."

काँदिद् त्यावर म्हणतो, "मला वाटते की आपणही आपल्या बागेत जाऊन कामास प्रारंभ केला पाहिजे."

पँग्लॉस आपल्या नेहमीच्या तत्त्ववेत्त्याच्या थाटात म्हणतो, "अगदी बरोबर. ईश्वराने जेव्हा माणसाची निर्मिती केली तेव्हा त्याची हीच अपेक्षा होती की माणूस श्रम करून पृथ्वीची निगा राखील. यावरून हे स्पष्ट होते की माणसाचा जन्म केवळ खुशालचेंडूपणाकरिता नाही."

त्यावर मार्टिन म्हणतो, "चर्चेचा काथ्याकूट आपण थांबवून प्रत्यक्ष कामास सुरुवात केली तरच आयुष्य सुसह्य होईल."

हे शहाणपणाचे शब्द प्रत्येकाने आपल्या अंतःकरणावर कोरून ठेवावेत इतके मोलाचे आहेत. मार्टिन हा अत्यंत व्यवहारी असल्याने अशा चर्चा निरर्थक असतात याची त्याला जाणीव असते.

एरिक फ्रॉम या विख्यात मानसशास्त्रज्ञाने शरीरक्रियात्मक व मानसशास्त्र यांच्या संशोधनाच्या आधारे असे दाखवून दिले आहे की माणसाच्या विध्वंसक वृत्तीची मुळे त्याच्या कंटाळयात असतात. निरुद्योगीपणामुळे येणारा कंटाळा हीच माणसाला मिळणारी सर्वांत मोठी शिक्षा होय.

माणूस हा एखाद्या खोल घळीप्रमाणे आहे. या घळीमध्ये खोलवर तळात एक सैतान बसलेला आहे. माणसामध्ये मूलतः अनेक अनिष्ट प्रवृत्ती असतात आणि त्यामुळे त्याचा व समाजाचा विनाश होतो. या अनिष्ट प्रवृत्तींचे मूर्त स्वरूप म्हणजेच हा सैतान होय. कामामुळेच माणसाचे या अनिष्ट प्रवृत्तींपासून, या सैतानापासून संरक्षण होते. कामामुळेच माणसाला स्वातंत्र्य मिळते.

जॉर्ज ऑरवेल या विख्यात लेखकाने मोठे मार्मिक उद्गार काढले आहेत, " माणूस काही परिपूर्ण नाही. त्याला अधिक स्वातंत्र्य, पौष्टिक अन्न आणि चांगले काम दिले तर त्याच्यामध्ये पुष्कळच सुधारणा होईल."

□ □

तीन

काम ही एक खेळ किंवा विश्रांतीइतकीच नैसर्गिक गोष्ट आहे

लोकांना कामाचा तिटकारा असतो व काम शक्य तितके टाळण्याकडे त्यांची प्रवृत्ती असते असा एक दृढ समज आहे. लोक निसर्गतःच आळशी असतात असेही आवेशपूर्वक प्रतिपादन केले जाते. परंतु प्रत्येक व्यक्तीला आपण काही तरी काम करावे अशी इच्छा असते. त्याचे कारणही साधे आहे. मानवी देह ही एक सजीव यंत्रणा असून त्यामध्ये हवा, पाणी व अन्न यांचे रूपांतर वर्तनामध्ये होत असते. काम हा या वर्तनाचा सर्वांत महत्त्वाचा प्रकार होय. माणसाच्या शरीरात सतत निर्माण होत असलेल्या शारीरिक व मानसिक शक्तींना बाहेर पडण्यास काम हे एक द्वार आहे. तेव्हा काम केले नाही तर माणूस गुदमरतो. एका विख्यात लेखकाने म्हटले आहे, "तुम्ही मला विचारता की मी काम का करतो? त्याचे उत्तर अगदी सोपे आहे. कोंबडी ज्या कारणाकरिता अंडी घालते त्याच कारणाकरिता मी काम करतो." काम ही एक आनंददायक गोष्ट असून त्यामुळे आपला उत्साह अधिकच वाढतो. कामामुळे माणसाचे मन व शरीर प्रफुल्लित होतात.

माणसाचे मानसिक सामर्थ्य मोठे आहे. तो विचार करू शकतो. तो शिकू शकतो व ज्ञानाचा संचय करू शकतो. त्याला कल्पनाशक्ती आहे. आपल्या

लोकांची व समाजाची आपण काही सेवा करावी अशी त्याला ओढ असते. स्वत:ला समजून घेण्याची त्याला जिज्ञासा असते. बाह्य जगातील लोकांबरोबर चालण्याबोलण्याची त्याला ओढ असते. आपण काही तरी नवीन करावे अशी त्याला आकांक्षा असते. अशक्य ते शक्य करावे अशीही त्याला प्रेरणा असते. तू माऊंट एव्हरेस्ट चढण्याचा खटाटोप का करतोस असे विचारले असताना जॉर्ज मॅलरी या गिर्यारोहकाने सांगितले की, मग माऊंट एव्हरेस्ट आहे कशाला? कामामुळेच माणसाला आत्मज्ञान मिळू शकते, आत्माविष्कार आणि आत्मविकास यांची संधी मिळते. कॅनडामधील एका सुप्रसिद्ध प्रयोगाचा येथे निर्देश करणे योग्य होईल. मॉंट्रिअल या शहरातील सुमारे सहाशे प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांना एक दिवस अकस्मात असे सांगण्यात आले की त्यांनी वर्गात हजर राहिलेच पाहिजे असे नाही. तसेच यापुढे गैरवर्तनाबद्दल शिक्षा करावयाची झाल्यास त्यांना क्रीडांगणावर खेळण्याकरिता पाठविण्यात येईल. हे ऐकताच सर्व विद्यार्थी क्रीडांगणाकडे धावत सुटले. परंतु आश्चर्य म्हणजे दोनच दिवसांत ते सर्व विद्यार्थी वर्गात परत हजर झाले. हजेरीचे प्रमाण पूर्वपेक्षा किंचित कमी होते. परंतु अभ्यासात काहीच कमतरता नव्हती. उलट अभ्यासाचा दर्जा काही प्रमाणात सुधारलाच होता.

काम म्हणजे एक आरसाच आहे. त्यामध्ये आपल्याला आपले खरेखुरे रूप पाहता येते. एखादी व्यक्ती जेव्हा जोमाने काम करीत असते तेव्हा तिची शारीरिक आणि मानसिक परिस्थिती उत्तम असते हे उघड आहे. कामामधून कोणाही व्यक्तीचा इतिहास, तिचे शिक्षण, तिची सांस्कृतिक पार्श्वभूमी, तिच्या प्रेरणा व मूल्ये यांचे प्रत्यंतर येते. आपली प्रगती व आपला विकास यांचे मोजमाप करण्याची काम ही एक वस्तुनिष्ठ अशी फूटपट्टी आहे.

थोडक्यात आपण आपल्या प्रकृतीबद्दल व हिताबद्दल जेवढे दक्ष असतो तेवढेच आपण आपल्या कामाबद्दल दक्ष असणे आवश्यक आहे.

परंतु प्रत्यक्षात अनेकदा लोक आपल्या कामाबद्दल अनास्थाच दाखवितात याचे कारण काय? फर्दिनांद श्वाइग याने म्हटल्याप्रमाणे आपण ज्याला आळशीपणा म्हणतो ती एक वस्तुत: आजारीपण व तत्सम कारणामुळे आलेली कमजोरी असते. तसेच माणसाला काम करण्याची नैसर्गिक इच्छा असली तरी इतर अनेक गोष्टींप्रमाणे सवयीचा कामावर मोठा परिणाम होतो. अनेक वेळा

काम हे व्यक्तीला आवडेल असे असत नाही किंवा ते तिच्या कुवतीबाहेर असते. काम साचेबंद असले म्हणजे माणसाला त्यात काहीच स्वारस्य वाटत नाही. अनेकदा ज्या परिस्थितीत काम करावे लागते ती परिस्थिती काम करण्यास हुरूप येईल अशी नसते. काही कार्यालयांत वैयक्तिक पुढाकार घेण्यास संधीच नसते किंवा व्यक्तिमत्त्वाची मुस्कटदाबी होत असते. तसेच काही वेळा वेतन व पगार याबाबत उघडउघड अन्याय झालेला असतो. त्याचबरोबर कामगार संघटनांचे धोरण, धार्मिक समजुती यांसारख्या सामाजिक व सांस्कृतिक गोष्टींचा काम करण्याच्या प्रवृत्तीवर परिणाम होतो. हवामानाचाही काम करण्याच्या क्षमतेवर बराच परिणाम होतो. ई. हंटिंग्टन या अत्यंत विद्वान लेखकाने तर असा सिद्धांत मांडलेला आहे की आपल्या मनःप्रवृत्ती शेवटी भौगोलिक परिस्थितीवर अवलंबून असतात.

परंतु त्याचबरोबर आपण हे विचारात घेतले पाहिजे की माणूस हा स्वतंत्र असल्यामुळे काम करण्याच्या नैसर्गिक इच्छेच्या आड येणाऱ्या अडचणींवर तो मात करू शकतो. व्यक्तीमधील काम करण्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीचा विधायक कार्याकरिता उपयोग करणे हे सामाजिक संस्थांचे परमपवित्र कर्तव्य होय. आधुनिक जगात या काम करण्याच्या इच्छेचा हळूहळू ऱ्हास होत आहे असे आपल्याला आढळते. त्यामुळे व्यक्ती व समाज यांचा विनाशच होईल.

□ □

चार

विश्रांतीचे सौख्य कामामुळे लाभते

—मार्गरिट मीड

टेनिसन हा प्रख्यात कवी आपल्या 'लोटस ईटर्स' या कवितेत म्हणतो, "आयुष्याच्या अखेरीस मृत्यू हा ठरलेलाच आहे. मग आयुष्यभर उगाच काबाडकष्ट करण्यात काय अर्थ आहे?"

प्राचीन काळापासून अनेक लोकांनी असे विचार व्यक्त केले आहेत. आजही काही विख्यात विचारवंत विश्रांतीच्या पंथाचा हिरिरीने पुरस्कार करतात. त्यांचे असे म्हणणे आहे की माणसाला भरपूर मोकळा वेळ असेल तेव्हाच तो खराखुरा सुखी, दयाशील आणि सर्जनशील असू शकतो. या लोकांच्या मते काम हा एक शाप आहे. क्रीडेमध्येच माणूस स्वतंत्र असतो आणि नवनिर्मिती करू शकतो. कामाच्या धबडग्यापासून जेव्हा त्याची सुटका होते तेव्हाच तो आत्मविकास करू शकतो. कार्ल मार्क्सचा जावई पॉल लाफार्ग याने संतापून 'दि राईट टू बी लेझी' या आपल्या निबंधात पुढीलप्रमाणे आवेशपूर्ण उद्‌गार काढले आहेत: "हे आलस्यदेवते, तू कलांची आणि उदात्त सद्‌गुणांची माता आहेस. तू मानव जातीच्या सर्व वेदनांवरचे रामबाण औषध आहेस." परंतु कार्ल मार्क्सने याच्या अगदी विरुद्ध मत व्यक्त केले आहे. त्याच्या मते काम हे मानवी चैतन्याचे अर्थपूर्ण

व्यक्त स्वरूप आहे. काम हाच मानवी आनंदाचा सर्वांत मोठा झरा आहे. "माणूस जेव्हा उत्पादनाचे काम करतो तेव्हाच त्याच्या जीवनाला अर्थ प्राप्त होतो."

'इंडस्ट्रिअलायझेशन अँड इंडस्ट्रिअल मॅन' या सखोल आणि व्यापक ग्रंथाच्या विद्वान लेखकांनी असा अभिप्राय व्यक्त केला आहे की दिवसेंदिवस माणूस आणि त्याचे काम यांच्यामध्ये अधिकाधिक दुरावा निर्माण होईल आणि त्यामुळे माणूस आपल्या कामात वैफल्यग्रस्त होईल. परंतु त्याला अधिकाधिक सौख्य, समाधान आपल्या खेळांमध्ये लाभेल. यापुढील काळात लोकांना मिळावयाचे नवे स्वातंत्र्य फुरसतीच्या वेळातच मिळू शकेल. फुरसतीच्या वेळातच व्यक्तीचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व फुलून येईल.

परंतु हा मोठा भ्रम आहे. ही विश्रांतीची तरफदारी अनेक कारणांकरिता चुकीची आहे. मानवी जीवनात कामाचे महत्त्व सर्वांत अधिक आहे या गोष्टीकडे या विचारसरणीचे दुर्लक्ष झाले आहे. एखादी व्यक्ती कारखान्यात गुलाम असेल तर घरी ती स्वतंत्र असू शकत नाही. जो माणूस आपल्या कामामध्ये वैफल्याने ग्रासलेला व दु:खीकष्टी असतो तो फुरसतीच्या वेळी सुखी व आनंदी असणे शक्य नाही. फर्दिनांद झ्वाईग या लेखकाने हे फार सुरेखपणे सांगितले आहे: "माणसाचे व्यक्तिमत्त्व एकजिनसी असते. घरी त्याचे स्वरूप एक व कारखान्यात त्याचे स्वरूप निराळे अशी परिस्थिती असू शकत नाही. त्याच्या वैयक्तिक आयुष्यातील काळजी, वैफल्य व भीती यांचा परिणाम कामावर होतो आणि याच्या उलट कामाचा परिणाम त्याच्या गृहजीवनावर होतो."

डेव्हिड राईसमन या प्रख्यात विचारवंताचे एके काळी असे मत होते की फुरसतीच्या वेळेचा सदुपयोग करणे यातच जीवनाचा अर्थ सामावलेला आहे. आता मात्र त्याने आपले मत बदलले आहे. कारण त्याच्या हे लक्षात आले आहे की एका विवक्षित मर्यादेपेक्षा फुरसतीचा वेळ अधिक असेल तर त्यापासून आनंद होण्यापेक्षा विकृतीच निर्माण होते. फुरसतीचा वेळ अमर्यादित असेल तर त्यामुळे लोकांना अपायच होतो. जादा फुरसतीमुळे माणूस दुर्गुणी होतो आणि त्याचा स्वत:वर ताबा उरत नाही. फुरसतीच्या वेळात तो निरनिराळ्या मादक द्रव्यांचे सेवन करू लागतो. मद्यपानाची त्याला चटक लागते आणि तो जुगाराकडे वळतो. थोडक्यात म्हणजे माणुसकीचा ऱ्हास होतो. अशा रीतीने लोकांचा मानसिक आणि नैतिक अध:पात होतो.

प्रत्येकजणाने जर असा विचार केला की आपले दैनंदिन काम टाळता येईल तितके टाळावे किंवा ते निष्ठापूर्वक करण्याची जरुरी नाही, तर आपले आर्थिक व सामाजिक जीवन विस्कळीत झाल्याखेरीज राहणार नाही. आपल्या जीवनामध्ये केवळ अराजक माजेल. आपल्याला फुरसतीच्या वेळातून खरोखर आनंद मिळावयाचा असेल तर आधुनिक जगात ज्या सुखसोयी आहेत त्या सहज उपलब्ध झाल्या पाहिजेत. उदाहरणार्थ, जर दूधवाला सकाळी आला नाही, आगगाड्या वेळेवर चालू नसतील आणि पोस्टमन जर वेळेवर येत नसेल तर फुरसतीचा आनंद कसा लुटणार?

आणि याहूनही महत्त्वाची गोष्ट अशी की भरपूर थकवा येईल इतके काम असल्याखेरीज माणसाला खरोखर विश्रांतीचा आनंद मिळत नाही. बर्नार्ड कार्श या लेखकाने म्हटले आहे की काम हा काही आयुष्याचा एक भाग नसून काम म्हणजेच अक्षरश: आपले जीवन होय. कारण कामामुळे आपल्या जीवनाला अर्थ प्राप्त होतो. काम हाच आपल्या जीवनाचा पाया आहे आणि कामामुळे आपल्या सर्व उद्योगांना आकार येतो. कामामुळेच आपले जीवन सुव्यवस्थित व शिस्तबद्ध होते. कामामुळेच आपल्याला नवीन उत्साह येतो.

काम आणि फुरसत यांचे परस्पर संबंध अत्यंत गुंतागुंतीचे व मनोवेधक आहेत. आपण किती परिश्रमपूर्वक काम करतो यावर विश्रांतीचे सुख अवलंबून असते. काम जितके अधिक कष्टाचे तितक्या प्रमाणात विश्रांतीची लज्जत वाढते. बर्ट्रांड रसेल हा तत्त्ववेत्ता सुटीच्या दिवशी चाळीस मैल चालत असे. त्याने म्हटले आहे की इतके चालल्यानंतर केवळ स्वस्थ बसण्यामध्येच परमानंद मिळे. इतर कोणत्याही गोष्टीची त्याला जरुरी भासत नसे.

आपल्याला खरोखर फुरसतीच्या वेळेचा आनंद लुटावयाचा असेल तर त्याकरिता आपण परिश्रमपूर्वक काम केले पाहिजे. जो माणूस आपले दैनंदिन काम मग ते कितीही यांत्रिक आणि एकसाच्याचे असो, निष्ठापूर्वक आणि परिपूर्णपणे करतो त्याला फुरसतीच्या वेळेच्या खऱ्याखुऱ्या आनंदाचा मोठा लाभ होतो. त्याला रात्री सुखाने झोप येते. उलट आळशी माणसाला निद्रानाशाचा विकार होतो.

विटगेन्स्टाइन ह्या विसाव्या शतकातील महान तत्त्ववेत्त्यास त्याच्या व्याख्यानानंतर विलक्षण थकवा येई. व्याख्यान देत असताना तो देहभान

अगदी विसरून जाई. व्याख्यानाच्या वेळी त्याच्या मनावर मोठा ताण पडलेला असे. व्याख्यान संपल्यावरोबर नजीकच्या सिनेमागृहात जाऊन अगदी पहिल्याच रांगेत बसून पाव किंवा इतर खाद्य पदार्थ खात खात तो सिनेमा पाहात असे. सिनेमा कितीही कंटाळवाणा असला तरी तो त्यामध्ये अगदी गुंगून जाई. तो म्हणे, "मला सिनेमा पाहिल्यानंतर शॉवरखाली स्नान केल्याचा आनंद होतो!"

□ □

पाच

कामाचा वर्णपट

माणसाचे व्यक्तिमत्त्व हे बऱ्याच अंशी समाजाकडून घडविले जाते. त्याच्या प्रवृत्ती, भाषा, अपेक्षा, सवयी, संवेदना आणि मूल्ये यांवर त्याच्या सामाजिक परिस्थितीचा फार मोठा परिणाम होतो. आर्. डी. लेऽङ या विख्यात मानसशास्त्रज्ञाने हे फार उत्तम सांगितले आहे: "माणूस हा सामाजिक परिस्थितीतून निर्माण होतो. ही सामाजिक परिस्थिती जर लक्षात घेतली नाही तर माणूस आपल्याला कळणारच नाही. प्रत्येकाचे व्यक्तिमत्त्व लक्षात न घेता त्याच्याबरोबर आपण जर वागू लागलो तर आपलेच व्यक्तिमत्त्व लुप्त होते."

माणसावर होणाऱ्या सामाजिक परिणामाचा सर्वांत खोल ठसा कामाच्या क्षेत्रात उमटत असतो. माणसाचे काम ही एक खरीखुरी आणि मूर्त गोष्ट आहे. फ्राइडने म्हटल्याप्रमाणे कामामुळे निदान वास्तवतेच्या एका भागाचा, म्हणजे समाजाचा, माणसाला भरभक्कम आधार मिळतो. काम नसेल तर माणूस एकाकी पडतो. त्याला समाजात कोणतेही स्थान आणि प्रतिष्ठा राहात नाही. त्याच्या जीवनाला काहीच अर्थ वा उद्देश उरत नाही.

माणसाच्या व्यक्तिमत्त्वामध्ये आपल्याला समाजाने रूप दिसते. आपण या संदर्भात भाषेचा विचार करू. भाषा ही एक माणसाला मिळालेली अत्यंत मौल्यवान व अपूर्व अशी देणगी आहे. मंफर्ड या महापंडिताने, संस्कृतीचा ठेवा भाषेच्या सुरेख पात्रामध्ये ठेवलेला असतो असे उद्गार काढले आहेत. मानव-निर्मित सामाजिक गोष्टींमध्ये भाषा ही सर्वांत अत्यावश्यक अशी गोष्ट आहे. समाज नसेल तर भाषा असू शकत नाही आणि भाषेशिवाय संस्कृतीच असू शकत नाही आणि माणूस व जनावर यांमध्ये काहीच भेद राहणार नाही.

प्रत्येक व्यक्तीला मित्रांची व मित्रत्वाची चिरंतन ओढ असते. मित्रत्वाचा शोध ही एक शाश्वत आणि सर्वत्र आढळणारी गोष्ट आहे ही भावना माणसाच्या मनात खोलवर रुजलेली आहे. कामामुळे माणसाला मित्र मिळतात, मित्रांचे प्रेम मिळते. कारखान्यात किंवा कार्यालयात काम करणाऱ्या लोकांचे आपोआप छोटे छोटे गट तयार होतात आणि प्रत्येकजण या ना त्या गटाचा सदस्य असतो. अशा रीतीने काम ही एक सामाजिक क्रिया होते. प्रत्येकजण अशा रीतीने एका अनौपचारिक मित्रांच्या वर्तुळात काम करतो. कामगारांचा कामाकडे, आपल्या पर्यवेक्षकाकडे पाहण्याचा दृष्टिकोन या लहान लहान गटांतील वातावरणामुळे तयार होतो. फर्दिनांद झ्वाइग या ग्रंथकर्त्याने कामगार जीवनाचे फार सखोल निरीक्षण केले आहे. तो म्हणतो: "मित्रत्व हाच माणुसकीचा गाभा आहे. इतरांच्या बरोबर स्नेहाचे संबंध ठेवणे, त्यांच्या भावना जाणणे हेच माणुसकीचे लक्षण आहे." आपल्यावर इतरांनी प्रेम करावे आणि आपणही दुसऱ्यावर प्रेम करावे असे कोणाही कामगारास वाटते. त्याचबरोबर इतरांनी आपल्यास मदत करावी अशी जशी त्याची अपेक्षा असते तशीच त्याला इतरांना मदत करण्याचीही तळमळ असते. इतरांना मदत करताना त्याला फार आनंद होतो. चार्ल्स कूर्बेट या चित्रकाराच्या 'दि आल्म्सगिव्हिंग बेगर' या चित्राचे सुरेख उदाहरण झ्वाइग याने दिले आहे. या चित्रात एक अत्यंत वृद्ध व क्षीण भिकारी एका भिक्षूच्या पोरट्यास भिक्षा घालीत आहे. ह्या भिकाऱ्यास धड उभेही राहता येत नाही. परंतु भिक्षा घालताना त्याचा चेहरा आनंदाने फुलून गेलेला असतो. मनातल्या मनात तो म्हणतो, "मीही काही कमी नाही, मीही इतरांना मदत करू शकतो."

एखादी व्यक्ती निवृत्त झाल्यावर कामाच्या पद्धती, प्रक्रिया व आकडेवारी यांचा तिला लवकरच विसर पडतो. परंतु आपल्या परिचयात आलेली माणसे,

तेथील सामाजिक वातावरण आणि लोकांच्या बरोबर उडालेले खटके यांचा तिला विसर पडत नाही. एका निवृत्त कार्यकारी संचालकाने काढलेले उद्गार संस्मरणीय आहेत: "मला तुमचा वार्षिक अहवाल नको. विक्री वगैरे गोष्टींत मला आता काही स्वारस्य नाही. परंतु कार्यालयात सध्या चालणाऱ्या गप्पा, अफवांबद्दल मला उत्सुकता आहे. पूर्वी ज्या लोकांचा मला फार तिटकारा वाटे त्यांच्याशिवायही मला आता चुकल्याचुकल्यासारखे होते."

माणूस आणि त्याचे काम यांच्या संबंधांचे विविध पैलू दाखविणारी तीन घटनावृत्ते पुढे दिली आहेत:

(१) एक महिला चिटणीस

एका तरुण महिलेने सर्वेक्षणाचे काम करणाऱ्या संस्थेतील चांगल्या पगाराची नोकरी सोडून शस्त्रक्रिया करणाऱ्या एका रुग्णालयात चिटणीस म्हणून कमी पगाराची नोकरी पत्करली. या रुग्णालयात वेतन व इतर सेवाविषयक शर्ती निकृष्टच होत्या. परंतु तिला ही नवी नोकरी फार आवडते. त्याची तिने दिलेली कारणे विचार करण्यासारखी आहेत:

"मला लोकांना भेटावेसे वाटते. ते इथे शक्य होते."

"माझे हे काम आवश्यक आहे अशी माझी भावना आहे."

"एके दिवशी सकाळी एक स्त्री आपल्या सहा मुलांना घेऊन रुग्णालयात येते आणि मला आनंदाने अभिवादन करून मी तिला करीत असलेल्या साहाय्याबद्दल माझे आभार मानते . . . माझे मन फुलून जाते आणि म्हणून मला हे काम आवडते."

"मला येथे महत्त्व आहे, मला काही अधिकार आहेत हे या कामाचे एक प्रमुख आकर्षण आहे."

"आता मी चार वर्षे येथे काम करीत आहे. या चार वर्षांत मी कधीही उशिरा आले नाही. पूर्वी मात्र मी कधीही वेळेवर कामाला जात नसे."

"इमारतींच्या तौलनिक किमतीबद्दल मला कधीच रस नव्हता. आताचे माझे काम मला पुष्कळच आवडते. इमारतींच्या किमतीपेक्षा रुग्णांच्या प्रगतीबद्दल मला अधिक उत्सुकता वाटते."

यावरून हे स्पष्ट होते की कामातून मिळणारे समाधान अनेक गोष्टींवर अवलंबून आहे. वेतन हे कामाचे नेहमीच प्रमुख आकर्षण असते असे नाही.

(२) खाटीकखान्यातील सहा मुली

एका मोठ्या शहरात सहा मुली खाटीकखान्यात काम करीत होत्या. मारलेल्या डुकरांची आतडी व अंतर्भागातील इंद्रिये स्वच्छ करण्याचे अगदी घाणेरडे काम त्यांना करावे लागे. त्यांची कामाची जागाही अगदी उबग आणणारी होती. त्या ज्या तळघरात काम करीत ते तळघर अगदी थंडगार, दमट आणि गैरसोयीचे होते. तेथील जमीन नेहमी रक्ताने व आतड्यातील घाणीने माखलेली असे. तळघरात अगदी असह्य असा घाण वास येई. नवीन वैद्यकीय अधिकारी तर हे दृश्य पाहून हबकला. त्याने या मुलींना चांगले स्वच्छ काम इतरत्र देण्याचा आदेश दिला. व्यवस्थापकांनी या आदेशानुसार या मुलींची इतरत्र बदली करून त्यांना चांगले स्वच्छ काम दिले.

परंतु या मुलींनी याबाबत मोठी आरडाओरड केली. आपण उत्कृष्ट काम करीत असताना आपली बदली का केली याचे स्पष्टीकरण त्यांनी मागितले. त्यांनी आपला आवाज इतक्या जोराने उठविला की व्यवस्थापनाला त्यांची बदली रद्द करावी लागली.

या मुलींना इतरांना घाण वाटणारे काम फार प्रिय का होते याची विविध कारणे आहेत. पहिले आणि सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे त्या मुलींचे एक सुखी समाधानी मित्रमंडळ तयार झाले होते. त्यांच्यामध्ये जिव्हाळा निर्माण झाला होता. सर्व दिवसभर कामाबरोबरच सतत त्यांची टकळी चाललेली असे. त्या गाणी गात, गोष्टी सांगीत, गप्पा करीत, सिनेमा, फॅशन्स यांची चर्चा करीत. हे सामाजिक वातावरण इतके सुखद होते की त्या मुलींना सभोवारच्या घाणेरड्या गोष्टींचा विसर पडलेला होता. दुसरी गोष्ट म्हणजे आपले काम अत्यंत कौशल्याचे आहे असा त्यांना अभिमान वाटे. तिसरी गोष्ट म्हणजे त्यांचा पर्यवेक्षक अगदी आदर्श होता. त्यांच्यावर तो हुकमत गाजवीत नसे. या मुलींनी काही चांगले काम केले तर तो त्यांची वाजवी प्रशंसा करी. त्यांना काही अडचणी आल्या तर त्यांना तो मार्गदर्शन करी व साहाय्य करी. एका अर्थाने तो त्यांचा शिक्षक होता. त्या मुलींना त्याच्याबद्दल कौतुक व आदर वाटे.

(३) तीन गवंडी

एका देवालयाच्या बांधकामावर काम करणाऱ्या गवंड्यांना तुम्ही काय करीत आहात असा प्रश्न विचारण्यात आला तेव्हा पहिला गवंडी म्हणाला, "मी गरीब माणूस, पोटापाण्याकरिता हे काम करतो. माझ्यावर कुटुंबाच्या पालनपोषणाची जबाबदारी आहे."

दुसरा अभिमानाने म्हणाला, "सर्व देशातला मी उत्कृष्ट गवंडी आहे हे दाखविण्याकरिता मी हे काम करीत आहे."

तिसरा म्हणाला, "देशातील सर्व देवालयांहून आमचे देवालय अधिक सुंदर व्हावे म्हणून मी हे काम करीत आहे." हे म्हणताना त्याच्या नजरेमध्ये एक निराळीच चमक दिसून येत होती.

तिघांचे काम एकच आहे. परंतु त्याकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन अगदी निराळा आहे. आपले काम महत्त्वाचे आहे ही भावना आत्यंतिक मोलाची आहे. या भावनेमुळे आयुष्यात खरेखुरे समाधान लाभते आणि खऱ्याखुऱ्या महान संस्कृतीची जोपासना या भावनेतूनच होते. आदर्श समाजव्यवस्थेत सर्व कामे परिपूर्णतेने व आनंदाने केली जातील. आज अनेक लोकांना आपले जीवन निरर्थक आहे या भावनेने ग्रासलेले आहे. या शून्यत्वाच्या भावनेमुळे जीवन उद्ध्वस्त होते. हे टाळण्याकरिता आपल्या कामाबद्दल अभिमान बाळगणे आवश्यक आहे. असा रास्त अभिमान असेल तर स्वाभिमान टिकून राहतो आणि व्यक्तिमत्त्व अबाधित राहते.

□ □

सहा

सहभागित्वामुळे कामाबद्दल आत्मीयता वाटते

माणसे काम का करतात आणि ते सर्वोत्कृष्ट काम केव्हा करतात हे प्रश्न अत्यंत अवघड आहेत. या प्रश्नांचे उत्तर शोधण्याकरिता १९२७ ते १९३२ या कालावधीत हॅथॉर्न येथे संशोधन करण्यात आले. शिकागो (अमेरिका) शहराजवळील हॅथॉर्न येथील कारखान्यात सुमारे ३०,००० कामगार काम करीत. या कारखान्यात नेहमीच असंतोष धुमसत असे. प्राध्यापक एल्टन मेयो व त्यांचे सहकारी यांनी याबाबत केलेले संशोधन औद्योगिक समाजशास्त्रामध्ये एक ऐतिहासिक महत्त्वाची घटना समजली जाते.

वरील संशोधनात सर्वांत उल्लेखनीय प्रयोग म्हणजे 'दि फर्स्ट रीले असेम्ब्ली टेस्ट रूम' हा होय. ह्या प्रयोगामध्ये टेलिफोनचा एक भाग तयार करणाऱ्या पाच मुलींच्या गटाच्या उत्पादनाचा अभ्यास करण्यात आला. या प्रयोगाच्या पहिल्या टप्प्याचा म्हणजे १९२७ ते १९२९ पर्यंत आपल्याला विचार करावयाचा आहे. या प्रयोगामध्ये या मुलींच्या गटाची उत्पादकता कोणत्या गोष्टींवर अवलंबून आहे हे ठरविण्याकरिता वेळोवेळी निरनिराळे बदल करण्यात आले. उदाहरणार्थ, कामाचे तास कमी करण्यात आले. विश्रांतीकरिता अधिक वेळा काम थांबविण्यात

आले. उक्ती मजुरीची पद्धती सुरू करण्यात आली. कंपनीतर्फे मोफत जेवण देण्याची व्यवस्था करण्यात आली. आणि पाच दिवसांचा आठवडाही सुरू करण्यात आला. या प्रयोगाच्या शेवटच्या टप्प्यात अत्यंत नाट्यमय असा बदल करण्यात आला. या मुलींना दिलेल्या सर्व सवलती काढून घेण्यात आल्या. आणि सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्याबद्दल मुलींनी अपेक्षेप्रमाणे काहीच चळवळ किंवा विरोध केला नाही. उलट त्यांचे उत्पादन अधिकच वाढले. खरे म्हणजे उत्पादनाचा एक नवीन उच्चांक त्यांनी गाठला.

या प्रयोगाला फार मोठा अर्थ आहे. केवळ पैशावरच उत्पादकता प्रामुख्याने अवलंबून असते हा समज अगदी चुकीचा आहे असे या प्रयोगावरून दिसून आले. माणसाच्या गरजा विविध असतात व त्यांचे स्वरूप गुंतागुंतीचे असते हे या संशोधनावरून स्पष्ट झाले. काम हे एक सामुदायिक कार्य असून त्यामध्ये आपला एक गट आहे या भावनेला पराकाष्ठेचे महत्त्व आहे. माणसाला आपल्याला मान्यता मिळावी, आपल्या कामाचे चीज व्हावे व आपल्याला प्रतिष्ठा लाभावी याची हुरहूर लागलेली असते. या मुली वरील प्रयोगाशी एकरूप झालेल्या होत्या. नामवंत प्राध्यापक आपल्या कामाचा अभ्यास करीत आहेत याबद्दल त्यांना अत्यंत धन्यता वाटत होती. या प्रयोगामध्ये वेळोवेळी कामाच्या पद्धतीत बदल करण्यापूर्वी मुलींचा सल्लाही नियमितपणे घेतला जात होता. त्या मुली अशा रीतीने या प्रयोगाचा आराखडा ठरविण्यात सहभागी झाल्या होत्या. या सर्व कारणांमुळे त्यांच्या सवलती काढून घेतल्या तरी त्याचा त्यांच्या कामावर कोणताच विपरीत परिणाम झाला नाही. याच्या उलट त्या मुलींना असे दाखवून द्यावयाचे होते की त्या काही क्षुल्लक सवलतींच्या लोभाने काम करीत नव्हत्या. यावरून असे दिसते की कामाच्या नियोजनामध्ये आणि ते प्रत्यक्ष करण्यामध्ये लोकांना सहभागी केले तर त्याचा उत्पादकतेवर चांगला परिणाम होतो.

मेयो हा उत्साही आणि उमद्या अंतःकरणाचा मानसशास्त्रज्ञ होता. उद्योग-धंद्यातील मानवी संबंधांच्या गुंतागुंतीच्या क्षेत्रामध्ये त्याच्याइतके संशोधन बहुधा कोणीच केलेले नाही. हॅथॉर्न येथील अधिकाऱ्यांबरोबर त्याने उत्कृष्ट मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित केलेले होते. लोकांना आपलेसे कसे करावे ही कला त्याला चांगलीच अवगत होती. उदाहरणार्थ, पहिल्या भेटीच्या वेळी त्या कंपनीतील

अधिकाऱ्यांना नेहमीप्रमाणे मेयोने त्यांच्या क्लबमध्ये जेवणास नेले नाही तर कांद्याचे सूप देणाऱ्या दुसऱ्या एका भोजनगृहात नेले.

प्रत्येकाला आपण जेथे काम करतो तेथे आपल्याला महत्त्व असावे असे वाटते. आणि कामाच्या व्यवस्थापनात कोणाही व्यक्तीला सहभागी केले तर तिला मोठे आंतरिक समाधान लाभते.

□ □

सात

विश्रांतीमुळे कामाची गुणवत्ता वाढते

(१) रसेलची कामाची पद्धति

बर्ट्रांड रसेल हा विसाव्या शतकातील बहुधा सर्वांत विद्वान असा तत्त्ववेत्ता होय. त्याची बुद्धिमत्ता विजेच्या वेगाने काम करी. त्याची परिश्रमशीलता प्रचंड होती. गणिती तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान यांसारख्या अतिक्लिष्ट विषयांचे अत्यंत एकाग्रतेने दीर्घकाल चिंतन करण्याचे त्याचे सामर्थ्य विस्मयकारक होते. 'दि प्रिन्सिपल्स ऑफ मॅथेमॅटिक्स' हा सुमारे पाचशे पानांचा ग्रंथ रसेलने चार महिन्यांमध्ये लिहिला हे एक आश्चर्यच समजले पाहिजे. कार्ल पॉपर या मूलगामी तत्त्ववेत्त्याने याचे रसभरीत वर्णन केलेले आहे. तो म्हणतो, "ह्या ग्रंथाचा आजपर्यंत लिहिलेल्या सर्वश्रेष्ठ आणि अत्यंत आश्चर्यकारक ग्रंथांमध्ये समावेश केला पाहिजे असे मला वाटते. त्याच्या निर्मितीच्या इतिहासावर विश्वासच बसत नाही. जुलै १९०० मध्ये रसेल हा पॅरिस येथील कॉंग्रेसला हजर राहिला. त्या वेळेपर्यंत गणिताच्या तत्त्वज्ञानाची त्याला काहीच कल्पना नव्हती. या कॉंग्रेसमध्ये पीनोशी व त्याची प्रथमच भेट झाली. पीनोचा रसेलवर फारच प्रभाव पडला. पीनोकडून त्याने त्याचे सर्व लिखाण मिळविले. हे सर्व लिखाण, अगदी सगळे, त्याने ऑगस्ट-मध्ये वाचून काढले ही गोष्टच अद्भुत वाटते. (मी जर असा काही प्रयत्न केला

तर मी थकव्याने आजारी पडेन.) सप्टेंबरमध्ये तर्कशास्त्रावर त्याने एक मौलिक निबंध लिहिला. तो पीनोच्या मासिकामध्ये प्रसिद्ध करण्यात आला. ऑक्टोबरमध्ये त्याने 'दि प्रिन्सिपल्स ऑफ मॅथेमॅटिक्स' ह्या ग्रंथाच्या लिखाणास प्रारंभ केला आणि या महान ग्रंथाचा पहिला मसुदा ३१ डिसेंबरपर्यंत त्याने तयार केला. तीन वर्षांनंतर या ग्रंथाचे चार भाग प्रथम लिहिले होते तसेच जवळजवळ प्रसिद्ध करण्यात आले. भाग १, २ व ७ मात्र परत लिहावे लागले. वाङ्मयाच्या किंवा तत्त्वज्ञानाच्या इतिहासात अशा तऱ्हेची घटना घडली आहे असे मला वाटत नाही. या ग्रंथाच्या निर्मितीला तुलनाच नाही."

आणि विशेष म्हणजे वयाच्या नव्वदाव्या वर्षीही रसेलचे काम अशाच झपाट्याने चालू होते. एका पत्रलेखकाने विचारले असताना त्याने आपल्या दैनंदिन कामाची रूपरेषा पुढीलप्रमाणे सांगितली आहे :

> "सकाळी ८ ते ११–३० पर्यंत पत्रव्यवहार व वर्तमानपत्रे यांमध्ये माझा वेळ जातो. मला सरासरी दररोज शंभर पत्रे येतात. ११–३० ते दुपारी १ पर्यंत मी लोकांना भेटतो. दुपारी २ ते ४ मी वाचन करतो. हे वाचन मुख्यतः अण्वस्त्रविषयक लिखाणांचे असते. दुपारी ४ ते ७ पर्यंत मी लिखाण करतो किंवा लोकांना भेटतो. रात्री ८ ते १ पर्यंत मी वाचन व लेखन करतो."

परंतु रसेलने 'इन प्रेज ऑफ आयडलनेस' नावाचा एक आल्हादकारक व विचारप्रवर्तक निबंध लिहिला आहे. या पुस्तकात नेपल्समधील प्रवाशाची एक गोष्ट त्याने सांगितली आहे. जेव्हा त्याने बारा भिकारी उन्हामध्ये लोळत असल्याचे पाहिले तेव्हा त्याने सर्वांत आळशी भिकाऱ्यास एक लिरा देण्याचे ठरविले. त्याबरोबर अकराजण तात्काळ उभे राहिले. तेव्हा त्याने तो लिरा बाराव्या भिकाऱ्यास दिला.

या निबंधातील रसेलच्या विवेचनाचा सारांश थोडक्यात असा : चार तास काम करून कोणालाही सुस्थितीत राहता येईल. उरलेला वेळ चांगल्या तऱ्हेने काव्यशास्त्र विनोदात घालवावा. उदाहरणार्थ, काव्य व संगीत यांचा आस्वाद घ्यावा. हा वेळ काही क्षुल्लक मौजेच्या गोष्टींमध्ये घालविणे इष्ट नाही. संगीताचा आस्वाद घेणे हे पत्ते खेळण्यापेक्षा श्रेयस्कर होय. रसेलला या निबंधात असे सुचवायचे आहे की भौतिक सुखसोयींपेक्षा सांस्कृतिक गोष्टी महत्त्वाच्या आहेत. आधुनिक जगात भौतिक सुखसोयींची आसक्ती ही एक अनिष्ट गोष्ट होय.

विश्रांतीच्या वेळेचा सदुपयोग कसा करावा हे शिक्षणावर आणि संस्कृतीवर अवलंबून आहे. मात्र फुरसतीच्या वेळेचा भलताच गैरउपयोग होईल हे रसेलच्या लक्षात आले नव्हते.

योग्य वेळी विश्रांती घेऊन आपली सर्जनशीलता कशी वाढवावी ही कला रसेलने आत्मसात केली होती. कोणत्याही गहन प्रश्नाचा विचार करताना तो विषय प्रथम अंतर्मनात काही काल खोलवर रुजला पाहिजे आणि त्यानंतर या प्रश्नांची उत्तरे एक दिवस अत्यंत सुस्पष्टपणे आपल्याला सुचतात. आपल्या 'पोर्ट्रेट्स फ्रॉम मेमरी' या पुस्तकात त्याने सांगितलेली आपली आठवण हृद्य आहे:

"बोस्टन येथे 'लॉवेल' व्याख्याने देण्याचे मी मान्य केले होते. आणि माझ्या व्याख्यानाकरिता मी 'बाह्य जगाचे आपले ज्ञान' हा विषय निवडला होता. १९१३ साली सर्व वर्षभर मी या विषयाचा कॉलेज चालू असताना केंब्रिजमध्ये माझ्या खोलीत आणि सुटीच्या दिवसांत थेम्स नदीच्या काठी एका खानावळीत अत्यंत एकाग्रतेने विचार केला. केव्हा केव्हा मी श्वास घेण्याचेसुद्धा विसरत असे व नंतर धापा टाकीत तंद्रीत असल्याप्रमाणे बाहेर पडे. परंतु याचा काहीही उपयोग झाला नाही. मला सुचणाऱ्या प्रत्येक उपपत्तीचे खंडण करणारे आक्षेप मला स्पष्ट दिसत. शेवटी हताश होऊन मी रोमला सुटीकरिता गेलो. कारण सुटीमुळे माझा हा थकवा तरी नाहीसा होईल अशी माझी अपेक्षा होती. १९१३ च्या शेवटच्या दिवशी मी केंब्रिजला परतलो. माझ्यासमोरील शंकांचे निवारण झाले नसताही वेळ थोडा असल्यामुळे मी ही व्याख्याने जशी सुचतील तशी लघुलेखिकेकडून लिहून घेण्याची व्यवस्था केली. दुसरे दिवशी सकाळी तिला दरवाजात पाहताच आपल्याला काय म्हणावयाचे आहे ते अगदी स्पष्टपणे मला दिसले. आणि नंतर कोणत्याही तऱ्हेने विचलित न होता मी माझी व्याख्याने लघुलेखिकेस लिहून घेण्यास सांगितली."

आपण जर प्रमाणाबाहेर काम केले तर थकव्यामुळे आपण आपल्या कामाचे वाटोळे करतो किंवा चुकीचे निर्णय घेतो. एका सूक्ष्मदर्शी इतिहासकाराने असे म्हटले आहे की दिवसाकाठी आठ तास काम करणाऱ्या त्याच्या ओळखीच्या लंडन येथील लोकांचे दिवाळे निघाले. परंतु त्यांनी जर फक्त चारच तास काम केले असते तर ते श्रीमंत झाले असते. हा अभिप्राय अत्यंत मार्मिक आहे.

(२) आइन्स्टाइनचे सूत्र

'आइन्स्टाइनचे $E = Mc^2$ हे समीकरण सुपरिचित आहे. [याचा अर्थ असा की वस्तुमान (M) याच्या विनाशातून M गुणिले विजेच्या वेगाचा वर्ग (c^2) इतकी ऊर्जा निर्माण होते.] ह्या साध्या आणि सुटसुटीत समीकरणात भयानक विध्वंसक सामर्थ्य आहे. त्याने दुसरेही एक असेच सोपे समीकरण मांडले आहे. आणि त्याचेही परिणाम असेच अतिशय महत्त्वाचे आहेत :

$$A = X + Y + Z$$

where A = Success (सुयश)
X = Hard work (खडतर परिश्रम)
Y = Play (विश्रांती, खेळ)
Z = Keeping one's mouth shut (न बोलणे)

आपण वर पाहिल्याप्रमाणे काम ही गोष्ट क्रीडा किंवा विश्रांती याप्रमाणेच नैसर्गिक आहे. आणि त्या दोहोंची जरुरी आहे. उदाहरणार्थ, कोणत्याही देशातील पंतप्रधानास सर्वांत जास्त काम करावे लागते आणि त्याच्यावरील कामाचा ताण कधीही कमी होत नाही. हॅरल्ड विल्सन या ग्रेट ब्रिटनच्या माजी पंतप्रधानांनी असे म्हटले आहे की पंतप्रधान म्हणून यशस्वी होण्यासाठी चांगली झोप येणे आवश्यक आहे. ते म्हणतात : "माझ्या मते पंतप्रधानांची सर्वांत मोठी जमेची बाजू म्हणजे रात्री गाढ झोप लागणे ही होय. त्याला चांगले आठ तास झोपता आले पाहिजे—शक्य तेव्हा आठ तास झोपता आले पाहिजे. ज्या मुत्सद्याला चांगली झोप येत नाही त्याचा काहीही उपयोग नाही. मला आठवते की रासबेरी ह्या पंतप्रधानाला झोप येत नसल्यामुळे दोन वर्षांत आपली जागा सोडावी लागली."

मौन हे सोन्यासारखे असते ही म्हण खरी आहे. महात्मा गांधी मौन व्रत काटेकोरपणे पाळीत. मौनामुळे आपल्या विचारांना सखोलता प्राप्त होते. मौनामुळे आपण आत्मपरीक्षण करू शकतो आणि त्यामुळे आत्मज्ञानही होते. मौनामुळे आपली सत्यान्वेषणाची शक्ती अबाधित राहते आणि वृद्धिंगत होते.

(३) अॅर्नाल्ड टॉयन्बी

टॉयन्बी याचे लिखाण शास्त्राच्या कसोटीस पूर्णपणे उतरत नसले तरी विसाव्या शतकातील एक प्रथितयश इतिहासकार म्हणून टॉयन्बीची योग्यता

मान्य केलीच पाहिजे. त्याची विद्वत्ता प्रचंड होती हे नि:संशय. त्याला अनेक विषयांमध्ये रस होता. त्याची परिश्रमशीलता केवळ आश्चर्यकारक होती. त्याचे लिखाण अप्रतिहतपणे सतत चाललेले असे हेच त्याच्या यशाचे रहस्य होय. "घाम गाळला तरच कार्यसाफल्य पदरात पडते. देवाने तोच एक मार्ग माणसाकरिता मोकळा ठेवला आहे" हे त्याचे ब्रीदवाक्य होय.

बौद्धिक काम करणाऱ्या लोकांसाठी त्याने सांगितलेले पाच मार्गदर्शक नियम:

(१) एकदम कामाला सुरुवात करू नका. सबंध विषयाचे प्रथम सिंहावलोकन करा. त्याकरिता थोडा वेळ खर्च झाला तरी हरकत नाही.

(२) मात्र एकदा तुमच्या मनाची तयारी झाली की वेळ दवडू नका. अकारण दिरंगाई ही कामास घाईने सुरुवात करण्यापेक्षाही हानिकारक आहे.

(३) तुम्हांला ज्या वेळी लिखाण करणे उत्तम जमते त्या वेळी दरदिवशी नियमितपणे लिहीत चला. आज आपले मन लागत नाही म्हणून लिहिण्याचे टाळू नका.

(४) उगाच वेळ फुकट दवडू नका. "आजच माझे हे काम संपले आहे. आता दुसऱ्या कामाची सुरुवात उद्या सकाळपर्यंत किंवा यापुढील आठवड्याच्या सुरुवातीपर्यंत करणे योग्य होणार नाही. काही काळ विश्रांती घेणे बरे. सतत कामाचे दडपण वाईट," हा विचार चुकीचा आहे. टॉयन्बीचा सल्ला अगदी सरळ आणि स्पष्ट आहे: "एक काम संपले की दुसरे लगेच चालू करा."

(५) नेहमी पुढे पाहा. मोटारींच्या शर्यतीमध्ये भाग घेणारा स्पर्धक आपल्या दुर्बिणीतून क्षितिज न्याहाळीत असतो आणि त्याला कळण्यापूर्वीच तो तेथे पोहोचतो. त्याचप्रमाणे लेखकाने अगदी दूरवर आपली नजर ठेवली पाहिजे.

टॉयन्बी हा खऱ्या अर्थाने कर्मयोगी होता. प्रवासात त्याच्या खिशात भगवद्‌गीता नेहमी असे. त्याची स्मृती विलक्षण होती. परंतु तरीही आपल्या आवडत्या दहा इंच लांब आणि सहा इंच रुंद आकाराच्या वहीमध्ये तो सुव्यवस्थितपणे नोंदी करीत असे.

□ □

आठ

काम हे खेळासारखे मनोरंजक असू शकते

बर्नार्ड शॉच्या 'जॉन बुल्स अदर आयलंड' या नाटकातील वेडा धर्मगुरू असे म्हणतो की आदर्श देश एखाद्या राष्ट्रकुलाप्रमाणे असतो. तेथे काम हे खेळासारखे असते आणि खेळ म्हणजेच जणू काय जीवन असते. व्हाइटहेड या तत्त्ववेत्त्याने यावर केलेले भाष्य अर्थपूर्ण आहे : "या उद्‌गारांचे मर्म हेच आहे की कामावर बौद्धिक आणि नैतिक दृष्टीचा प्रभाव पडला तर कामाची दगदग आणि त्रास यांचा विसर पडून काम आनंददायक होते. काम जेव्हा आपल्याला खेळाइतके आवडते तेव्हा ते एक वरदानच ठरते."

रॉबर्ट फ्रॉस्ट या कवीने 'टू ट्रॅम्प्स इन मड टाइम' या कवितेत ही कल्पना फारच सुरेख रीतीने मांडली आहे. या कवितेची कल्पना थोडक्यात अशी : वसंत ऋतूचा प्रारंभ होत आहे. झाडांवरची सर्व पाने गळून गेली आहेत. फ्रॉस्ट आपल्या बागेत लाकूड तोडण्याचे काम करीत आहे. हा तर त्याचा छंदच असतो. हे दृश्य दोन भटके विषण्ण दृष्टीने पाहात असतात. कारण त्यांना वाटते की यामुळे आपले काम व आपली भाकरी यावर गदा येते. फ्रॉस्टपुढे त्यामुळे पेचप्रसंग निर्माण होतो. आपल्या अगदी आवडीचे काम सोडून देणे त्याच्या जिवावर येते.

फ्रॉस्ट म्हणतो :

"माझ्या जीवनाचे तर हे ध्येय आहे की आपले कर्तव्य आणि आपली आवड ह्या गोष्टी एकरूप व्हाव्यात. तेव्हा त्यांच्या फारकतीस मी कसा तयार होईन. माझे डोळे दोन असले तरी त्यांना एकच गोष्ट दिसते. त्याप्रमाणे माझी आवड आणि माझी गरज या एकच असल्या पाहिजेत. काही ऐहिक गोष्टींकरिता काम खेळाइतके जेव्हा प्रिय होते त्याच वेळेला देवाकरिता व भविष्यकाळाकरिता चांगले काम केले जाते."

ज्या वेळी माणसाला आपले काम खेळाइतकेच आवडते तेव्हा तो ते काम आपली सर्व शक्ती एकवटून निष्ठेने करू लागतो आणि मग त्याच्या असे लक्षात येते की त्याच्याजवळ त्याच्या स्वप्नातही नव्हते असे गुण आणि सामर्थ्य आहे. उदाहरणार्थ, एक मुलगी अभ्यासात फारच मागे होती. तिने मुद्रणाचा छंद म्हणून अभ्यास करण्यास सुरुवात केली आणि त्यात ती अगदी रमून गेली. अविश्रांत परिश्रम करून तिने मुद्रणकलेत प्रावीण्य संपादन केले. नंतर तिने आपले स्वत:चे मुद्रणालय काढले व त्यात तिला चांगलाच नफा होऊ लागला.

सर हॅरल्ड डेनेही हे आसाम राज्याचे भूतपूर्व प्रमुख सचिव एक अत्यंत आदर्श असे प्रशासक होते. आपल्या कामामध्ये परिपूर्णता असावी हीच त्यांची एकमेव आकांक्षा होती. नॅरी रुस्तुमजी यांनी आपल्या 'एन्चॅंटेड फ्रंटियर्स' या मनोज्ञ आत्मचरित्रात सर हॅरल्ड यांचे फार सुरेख शब्दचित्र काढले आहे :

"सर हॅरल्ड हे कधी दमत नसत. कार्यालयास ते नेहमी पायीच येत. त्यांच्या मागोमाग तांबडा व सोनेरी गणवेष घातलेले चपराशी असत. सांताक्लॉजप्रमाणे या चपराश्यांच्या पाठीवर आदल्या दिवशी रात्री सर हॅरल्डनी निकालात काढलेल्या फाइलींचे भले मोठे गठ्ठे असत. संध्याकाळी उशिरा ही अशीच मिरवणूक रात्री घरी करावयाच्या कामाचे गठ्ठे घेऊन उलट्या दिशेने जाई. हे असे त्यांचे काम न चुकता नित्यनियमाने चालू असे. त्याला अपवाद म्हणजे पूजामहोत्सवाच्या वेळी एक आठवडा शिलाँगच्या बाहेर ते गुपचूप मासे पकडण्याकरिता जात.

आजही अधिकारी काम करतात. परंतु बहुधा त्यांचे लक्ष काही लाभ मिळविण्यावर असते. सर हॅरल्ड यांना अशी काही आकांक्षा नव्हती यात मला शंका नाही. आसाममधील सनदी नोकरांच्या सर्वोच्च पदावर ते अधिष्ठित

झालेले होते आणि त्यावर ते समाधानी होते. परंतु अखेरपर्यंत आपले काम सर्वोत्कृष्ट व्हावे म्हणून ते पराकाष्ठा करीत आणि कधीही एखादा विषय गुंतागुंतीचा आहे म्हणून त्यांनी तो टाळला नाही किंवा इतरांकडे सोपविला नाही. कामातील परिपूर्णता हे त्यांचे ध्येय होते आणि ज्या वेळी माणूस आपल्या सर्व गुणांचा उपयोग कामामध्ये करतो तेव्हाच तो सुखाचा कळस गाठतो असे त्यांचे ॲरिस्टॉटलप्रमाणे मत असावे असे मला वाटते."

निरोगी आणि स्नेहपूर्ण स्पर्धेमुळे कामाचे रूपांतर क्रीडेमध्ये होऊ शकते. हुइझिंगा ह्या सुविख्यात डच इतिहासकाराने तर अत्यंत नावीन्यपूर्ण असा सिद्धांत मांडला आहे की खेळ ही कामापेक्षा महत्त्वाची गोष्ट असून मानवी संस्कृतीची घडण खेळामुळे होते. तो म्हणतो, खेळ सर्वव्यापी आहे. त्याने असेही दाखवून दिले आहे की उद्योगधंद्याचे रूपांतर खेळामध्ये होऊ शकते आणि खेळांचे रूपांतर धंद्यामध्ये होते. एका उद्योगपतीने रॉटरडॅम येथे 'ॲकॅडमी ऑफ कॉमर्स' या संस्थेतर्फे त्याला सन्माननीय पदवी दिली त्या वेळी केलेल्या भाषणाचा उतारा त्याने दिला आहे. तो उद्योगपती म्हणतो :

"मी उद्योगधंद्यात पाऊल टाकले तेव्हापासून उत्पादन खाते आणि विक्री खाते यांच्यामध्ये एक प्रकारची शर्यतच चालू आहे. विक्री खात्यास विकणे अशक्य होईल इतका माल तयार करण्याचा उत्पादन खाते प्रयत्न करी तर उत्पादन खात्याला पेलणार नाही एवढ्या प्रमाणावर विक्री करण्याचा विक्री खाते प्रयत्न करी. हे असे सतत चालू असे. कधी विक्री खाते आघाडीवर तर कधी उत्पादन खाते आघाडीवर असा प्रकार असे. मला किंवा माझ्या भावास आपला उद्योगधंदा म्हणजे काही कार्य आहे असे कधी वाटले नाही. तो एक खेळ आहे अशी आमची भावना असून ती भावना आमच्या तरुण अधिकाऱ्यांच्या मनात बिंबविण्याचा आम्ही सतत प्रयत्न करीत आहोत."

ह्या उद्‌गारांचा अगदी शब्दशः अर्थ घेणे बरोबर नाही. परंतु त्यामध्ये पुष्कळ तथ्य आहे असे या डच इतिहासकाराने म्हटले आहे.

आपले एक नामवंत प्रशासक चंदुलाल त्रिवेदी अगदी साध्यातला साधा पिरूट ओढीत आपल्या नोकरवर्गास म्हणत, "कामाचे बक्षीस कामच होय."

आपले काम खेळाइतकेच आवडणे हे जीवनसाफल्याचे सर्वोत्तम चिन्ह होय.

फर्दिनांद हॉजस्टेटर (कॉन्रॅड् लॉरेन्झ या विख्यात शास्त्रज्ञाचे गुरू) याने व्हिएन्ना विश्वविद्यालयात वयाच्या एकाहत्तराव्या वर्षी आपल्या निरोपाच्या भाषणात पुढील उद्गार काढले :

"तुम्ही जर विचाराल की संशोधनाच्या आणि शिक्षणाच्या क्षेत्रात आयुष्यभर मी काय केले तर मला प्रामाणिकपणाने म्हटले पाहिजे, मला त्या त्या क्षणी जी गोष्ट अत्यंत आवडली तीच मी केली."

□ □

नऊ

काम सुंदर असू शकते

प्रत्येकाला सौंदर्याच्या अनुभूतीची ओढ लागलेली असते. अशा अनुभूतीमुळे विलक्षण आनंद तर होतोच पण त्यामुळे आपल्याला नवचैतन्य लाभते. सौंदर्या-मुळे उदात्ततेचा प्रत्यय येतो व आपला कंटाळा दूर होतो. सुंदर गोष्टी पाहण्याची प्रत्येकाला आच लागलेली असते. आपण जेव्हा हिवाळ्यात रात्री निळ्या गडद आकाशाकडे पाहतो तेव्हा ताऱ्यांचे दिव्य भव्य स्वरूप पाहून मन अगदी उचंबळून येते. अशा सौंदर्याच्या अनुभवामुळे आपल्या जीवनाला काही अर्थ, जीवनाला काही दिशा आहे असे वाटू लागते. सौंदर्य हे आपल्याला अक्षय आनंद देत असते.

सुंदर वस्तू तयार करताना आपल्याला शाश्वत असा आनंद मिळतो. चित्रकार, कवी, संगीतज्ञ हे आपल्या कलानिर्मितीत दंग झालेले असतात. परंतु असा आनंद फक्त अशा कलाकारांच्या वाट्यास येतो असे समजणे बरोबर नाही. सुंदर वस्तू निर्माण करण्याची सहजप्रवृत्ती प्रत्येकाच्या ठिकाणी आहे. अगदी नेहमीच्या दैनंदिन साध्या गोष्टीही सुंदर रीतीने करता येतात.

एका मराठी कादंबरीत सचिव म्हणून काम करणारी तरुणी आपल्या नीटनेटकेपणाच्या आणि सौंदर्याच्या आवडीमुळे आपल्या ऑफिसरच्या दालनाचे

स्वरूप कसे पालटून टाकते याचे हुबेहूब वर्णन केले आहे. स्थायी सचिव अकस्मात रजेवर गेल्यामुळे तिच्याकडे त्याचे काम देण्यात आले होते. त्या ऑफिसरच्या टेबलावर नेहमी धूळ साचलेली असे आणि अनेक वस्तू त्यावर इतस्ततः पडलेल्या असत. पेन्सिलींना टोक बहुधा नसेच. फाइल्सचा ढीगही वेडावाकडा ठेवलेला असे. त्या तरुणीने टेबलावर धुळीचा कणही असणार नाही अशी व्यवस्था केली. टेबलावर फुलदाणीत रोज ताजी सुवासिक फुले ती ठेवीत असे. पेन्सिलींना चांगले टोक करून त्या व्यवस्थितपणे ती ठेवीत असे. टीपकागद वेळेवर बदलला जाई. फाइल्सचे वर्गीकरण करून त्या नीट ठेवण्याची व्यवस्था तिने केली. प्रत्येक दिवसाचा कामाचा तपशील—भेटायला येणारी मंडळी, बैठकी वगैरे टंकलिखित केलेली टिप्पणी ती टेबलावर ठेवी. ह्या सर्व गोष्टी तसे पाहिले तर मामुली स्वरूपाच्याच आहेत. परंतु त्याचा एकूण परिणाम फार मोठा झाला. त्या दालनाला एक नवे आकर्षक स्वरूप प्राप्त झाले. ते ताजे टवटवीत सुरेख दिसू लागले. अशा वातावरणात काम करण्यास त्या अधिकाऱ्यास नवा हुरूप आला. अशा प्रसन्न वातावरणात काम करताना त्या अधिकाऱ्यास आनंद वाटे.

जपानमध्ये प्रत्येकाला परिपूर्णता, स्वच्छता व सौंदर्य यांचे वेड आहे. तेथे सर्वत्र सौंदर्याचा प्रत्यय येतो. कोठेही धुळीचा कण किंवा एखादा डागही दिसणार नाही अशी स्वच्छता असते. एका लेखकाने म्हटले आहे:

> "जपानी लोकांची सौंदर्यदृष्टी मोठी चोखंदळ असते. प्रत्येक गोष्ट सुंदर करण्याची, नटविण्याची, सुशोभित करण्याची, अलंकृत करण्याची त्यांना हौस असते. साधे सँडविच असो, जपानमध्ये त्याला कलाकृतीचे रूप देण्यात येते. सँडविच निरनिराळ्या आकारांचे बनविले जातात—गोल, अष्टकोनी व ताऱ्यासारखे—त्यावर टोमॅटोच्या रंगीत फोडी व्यवस्थितपणे ठेवल्यामुळे ते अधिकच आकर्षक दिसतात."

जॉर्ज मिकेश याने जपानमध्ये कचऱ्याचे पॅकिंगही कसे सुरेख करतात याचे वर्णन केले आहे. कोणतीही गोष्ट हातात घेतली की जपानी लोक तिला सुंदर करतात:

> "कारखान्याच्या पिछाडीस कचऱ्याचा एक डोंगर उभा होता. कचरा जमा झाला तसा फेकलेला नव्हता. ह्या पेट्या इतस्ततः विखुरलेल्या नव्हत्या.

तर त्या एकावर एक काहीशा चमत्कारिक आकाराच्या पिरॅमिडप्रमाणे रचलेल्या होत्या. या पेट्यांच्या टोकावर सुटा कचरा आकर्षक रीतीने ठेवलेला होता."

साधी दैनंदिन कामे जर कल्पकतेने व सुव्यवस्थित केली तर त्यांना आकार येतो, प्रमाणबद्धता येते. या गोष्टी मग आकर्षक व सुंदर दिसू लागतात. लॉर्ड माऊंटबॅटन हे आपले काम अत्यंत तडफदार रीतीने व सुव्यवस्थितपणे करीत. हिंदुस्थानमध्ये ते प्रथम व्हाईसरॉय म्हणून आले तेव्हा येथील परिस्थिती जाणून घेण्याकरिता त्यांना असंख्य लोकांच्या मुलाखती घ्याव्या लागल्या. या मुलाखतीं-करिता त्यांनी एक अगदी अभिनव अशी पद्धती सुरू केली. दोन मुलाखतींमध्ये पंधरा मिनिटे मोकळा वेळ ठेवण्यात आला होता. त्या पंधरा मिनिटांमध्ये आधी झालेल्या मुलाखतीचा सारांश ते लघुलेखकाला लिहून घेण्यास सांगीत. या सर्व टिप्पणींना संदर्भ नंबर दिले जात व त्या टिप्पणी संबंधित अधिकाऱ्याला देण्यात येत. त्यामुळे त्या अधिकाऱ्यांना या घडामोडींची अद्ययावत माहिती मिळत असे. काम असे सुसूत्र असेल तर त्यापासून आनंद होतो. काम व्यवस्थित केल्याची भावना अत्यंत सुखद असते.

फर्नांड लेजर या नामवंत कलाकाराने असे यथार्थ उद्गार काढले आहेत की आपला समज असतो त्यापेक्षा लोकांना सौंदर्याची गरज अधिक भासते. अगदी लहानपणापासून तो मोठेपणापर्यंत माणसाला सौंदर्याची बरीच ओढ जाणवते. आपले तीनचतुर्थांश हावभाव व आकांक्षा यांच्यामागे सौंदर्याची आसक्ती असते. एका दुकानाच्या प्रदर्शन खिडकीमध्ये एक कारागीर जाकिटे अत्यंत काळजीपूर्वक मांडीत होता. त्याचे वहारदार वर्णन त्याने केले आहे:

"या कारागिराला आपल्या खिडकीमध्ये सतरा जाकिटे व तितकेच नेकटाईज मांडावयाचे होते. प्रत्येक जाकीट मांडण्याकरिता त्याला अकरा मिनिटे लागली. आम्ही घड्याळ लावून वेळेचा हिशोब ठेवला. सहावे जाकीट लावीपर्यंत आम्ही दमून गेलो. आम्ही त्या माणसाबरोबर जवळ-जवळ एक तास उभे होतो. एक मिलीमिटर जाकीट पुढे मागे केल्यानंतर तो बाहेर येऊन ते कसे दिसते हे पाही. तो बाहेर येई तेव्हा तो आपल्याच तंद्रीत असे. त्यामुळे त्याने आम्हांला पाहिलेच नाही. तो आपला चष्मा एखाद्या

यांत्रिकाच्या कौशल्याने बरोबर वसवी, कपाळाला आठ्या घाली आणि डोळे रोखून जणू काही आपले सर्व आयुष्य त्यावर अवलंबून आहे अशा रीतीने जाकिटांचे निरीक्षण करी."

याचा सारांश असा आहे की साधी दैनंदिन कामे सुंदर रीतीने करता येतात. जो कामगार आपली हत्यारे व्यवस्थित ठेवतो, आपले यंत्र नियमितपणे साफ करतो व कच्चा माल नासधूस न करता वापरतो तोही सौंदर्यनिर्मिती करीत असतो. तो काम करीत असताना त्याला पाहणे हे आनंददायक होते.

□ □

दहा

काम सर्जनशील असू शकते

काही लोक आहेत त्या गोष्टी पाहतात आणि त्याबद्दल प्रश्न करतात. मी मात्र ज्या गोष्टी अस्तित्वात नाहीत त्यांचे स्वप्न पाहतो आणि म्हणतो की, असे का होऊ नये.

—बर्नार्ड शॉ

सर्जनशीलतेची व्याख्या करणे अवघड आहे. सर्जनशील कार्याचे स्वरूपच असे असते की त्याचे वर्णन करता येत नाही. ही गोष्ट अज्ञात असते आणि प्रत्यक्ष घडेपर्यंत ती अगम्य आहे असा आपला समज असतो. असंभाव्य गोष्ट घडते तेव्हाच नवनिर्मिती होते. सर्जनशील कार्यामुळे एक नवीन प्रत्यय येतो. "तेच हे, मी त्याचा शोध लावला आणि हेच मला म्हणावयाचे होते" असा अनुभव येतो.

सर्जनशीलता ह्या विषय गुंतागुंतीचा, अवाढव्य आणि वादाचा आहे. आपल्याला या गुंतागुंतीचा येथे विचार करावयाचा नाही. एक गोष्ट नि:संशय आहे की माणूस जेव्हा एखादी नवी उपयुक्त किंवा सुंदर गोष्ट निर्माण करतो तेव्हा त्याला परमानंद होतो. तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ किंवा कलावंत हेच फक्त सर्जनशील असतात असे नाही. सर्जनशीलता सर्व क्षेत्रांत व सर्व थरांवर शक्य आहे. एखादा साधा प्राथमिक शिक्षकही सर्जनशील असू शकतो.

सर्जनशील व्यक्ती आपल्या सर्व इंद्रियांचा उपयोग करते. सर्जनशीलता ज्ञान, अनुभव, लवचिकपणा, आत्मविश्वास, अंतर्ज्ञान आणि अविश्रांत एकाग्रतेने परिश्रम करण्याची तयारी या अनेक गोष्टींवर अवलंबून असते. सर्जनशीलतेचा

वृक्ष खडतर परिश्रमांच्या भूमीवरच फोफावतो. उदाहरणार्थ, एडिसन फोनोग्राफ तयार करीत असताना पाच दिवस व रात्री एकसारखा काम करीत होता. फक्त ४–५ तास तो यावेळी झोपत होता. व्हिक्टोरिअन कालखंडातील मोठा कल्पक आणि धाडसी इंजिनिअर ब्रुनेल आपल्या 'दि ग्रेट इस्टर्न' या बोटीच्या बांधकामा-बद्दल रुग्णशय्येवरून मार्गदर्शन करीत होता. त्या काळच्या मोठ्यात मोठ्या बोटीच्या सहापट ही बोट होती. त्यावेळी मूत्राशयाचा विकार आणि पक्षाघात यामुळे तो आजारी होता.

सर्जनशील लोक आपापली कामाची पद्धती ठरवितात. शिलर हा कवी आपल्या टेबलाच्या खणात कुजलेली अंडी ठेवीत असे. या अंड्यांच्या वासामुळे त्याला काव्य करण्यास स्फूर्ती मिळे. वाल्टर ड ला मेअर हा लिहिताना सतत धूम्रपान करी. ऑडन हा कवी सतत चहा पीत असे तर स्टीव्हन स्पेन्डरला कॉफी प्रिय आहे.

देकार्त हा महान तत्त्ववेत्ता आपले चिंतन अंथरुणात पडूनच करीत असे एके दिवशी सकाळी अकरा वाजता काही मित्र त्याच्या भेटीस आले तर तो उठलाच नव्हता. मित्रांनी तू काय करतो आहेस असे त्याला विचारले तेव्हा तो म्हणाला, 'विचार'. जॉन व्हॉन न्यूमन हा या शतकातील एक सर्वश्रेष्ठ गणिती रात्री फार वेळाने झोपे व सकाळी फार वेळाने उठे. एका सुप्रसिद्ध शास्त्रज्ञाने सकाळी दहानंतर त्याला टेलिफोन करून त्याचे एका समस्येचे उत्तर बरोबर असल्याचे त्याला सांगितले तेव्हा तो रागावून म्हणाला, "इतक्या सकाळी तू मला मी बरोबर असल्याचे सांगण्याकरिता टेलिफोन करीत आहेस? मी चुकेपर्यंत थांब."

प्राध्यापक वालडक् हा आंतरराष्ट्रीय दर्जाचा कायदेतज्ज्ञ आपले बरेचसे काम अंथरुणात पडूनच करीत असे. आपले पाय जर आपल्या डोक्याच्या पातळीच्या वर असतील तर आपले काम अधिक चांगले होते असा त्याचा समज होता. तो हॉटेलच्या खोलीमध्ये स्वत:ला कोंडून घेई आणि कॉफी व सँडविचिस यांचा आस्वाद घेत प्रचंड कायदेविषयक मसुदे तयार करीत असे.

सर्जनशीलतेचे प्रमाणीकरण करता येत नाही. माणूस अनंत मार्गांनी आपली सर्जनशीलता व्यक्त करू शकतो. मदर टेरिसा ह्या तपस्वी बाईला तिच्या भारतातील मानव जातीच्या सेवेबद्दल आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली आहे.

काही वर्षांपूर्वी कलकत्त्यामधील एका मोठ्या प्रसिद्ध हॉस्पिटलच्या समोर फूटपाथवर पडलेली एक मरणोन्मुख स्त्री तिने पाहिली. तिचे पाय उंदीर व झुरळे कुरतडीत होते याचेही तिला भान नव्हते. त्या स्त्रीला हॉस्पिटलमध्ये प्रवेश मिळावा म्हणून मदर टेरिसा यांनी खूप प्रयत्न केले. परंतु त्याचा काहीच उपयोग झाला नाही. मग त्यांनी मरणोन्मुख निराधार लोकांकरिता 'निर्मल हृदय' ही संस्था स्थापन करण्याचे ठरविले. ही संस्था अपूर्व आहे. ही संस्था म्हणजे दयाशीलता, करुणा यांचे मूर्त स्वरूप आहे.

मार्क्स अँड स्पेन्सर

मार्क्स अँड स्पेन्सर ह्या इंग्लंडमधील संस्थेचा विचार केला तर उद्योग-धंद्यातही सर्जनशीलतेला कसा वाव आहे ते चांगले कळते. १८८४ मध्ये ह्या संस्थेची १ पेनी किंमतीच्या वस्तू विकणारी संस्था म्हणून स्थापना करण्यात आली. १९१५ मध्ये एक किरकोळ विक्री करणारी सधन संस्था म्हणून ती ओळखली जाई. १९२४ मध्ये या संस्थेचा एक प्रमुख सायमन मार्क्स अमेरिकेस तेथील मार्केटिंग क्रांतीचा अभ्यास करण्यास गेला. ह्या क्रांतीमुळे अमेरिकन उद्योगधंदे व व्यापार याचे स्वरूप आमूलाग्र बदलून गेले होते व त्याचा सायमन मार्क्सच्या मनावर फार मोठा परिणाम झाला. आपल्याही धंद्याची उद्दिष्टे नव्याने निश्चित केली पाहिजेत असा निर्धार करूनच तो इंग्लंडला परतला. हे नवे उद्दिष्ट म्हणजे इंग्लंडमध्ये सामाजिक क्रांती घडवून आणणे हे होय. ह्या क्रांतीचे किरकोळ विक्री हे एक साधन आहे.

हा एक अगदी नवीन विचार होता, एक मोठा शोध होता. त्या काळात इंग्लंडमधील समाजामध्ये वर्गभावना अत्यंत प्रकर्षाने जाणवत असे. कपड्यांवरून व्यक्तीचे समाजातील स्थान ठरविले जाई. वरच्या वर्गातील लोकांचे कपडे सुबक असत तर खालच्या वर्गातील लोकांचे कपडे गवाळ असत. मार्क्स आणि स्पेन्सर यांनी हा भेदभाव नष्ट करण्याचे ठरविले. त्याकरिता वरच्या वर्गाचे लोक ज्या तऱ्हेचे कपडे वापरतात त्याच दर्जाचे कपडे खालच्या वर्गास परवडतील अशा किंमतीस देण्याचे त्यांनी ठरविले. हा ध्येयवाद उदात्त होता आणि त्याला डोळ्यांत भरण्याजोगे यशही प्राप्त झाले. मार्क्स अँड स्पेन्सर ह्या संस्थेची गणना आज जगातील सर्वात मोठ्या किरकोळ विक्री करणाऱ्या संस्थांमध्ये होते.

सर्जनशीलता उद्योगधंद्यातील केवळ उच्च व्यवस्थापनामध्येच शक्य आहे असे नाही. एका संस्थेमध्ये महिनाअखेर ग्राहकांची बिले करण्याच्या पद्धतीमुळे कामामध्ये अडथळे येत. ही पद्धती बदलून दर आठवड्यास एकअष्टमांश ग्राहकांची बिले तयार करण्याची पद्धती सुरू करण्यात आली. प्रत्येक ग्राहकाला दोन महिन्यांतून एकदा बिल मिळे आणि त्यामुळे कामाच्या प्रमाणात समतोल साधणे शक्य झाले व खर्चात सुमारे शंभर कारकुनांच्या वेतनाइतकी बचत करणेही शक्य झाले.

जॉर्ज ऋग् या अमेरिकन अशिक्षित शेतकऱ्याकडे हायब्रीड धान्याचा शोध लावण्याचे श्रेय बऱ्याच अंशी दिले जाते. पीक चांगले कसे दिसेल यापेक्षा ते अधिक कसे येईल इकडे त्याने लक्ष दिले. तो म्हणे कीं माझे घोडे व गाई मक्याच्या कणसाच्या सौंदर्याचा विचार करीत नाहीत. त्याने आपले धान्य पीकस्पर्धेकरिता आणले तेव्हा तेथील अधिकाऱ्याने त्याला जवळजवळ परत पाठविले. परंतु तीन वर्षांत यामुळे निरनिराळ्या धान्यांच्या १२० प्रती निर्माण झाल्या आणि आज सर्व जगभर या प्रतींचा हायब्रीड पिकाकरिता उपयोग करण्यात येतो.

□ □

अकरा

शिस्तबद्ध कामाची राष्ट्रीय विकासाकरिता आवश्यकता

प्रथितयश अर्थशास्त्रज्ञ श्री. ए. के. दासगुप्ता याने असे म्हटले आहे की उत्पादनवाढीकरिता परिश्रमशीलता आणि काटकसर या गुणांची फार आवश्यकता आहे. जपानने या दोन गुणांच्या जोरावर १९६० ते १९७० या दहा वर्षांमध्ये आपले राष्ट्रीय उत्पन्न दुप्पट केले. जपानमधील बचतीचे प्रमाण सर्व जगात जास्त आहे. १९७० नंतरच्या प्रारंभीच्या काही वर्षांत एकूण राष्ट्रीय उत्पादनापैकी चाळीस टक्के इतकी बचत जपानने केली. जपानी लोक आपला वेळ किंवा आपले परिश्रम वाया जाऊ देत नाहीत. आपल्या कामाचे ते अत्यंत तपशीलवार नियोजन करतात आणि प्रत्यक्ष कामही या नियोजना-प्रमाणे केले जाते. कारखान्यात सुट्या भागांचा साठा ठेवला जात नाही. आवश्यक ते सुटे भाग जुळवणी यंत्रसमुच्चयाच्या शेवटी अगदी ठरलेल्या मिनिटाला (तासाला नव्हे) पुरविण्याची व्यवस्था केलेली असते. जपान-मध्ये 'झीरो डिफेक्ट' (निर्दोष काम) ही चळवळ अत्यंत यशस्वी झाली आहे. आर्थिक विकासाकरिता काम सुव्यवस्थितपणे पार पाडणे अत्यावश्यक आहे. गुन्नार मिरदाल या अर्थशास्त्रातील नोबेल प्राईझ विजेत्या अर्थशास्त्रज्ञाने

आणि 'एशियन ड्रामा' या त्रिखंडात्मक ग्रंथाच्या लेखकाने पुढील उद्गार काढले आहेत:

> "भारताची आजची परिस्थिती लक्षात घेता जर या देशाची जलद व मोठ्या प्रमाणावर प्रगती व्हावयाची असेल तर पहिली अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे कामगारांची उत्पादकता वाढविणे ही होय . . . भारतातील आर्थिक नियोजनाचे यश वा अपयश मानवी घटकावर अवलंबून आहे. भारताला आपल्या लोकांना अधिक आणि चांगले काम करून उत्पादन वाढविण्याकरिता प्रवृत्त करता येईल काय?"

पंडित नेहरूंनी एकदा रागाने असे म्हटले की आपण सर्व आळशी लोक आहोत. विशेषत: आपल्या हातापायांचा आपण पुरेसा उपयोग करीत नाही. त्याचबरोबर बौद्धिक परिश्रम करण्यातही आपण अनेकदा कुचराई करतो.

रशियन क्रांती झाल्यानंतर लेनिनने असे उद्गार काढले होते की "सोव्हिएट सरकारने आपल्या लोकांना काम करण्यास शिकविले पाहिजे." १९२७ मध्ये ए. के. गॉस्तफ याने कारखान्यांच्या संघटनेचा शास्त्रीय अभ्यास करण्याकरिता सेंट्रल लेबर इन्स्टिटच्यूट नावाची संस्था स्थापन केली. तो स्वत: कवी व औद्योगिक इंजिनिअर होता. त्यावेळी रशियन लोकांची संघटनात्मक निरक्षरता नाहीशी करण्याकरिता पुढील मनोज्ञ पत्रिका प्रसिद्ध करण्यात आली:

वेळ, पद्धती, शक्ती या शब्दांचा अर्थ काय?

वेळ

तुमच्या वेळेचे मोजमाप करा व त्यावर नियंत्रण ठेवा.

प्रत्येक गोष्ट वेळेवर करा, अगदी ठरलेल्या मिनिटाला करा.

वेळ वाचवा. वेळ मोजा आणि त्वरेने काम करा.

वेळेचे वाटप काटेकोरपणे करा. कामाच्या वेळी काम करा.

विश्रांतीच्या वेळी विश्रांती घ्या. विश्रांतीच्या वेळेचा उपयोग काम नंतर अधिक चांगले होईल अशा रीतीने करा.

पद्धती

प्रत्येक गोष्ट योजनेनुसार करा, पद्धतीनुसार करा.

पद्धतीकरिता नोंदवही ठेवा. तुमच्या कार्यालयात शिस्त असू द्या.

प्रत्येकाने योजनेप्रमाणे काम केले पाहिजे.

शक्ती

प्रत्येकाने आपले उद्दिष्ट चिकाटीने गाठले पाहिजे.

परिश्रमपूर्वक प्रयत्न करा. अपयश आले तरी निराश होऊ नका.

हाती घेतलेले काम तडीस न्या.

हा आपला कम्युनिस्ट अमेरिकनवाद आहे. त्यामध्ये वास्तवता आणि दक्षता असली पाहिजे.

राष्ट्राच्या आर्थिक स्वास्थ्याकरिता दैनंदिन काम प्रामाणिकपणे आणि परिश्रमपूर्वक करण्याची आवश्यकता आहे. असे म्हणतात की इंग्लंड देशाची परिस्थिती हळूहळू बिघडत आहे. तेथील रस्ते घाणेरडे होत आहेत. आगगाड्यांचे डबे आणि उपाहारगृहे दिवसेंदिवस अस्वच्छ होत आहेत. याचे कारण असे दिसते की लोकांची काम करण्याची इच्छा नाहीशी होत आहे. कामगारांना चहाकरिता अर्धा तास सुटी घेण्याची व काम संपण्याच्या वेळेपूर्वी एक तास आधी काम थांबविण्याची सवय लागलेली आहे. काही वर्षांपूर्वी असा एक अंदाज करण्यात आला होता की एक नवीन जहाज इंग्लंडमध्ये तयार करण्यास एकोणीस महिने लागतात तर जर्मनीमध्ये दहा महिने, स्विडनमध्ये नऊ महिने आणि जपानमध्ये फक्त आठ महिने लागतात. इंग्लंडची १५,००० टनांची 'गॉथिक' नावाची राणीची विहारनौका दुरुस्त करण्याचे काम पश्चिम जर्मनीतील एका कारखान्याकडे देण्यात आले. कारण तेथे ते लवकर आणि स्वस्त होऊ शकले. ग्रेट ब्रिटन जणू काय अकार्यक्षमता आणि सुस्तपणा याबाबत बेफिकीर होत आहे.

जपानमधील हिताशी आणि इंग्लंडमधील ब्रिटिश इलेक्ट्रिक या दोन कारखान्यांच्या संस्कृतीचा व्यापक प्रमाणावर अलीकडेच अभ्यास करण्यात आला आहे. त्यावरून या देशांचा औद्योगिक कार्यक्षमतेबाबतचा दृष्टिकोन कसा निराळा आहे याची चांगली कल्पना येते. जपानी लोक संस्थेच्या कार्यक्षमतेला महत्त्व देतात. याच्या उलट ब्रिटिश लोक व्यक्तिगत स्वातंत्र्याला महत्त्व देतात. उदाहरणार्थ :

(१) हिताशीमधील व्यवस्थापक आणि कामगार संघटनांचे पुढारी इंग्लंडमधील तत्सम लोकांपेक्षा कारखान्याच्या कार्यक्षमतेला अधिक महत्त्व देतात.

(२) हिताशीमधील कामगार संघटनांचे पुढारी व्यक्तिगत प्रतिष्ठा, स्वातंत्र्य आणि समता यापेक्षा सुसंवाद, कार्यक्षमता आणि शिस्तबद्धता यांना अधिक महत्त्व देतात. याच्या उलट ब्रिटिश इलेक्ट्रिकचे कामगार पुढारी उत्पादनातील कार्यक्षमतेपेक्षा व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा यांना अधिक महत्त्व देतात.

(३) हिताशीतील कामगार संघटना पुढारी व्यवस्थापकाप्रमाणेच आपल्या संस्थेच्या विकासाची आणि अभिवृद्धीची काळजी करतात. ब्रिटन-मधील कामगार पुढारी अशी काळजी क्वचितच करतात.

कार्यक्षमतेबाबत उदासीनता हेच इंग्लंडच्या सध्याच्या आर्थिक अडचणींचे कारण होय.

आधुनिक जगाला कामाबद्दल एका नवीन तत्त्वज्ञानाचा अंगीकार केला पाहिजे. या तत्त्वज्ञानाची मूलभूत तत्त्वे पुढीलप्रमाणे सांगता येतील : राष्ट्रीय अर्थव्यवस्था ही एकजिनसी असते. अर्थव्यवस्थेच्या कोणत्याही क्षेत्रात अकार्यक्षमता असली तर त्यामुळे इतरत्र अकार्यक्षमताच वाढते. प्रत्येकाची अशी साहजिकच इच्छा असते की इतरांकडून त्याला उत्कृष्ट सेवा मिळावी. परंतु जेव्हा तो आपले कर्तव्य व कार्य सुव्यवस्थितपणे पार पाडतो तेव्हाच त्याला अशी अपेक्षा करण्याचा रास्त अधिकार प्राप्त होतो. तेव्हा प्रत्येकाने आपल्या ज्ञानाचा, बुद्धीचा, कौशल्याचा, साधनांचा, वेळेचा आणि शक्तीचा उपयोग आपल्याला दिलेले काम उत्कृष्टपणे करण्याकरिता करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आपल्या सहकाऱ्यांना सर्वतोपरी सहकार्य देणे आवश्यक आहे. जी व्यक्ती आपले काम निष्टापूर्वक करते ती एका अर्थाने आपल्या कामाहूनही महत्त्वाच्या गोष्टींबद्दल म्हणजे आपले कुटुंब, आपला समाज, आपला देश, अखिल मानव समाज आणि धर्म या सर्वांबाबत आपली निष्ठा व्यक्त करते. याचा व्यक्तिगत फायदाही असा होतो की या व्यक्तीस मन:शांती लाभते आणि दुराव्याची भावना––हा दुरावा आपल्या कामाबद्दल, आपण निर्माण करीत असलेल्या वस्तूबद्दल आणि आपल्या स्वत:च्या व्यक्तिविशेषाबद्दल असू शकतो––नाहीशी होते. त्याचे काम हे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे एक अंग होते. अशा व्यक्तीस आपले काम प्रिय असते.

जपानमधील आर्थिक विकासाचा वेग सर्व जगात जास्त आहे. याचे एक कारण म्हणजे जपानी लोक आपले दैनंदिन काम आपले पवित्र कर्तव्य आहे असे मानतात.

जपानमधील मत्सुशिटा या कारखान्यातील कामगार दररोज कामास प्रारंभ करण्यापूर्वी एक प्रार्थना करतात. तिचा भावार्थ असा :

"नवजपानची निर्मिती करण्याकरिता आपण आपली शक्ती व मन एकवटू या.
आपण उत्पादन वाढविण्याकरिता प्रयत्नांची शर्थ करू या.
कारंज्यातून जसे पाणी अखंडपणे आणि सतत उडत असते त्याप्रमाणे सर्व जगातील लोकांकरिता आपण आपला माल पाठवू या.
आपल्या धंद्याची एकसारखी वाढ होवो, वाढ होवो.
त्याकरिता सुसंवाद आणि कळकळ यांची आवश्यकता आहे."

□ □

बारा

विक्रम प्रेरणा

विख्यात मानसशास्त्रज्ञ डी. सी. मॅक्क्लेलंड याने आपल्या 'दि अचीव्हिंग सोसायटी' या अभिजात ग्रंथात आर्थिक विकास या घटनेची कारणमीमांसा करणारा एक नवीन सिद्धांत मांडला आहे. त्याच्या मते एक विवक्षित मानवी प्रेरणा आर्थिक विकासास प्रामुख्याने कारणीभूत होते. या प्रेरणेला त्याने विक्रम प्रेरणा म्हटले आहे.


मॅक्क्लेलंड याने असे दाखवून दिले आहे की इसवी सनापूर्वी ९०० ते ४७५ या कालावधीत ग्रीसमध्ये विक्रम प्रेरणेने उच्चांक गाठल्यामुळे त्या कालावधीत तेथे आर्थिक विकासानेही उच्चांक गाठला होता. या गतिमान आर्थिक विकासाच्या कालामध्ये लोक फार धाडसी होते. त्यांनी आपले नशीब काढण्याकरिता, आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्याकरिता, व्यवहारात विशेष उपयोग नसलेली अतिप्रचंड अशी स्मारके व प्रासाद बांधण्याकरिता अविश्रांत परिश्रम केले, या सर्वांमागे आपण काही नेत्रदीपक गोष्टी कराव्या हीच प्रेरणा होती.

भांडवलशाहीचा उदय कसा झाला याबाबत पंडितांनी कडाक्याची चर्चा केलेली आहे. मॅक्स वीबर या जर्मन प्रकांड पंडिताने असा सिद्धांत मांडला आहे की

प्रॉटेस्टंट धर्मातील काही कल्पनांमुळे भांडवलशाहीस चालना मिळाली. प्रॉटेस्टंट धर्माच्या प्रवर्तकांनी असा प्रचार केला की माणूस आपल्या आयुष्यात विशेषतः उद्योगधंद्यात व व्यवसायात काय करतो यावरच त्याचे अंतिम मूल्यमापन होते. पैसा हा काही वैयक्तिक सुखसोयींकरिता नाही. खडतर परिश्रम, स्वयंशिस्त, साधी राहणी आणि काही तरी मूर्त साध्य करण्याची आकांक्षा हेच सर्वांत महत्त्वाचे सद्‌गुण होत. या सद्‌गुणांमुळेच भांडवलशाहीचा विकास झाला. टॉनी या ब्रिटिश विद्वानाने निराळे मत मांडले आहे. त्याच्या मते प्रॉटेस्टंट धर्मातील या कल्पनांपेक्षा व्यक्तिवादाच्या तत्त्वामुळे भांडवलशाहीचा विकास झाला.

मॅक्‌क्लेलंड याने आपल्या विक्रम प्रेरणेच्या कल्पनेच्या आधारे भांडवलशाहीच्या विकासाचे एक निराळे स्पष्टीकरण दिले आहे. ते आकृतीरूपाने पुढे मांडले आहे :

भांडवलशाहीचा विकास



मॅक्‌क्लेलंड याचा सिद्धांत पुढीलप्रमाणे मांडता येईल :

(अ) प्रॉटेस्टंट धर्मातील कल्पना आणि विचार यांमुळे मुलांचे संगोपन निराळ्या तऱ्हेने झाले.

(ब) या पद्धतीमुळे मुलामध्ये विक्रम भावना वाढीस लागली.

(क) ही मुले मोठी झाल्यानंतर धाडसी आणि विक्रमी प्रवर्तक झाली.

मॅक्‌क्लेलंडचा सिद्धांत फार व्यापक अशा संशोधनावर आधारलेला आहे. त्याने १९२५ साली चाळीस देशांत लोकप्रिय असलेल्या मुलांच्या गोष्टी गोळा करून त्यांना विक्रम प्रेरणेनुसार गुण दिले. नंतरच्या पंचवीस वर्षांत या देशातील

आर्थिक विकास आणि विक्रम प्रेरणेचे गुण यांमध्ये चांगलाच परस्पर संबंध असल्याचे आढळून आले. म्हणून मॅक्क्लेलंड याने असे सुचविले आहे की मुलांच्या संगोपनशास्त्रातील तज्ज्ञ विकसनशील देशांमध्ये पाठवावे. ते आई-वडिलांना आपल्या मुलांमध्ये विक्रम प्रेरणेची जोपासना कशी करावी याबद्दल मार्गदर्शन करतील.

विक्रम प्रेरणा याचा साधासुधा अर्थ सतत सुधारणा करण्याची आकांक्षा, म्हणजेच परिपूर्णतेचा हव्यास. विशेषत: आर्थिक व्यवहार अत्यंत कार्यक्षम रीतीने करणे हे विक्रम प्रेरणेचे लक्षण आहे असे मॅक्क्लेलंड याने म्हटले आहे. जास्तीत जास्त नफा मिळविण्यापेक्षा आपल्या कामात परिपूर्णता आणण्याची आकांक्षा आर्थिक विकासास कारणीभूत होते.

विक्रम प्रेरणा प्रबळ असणाऱ्या लोकांचे विशेष असे :

(१) या लोकांना पैसा, मानसन्मान किंवा सत्ता यांपेक्षा कामातील परिपूर्णतेबद्दल अधिक स्वारस्य वाटते. कोणतेही काम स्वीकारताना त्या कामापासून पैसा किंवा मानसन्मान या गोष्टींपेक्षा त्यामध्ये उत्कृष्ट तऱ्हेने काम करण्याकरिता कितपत संधी आहे याचा ते विचार करतात.

(२) ते इतरांच्या बरोबर काम करण्यास तयार असतात.

(३) आपल्या कामाकरिता भागीदार निवडताना ते मित्रांपेक्षा तज्ज्ञांना पसंत करतात.

(४) इतर कोणत्याही मार्गाने सधन होण्यापेक्षा ते प्रवर्तक म्हणून यशस्वी होण्याचे पसंत करतात.

(५) अपयश टाळणे यापेक्षा यश संपादन करणे इकडे त्यांचे लक्ष असते.

(६) निरनिराळ्या योजनांचे संभाव्य फायदे अजमावताना ते अधिक वास्तववादी असतात.

(७) ते दूरदर्शी असतात. दीर्घकालीन नियोजनांमध्ये ते रस घेतात.

(८) अडचणीच्या प्रसंगी विक्रमी प्रेरणेचे लोक बदलत्या घटनांचे अंतरंग तात्काळ पाहू शकतात, व्यावहारिक दृष्ट्या विचार करू शकतात आणि अंतर्दृष्टीने आपल्या प्रश्नावर नवे आणि प्रभावी तोडगे काढतात.

(९) ते आपल्या अनुभवाच्या आणि मूल्यांच्या आधारे स्वतंत्रपणे विचार करतात.

विक्रम प्रेरणेचा अभाव

मॅक्क्लेलंड याने भारतात विस्तृत असे संशोधन केले आहे. त्याच्या मते भारतीयांची विक्रम प्रेरणा दुबळी असल्यामुळे आर्थिक विकासास गती येत नाही. त्याची त्याने दिलेली दोन उदाहरणे पुढे दिली आहेत :

(१) **ककिनाडातील कोळी**

आंध्र प्रदेशमधील किनाऱ्यावरच्या ककिनाडा या छोटया गावातील कोळयांची परिस्थिती सुधारावी हा या योजनेचा हेतू होता. हे कोळी आपली गुजराण कशी तरी करीत असत. बंगालच्या उपसागरात त्यांची मासे पकडण्याची जाळी सहजासहजी फाटत म्हणून सरकारने त्यांना नायलॉनची मोठी जाळी दिली. ही जाळी मजबूत असल्यामुळे सहजासहजी फाटण्याची शक्यता नव्हती व त्यामध्ये मासेही अधिक मावत होते. कोळी रोज अधिक मासे पकडतील व त्यांचे उत्पन्न वाढेल. उत्पन्न वाढल्यावर ते बचत करतील आणि आपले पैसे चांगल्या कारणाकरिता गुंतवितील अशी अपेक्षा होती. अशा रीतीने त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारेल. परंतु प्रत्यक्षात उलटेच घडले. काही कोळयांनी नेहमीइतकेच मासे मिळाल्यानंतर आपले काम थांबविले. ज्या कोळयांनी अधिक मासे पकडून अधिक पैसे मिळविले त्यांनी आपले पैसे दारू व इतर चैनीच्या गोष्टींवर खर्च केले. अशा रीतीने आर्थिक विकास असा झालाच नाही आणि कोळयांच्या राहणीमध्ये खरीखुरी सुधारणा झालीच नाही.

(२) **बारपली ग्रामसेवा**

चांगल्या विचारपूर्वक ठरविलेल्या आणि मुबलक आर्थिक साहाय्य दिलेल्या योजनाही विक्रम प्रेरणेअभावी अयशस्वी होतात. बारपली ग्रामसेवा योजना ही याचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. बारपली ही योजना अमेरिकन फ्रेंड्स सर्व्हिस कमिटी या संस्थेने १९५२ ते १९६२ या दहा वर्षांत ओरिसामध्ये राबविली. या संस्थेने या योजनेकरिता साठ लाख रुपये भांडवल दिले. या योजनेचे उद्देश पुढीलप्रमाणे होते :

(अ) लोकांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळावे.

(ब) त्यांनी रोगराई वाढू नये म्हणून संडासांचा उपयोग करावा.

(क) आपल्या उत्पन्नात भर टाकण्याकरिता भाजीपाल्याची लागवड करावी व कुक्कुटपालन करावे.

(ड) एक चर्मकारांची व एक विणकरांची सहकारी संस्था स्थापन करावी.

या योजनेमध्ये गावकऱ्यांना सहभागी करून घेण्यात आले होते. प्रत्येक वेळी त्यांच्या इच्छा किंवा गरजा काय आहेत हे जाणून घेण्याकरिता त्यांचा सल्ला घेण्यात आला. दहा वर्षांनंतर डॉक्टर थॉमस फ्रेझर या मानवजातिशास्त्रज्ञाने या योजनेतून काय निष्पन्न झाले याबाबत पाहणी केली. त्याचे निष्कर्ष थोडक्यात पुढे दिले आहेत :

(अ) या योजनेमुळे १५४ पंप असलेल्या विहिरी गावकऱ्यांकरिता उपलब्ध झाल्या. त्यामुळे शुद्ध पाणी मिळू लागले.

(ब) प्रथम प्रथम गावकऱ्यांनी अधिक भाजीपाला पिकविला. परंतु विक्रीची व्यवस्था नसल्यामुळे किमती घसरल्या आणि त्यामुळे या लोकांनी अधिक भाजीपाला पिकविण्याचे सोडून दिले.

(क) गावठी कोंबड्यांऐवजी परदेशी कोंबड्यांची पैदास सुरू करण्यात आली. परंतु दहा वर्षांनंतर या सुधारणेचा मागमूसही उरला नाही. फ्रेझरच्या शब्दांत याचे कारण म्हणजे, "नव्या तऱ्हेच्या कोंबड्यांच्या पिलांचे संरक्षण फार काळजीपूर्वक करावे लागते. त्यांना गावठी पिलांप्रमाणे जलद पळता येत नसल्यामुळे तारेच्या कुंपणाच्या संरक्षणाची आवश्यकता असते. ही व्यवस्था न केल्यामुळे ही सर्व पिले गावठी कुत्र्यांनी खाऊन टाकली. अशा रीतीने कोंबड्यांची जात सुधारण्याच्या या प्रयोगातून सर्व कोंबड्यांचा निःपातच झाला."

(ड) सहकारी संस्थेबद्दल बोलायचे म्हणजे प्रथम प्रथम विणकऱ्यांची सहकारी संस्था यशस्वी रीतीने वाटचाल करीत होती. परंतु नंतर अंतर्गत भांडणे आणि स्पर्धा यांमुळे तिच्या कामात व्यत्यय येऊ लागला. चर्मकारांची सहकारी संस्था चालूच झाली नाही. त्यांनी मध्येच आपले लक्ष जनावरांच्या हाडापासून खत तयार करण्याच्या योजनेकडे वळविले.

थोडक्यात म्हणजे साठ लक्ष रुपयांच्या खर्चातून निष्पत्ती फारच थोडी झाली. याकरिता विक्रम प्रेरणेची जोपासना करणे आत्यंतिक महत्त्वाचे आहे.

मॅक्क्लेलंडच्या मते शैक्षणिक उपक्रमांच्या द्वारे विक्रम प्रेरणा जागृत करून तिचे संवर्धन करता येते. जपानी लोक प्रत्येक व्यक्तीला नोकरीच्या कालावधीत सतत शिक्षण देण्यावर भर देतात. या शिक्षणाचा उद्देश साधाच परंतु अतिशय महत्त्वाचा आहे: "प्रत्येकाला आपल्या दैनंदिन कामात परिपूर्णता कशी साधता येईल, आपल्या कामामध्ये एकसारखी सुधारणा कशी करता येईल." ही परिपूर्णतेची ओढ फार लाभदायक आहे. या भावनेमुळे मानसिक वैफल्यापासून माणसाचे रक्षण होते आणि त्यामुळेच खरोखर श्रेष्ठ अशी संस्कृती निर्माण होऊ शकते.

आपल्या घटनेमध्ये याबाबत सुधारणा करण्यात आली आहे ती अर्थपूर्ण आहे. या घटनेतील दुरुस्तीप्रमाणे भारतातील प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य पुढीलप्रमाणे आहे :

> "सर्व वैयक्तिक आणि सामुदायिक क्षेत्रात परिपूर्णता आणण्याकरिता प्रत्येकाने प्रयत्नशील असले पाहिजे. त्यामुळेच राष्ट्राला सतत आपल्या उपक्रमांमध्ये व कार्यामध्ये यशाचे नवे नवे टप्पे गाठता येतील."

□ □

तेरा

काम ही एक नैतिक जबाबदारी आहे

आपल्या जीवनातील सुखसोयी हजारो लोकांच्या कामावर अवलंबून असतात याची लोकांना क्वचितच जाणीव असते. सकाळी उठल्यानंतर जवळजवळ प्रत्येकाला गरमगरम कपभर चहाची अपेक्षा असते. हा चहाचा कप हजारो लोकांच्या परिश्रमामुळे आपल्याला मिळतो हे उघड आहे. चहा करण्याकरिता आपल्याला पुढील गोष्टी लागतात :

साहित्य : (१) स्वच्छ पिण्याचे पाणी, (२) चहा, (३) साखर, (४) दूध.

साधने : (१) गॅस (किंवा तत्सम स्टोव्ह, चूल वगैरे) व आगपेटी, (२) भांडे, (३) कपबश्या आणि (४) चमचे, गाळणे, इत्यादी.

प्रथम पाण्याचा विचार केला तर मुंबईसारख्या मोठ्या शहरात पाणी-पुरवठ्याच्या व्यवस्थेकरिता मोठे तलाव बांधावे लागतात. पाणीपुरवठ्याची अवाढव्य यंत्रणा निर्माण करून तिची सतत व्यवस्था पाहावी लागते. या कामावर शेकडो लोक काम करतात. चहाचे मळे आसामसारख्या दूरच्या प्रदेशात आहेत आणि तेथून शेकडो लोक काम करीत असलेल्या वितरण यंत्रणेमार्फत तो ग्राहकांना उपलब्ध केला जातो. यानंतर साखर कारखान्यांच्या

यंत्रसामग्रीचा विचार करणे योग्य होईल. या यंत्रसामग्रीच्या उत्पादनामध्ये खाणीतून कोळसा व लोखंड बाहेर काढणे, पोलाद तयार करणे, यांत्रिक हत्यारे तयार करणे अशा लांबलचक क्रियाप्रक्रियांच्या मालिकेचा अंतर्भाव होतो. या कामामध्ये हजारो लोक काम करतात. दूधपुरवठ्याबद्दलही हेच खरे आहे. गॅस, स्टोव्ह, कपबश्या, चमचे वगैरे वस्तूंच्या उत्पादनाकरिताही शेकडो लोक काम करतात. जर सकाळी दुधाची गाडी वेळेवर आली नाही तर आपण अगदी अस्वस्थ होतो. टायर फुटल्यामुळे गाडीला वेळ होऊ शकतो. गाडीची निगा बरोबर ठेवली नाही किंवा रस्ते खराब असले तर टायर फुटते.

अशा रीतीने चहाच्या एका कपाकरिता हजारो लोकांना काम करावे लागते. आणि आपल्याला चहाखेरीज अनेक गोष्टींची आवश्यकता असते. आपल्या अस्तित्वाकरिता व आपल्या सुखसोयींकरिता लाखो लोक काम करीत असतात. युनायटेड स्टेट्समध्ये जवळजवळ ३४,००० निरनिराळे व्यवसाय आहेत. यावरून हे स्पष्ट दिसते की आधुनिक जगात आपण फार मोठ्या प्रमाणात परस्परांवर अवलंबून आहोत.

प्रत्येकजण एक किंवा फार तर काही गोष्टी निर्माण करतो किंवा सेवा पुरवितो. परंतु प्रत्येकाला अनेक गोष्टी आणि विविध सेवा यांची आवश्यकता असते. आपण जर चांगल्या वस्तू निर्माण केल्या नाहीत किंवा आपले सेवाकाम व्यवस्थित केले नाही तर आपल्याला चांगल्या वस्तू मिळाव्या किंवा योग्य सेवा मिळावी अशी अपेक्षा करण्याचा नैतिक अधिकार राहात नाही.

काही दिवसांपूर्वी एका मनोरंजक घटनेचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. युरोपमधील एका शहरात काही तरुण परिचारिका बसमधून प्रवास करीत होत्या. बसचा कंडक्टर उर्मट असल्यामुळे त्यांचे त्याच्याबरोबर कडाक्याचे भांडण झाले. हे भांडण चालू असतानाच बसला मोठा अपघात झाला आणि कंडक्टरला हॉस्पिटलमध्ये न्यावे लागले. त्याच हॉस्पिटलमध्ये त्या परिचारिका काम करीत होत्या. त्या रुग्णालयात त्या कंडक्टरलाही अत्यंत वाईट रीतीने वागविण्यात आले आणि याबद्दल वाहतूक कामगार संघटनेने जोरदार तक्रार केली. परंतु यामध्ये एक मूलभूत प्रश्न असा उपस्थित होतो की जो कंडक्टर आपल्या उतारूंबरोबर अरेरावीने वागतो त्याला आपल्याला इतरांनी सौजन्याने वागवावे अशी अपेक्षा करण्याचा नैतिक अधिकार आहे काय ?

ई. एफ्. शूमाकर या मध्यम तंत्रशास्त्रावरील (इंटरमीजिएट टेक्नॉलाजी) तज्ज्ञाने आपल्या 'स्मॉल इज ब्यूटिफुल' या विचारप्रवर्तक ग्रंथात असे प्रतिपादन केले आहे की सुशिक्षित लोकांवर समाजाचे मोठे ऋण आहे. त्याने याबाबत चिनी लोकांनी केलेल्या हिशोबाचा आधार घेतला आहे. या हिशोबाप्रमाणे विश्वविद्यालयात एका विद्यार्थ्यास पाच वर्षे शिक्षण देण्याकरिता तीस शेतकऱ्यांना पाच वर्षे काम करावे लागते. एक पदवीधर तयार करण्याकरिता अशा रीतीने १५० शेतकरी-वर्षे लागतात. प्रत्येक सुशिक्षित माणसाला या समाजाच्या आपल्यावरील ऋणाची कल्पना असली पाहिजे आणि आपले शिक्षण झाल्यावर आपण समाजाची सेवा केली पाहिजे याची जाणीव असली पाहिजे. शूमाकरने एक मूलभूत प्रश्न उपस्थित केला आहे : "शिक्षण म्हणजे स्वतःकरिता फायदे मिळविण्याचा परवाना आहे की लोकांची सेवा करण्याचे पवित्र बंधन आहे ?" सुशिक्षित व्यक्तीने सतत आपल्या हिताचाच विचार करणे हे काही भूषणास्पद नाही. तसे करणे म्हणजे कृतज्ञतेचा अभाव होय. आपल्या शिक्षणाचा भार ज्यांनी सोसला त्यांचे शोषण करण्याचा हा प्रकार होय.

वीर पेंढारकर*

शूमाकर ह्या अर्थशास्त्रज्ञाला गरिबांच्या हिताबद्दल अत्यंत कळकळ होती. त्याने आग्रहपूर्वक असे सांगितले आहे की भारतातील सुशिक्षित लोकांनी अशिक्षित लोकांची सेवा करण्याकरिता खेड्यांमध्ये परत जाणे हे त्यांचे पवित्र कर्तव्य आहे. श्री. शंकर गंगाराम पेंढारकर (वीर पेंढारकर या नावाने सुपरिचित असलेले) ह्या स्वातंत्र्यसैनिकांनी ह्याच विचाराने प्रेरित होऊन अत्यंत बहुमोल असे शैक्षणिक कार्य केले आहे.

१९५३ साली खारेपाटण या रत्नागिरी जिल्ह्यातील एका दुर्लक्षित खेड्यामध्ये आपले शैक्षणिक कार्य करण्याचे त्यांनी ठरविले. त्या वेळी तेथे फक्त सातवीपर्यंतच शिक्षणाची सोय होती. पेंढारकर यांनी या ठिकाणी आपली शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचे ठरविले. सुरुवातीला त्यांच्या शाळेमध्ये फक्त दहाच विद्यार्थी आणि एक शिक्षक होते. आज ह्या संस्थेचे रूपांतर ज्युनियर कॉलेजमध्ये

---

* या विषयाबद्दल वीर पेंढारकर यांचे वडील बंधू श्री. ग. गं. पेंढारकर यांनी बहुमोल सूचना केल्या. त्याबद्दल लेखक त्यांचा ऋणी आहे.

झालेले आहे आणि जवळजवळ १०० खेड्यांतील मुलांच्या शिक्षणाची सोय झाली आहे.

पेंढारकर यांना फार मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागले. त्यांनी आपल्या शाळेचा प्रारंभ केला तो आपल्या पत्नीच्या साहाय्याने एका लहान धूळ खात पडलेल्या गुदामामध्ये. आज या विद्यालयाची स्वत:ची आकर्षक अशी इमारत आहे. त्याखेरीज मुलामुलींकरिता वसतिगृहे आहेत. पेंढारकरांचा केवळ पुस्तकी शिक्षणावर भर नाही. त्यांच्या मते शिक्षण म्हणजे केवळ ज्ञानार्जन नव्हे. शिक्षणामुळे जबाबदारीची जाणीव निर्माण झाली पाहिजे व सामाजिक पुनर्रचनेबद्दलही जिव्हाळा वाटला पाहिजे. विधायक कार्यामध्ये सहभागी होऊनच शैक्षणिक उद्दिष्टांबद्दल नव्याने विचार करता येतो आणि शैक्षणिक पद्धतीही परिपूर्ण करता येतात. पेंढारकर यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान असे आहे. पीटर ड्रकर याने असे म्हटले आहे की शिक्षणाला आता एक नवीन अर्थ प्राप्त झाला आहे. शिक्षण म्हणजे केवळ ज्ञानार्जन नसून त्या ज्ञानाचे समाजाच्या हिताकरिता कृतीमध्ये रूपांतर झाले पाहिजे.

पेंढारकर यांच्या गतिशील आणि कल्पकतापूर्ण नेतृत्वाने प्रभावित होऊन खारे-पाटण येथील खेड्यातील लोकांनी व विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेच्या परिसराचे रूपच बदलून टाकले आहे. शाळेच्या आजूबाजूच्या ओबडधोबड खडकाळ प्रदेशाऐवजी आता तेथे फळाफुलांचे उद्यान, छोटी छोटी शेते आणि त्यांना जोडणारे रस्त्यांचे जाळे निर्माण केले आहे. या आपल्या आवडीच्या कामाकरिता या सर्वांनी रात्रंदिवस स्वेच्छेने काम केले. अशा त-हेचे काम शारीरिक दृष्ट्या तर आल्हादकारक असते पण त्यात सौंदर्याचीही अनुभूती येते. उदाहरणार्थ, सुंदर बागेमुळे आपल्याला निसर्गाशी एकरूप होण्याचा सूक्ष्म असा अनोखा अनुभव येतो.

ही संस्मरणीय कामगिरी हे पंचवीस वर्षांच्या नि:स्वार्थीपणाने, सुव्यवस्थित रीतीने सातत्यपूर्वक केलेल्या प्रयत्नांचे फळ आहे. आपल्या कामात पेंढारकर रमलेले आहेत, कारण त्यातून त्यांना जीवितसाफल्याचा आनंद मिळत आहे. त्यांचे शेठ नवीनचंद्र मफतलाल विद्यालय म्हणजे शूमाकर याच्या 'छोट्या गोष्टी सुंदर असतात' या तत्त्वाचे एक अगदी अनुरूप असे उदाहरण आहे. शिक्षणाच्या द्वारे सामाजिक पुनर्रचना करणे हे या संस्थेचे मूलभूत उद्दिष्ट आहे.

□ □

चौदा

काम आपला सर्वश्रेष्ठ गुरु होय

काम हा आपल्या जन्माचा सोबती आहे; त्याचप्रमाणे तो आपला सर्वश्रेष्ठ गुरूही आहे. पुष्कळ गोष्टी अशा असतात की त्या शिकविता येत नाहीत, त्या फक्त शिकता येतात. 'सरावामुळे माणूस परिपूर्ण होतो' हे वचन सर्वश्रुतच आहे. चांगला गवई आपला रोजचा रियाझ कधीच चुकवीत नाही.

एका सुप्रसिद्ध शास्त्रज्ञाला उत्कृष्ट पोहता येत होते. आपण कसे पोहतो याचे त्याने विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला तेव्हा तो अगदी गोंधळून गेला. पाण्यात त्याने काहीही केले तरी तो तरंगतच राहिला. अशा नैपुण्याचे विश्लेषण असे करताच येत नाही किंवा त्याचे स्वरूप संपूर्णतः कळूही शकत नाही.

कामामुळे आपल्याला आपल्या कार्याबद्दल, आपल्या हाताखालच्या लोकांबद्दल, सहकाऱ्यांबद्दल, आपल्या वरिष्ठांबद्दल आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्या स्वतःबद्दल पुष्कळच ज्ञान मिळते. काम हा एक कडकपणे काम करून घेणारा धनी आहे. काम आपल्याला शिस्त लावते. काम म्हणजे आत्मनिरीक्षण.

आपल्या कामातूनच आपल्याला स्वतःला समजून घेता येते. एका अर्थाने आपली आपल्यालाच ओळख नसते. सातत्यपूर्वक निष्ठेने आणि परिश्रमपूर्वक काम केले म्हणजे आपल्याला आपल्या मर्यादा कळतात व त्याचबरोबर आपल्या अंगी असलेल्या पण आपल्याला कल्पनाही नसलेल्या सुप्त आवडींची, प्रवृत्तींची आणि नैपुण्याची जाणीव होते.

आपले काम कसे करावे हे कामातूनच आपल्याला कळते. काम कधी करावे, कधी करू नये हे जाणणे ही एक कला आहे. ' दि न्यू इंडस्ट्रियल स्टेट ' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत प्राध्यापक गॅलब्रेथ याने काही अर्थपूर्ण विधाने केली आहेत.

गॅलब्रेथ याने आपल्या ग्रंथास १९५७ मध्ये प्रारंभ केला. परंतु तो १९६७ मध्ये प्रसिद्ध करण्यात आला. अनुभवावरून त्याला असे कळून चुकले आहे की चौथ्या किंवा पाचव्या वेळेस त्याच्या लिखाणात खरी उत्स्फूर्तता येते. त्यामुळे तो हे लेखनाचे काम परत परत करीत होता. आपल्या कुवतीप्रमाणे हे अवघड काम करण्याचा त्याने प्रयत्न केला आणि १९६१ मध्ये या ग्रंथाचा प्राथमिक मसुदा प्रथम तयार झाला. परंतु त्याची एकदम भारतामध्ये राजदूत म्हणून नेमणूक करण्यात आली. त्यामुळे त्याने आपले बहुमोल हस्तलिखित बँकेच्या व्हॉल्टमध्ये ठेवले. भारतामधील नेमणूक संपुष्टात आल्यानंतर या विषयाबद्दल गॅलब्रेथ एका नव्या दृष्टिकोनातून विचार करू लागला. ग्रंथाचा पहिला मसुदा त्याज्य ठरला. यावरून त्याने असा निष्कर्ष काढला आहे की प्रत्येक लेखकाने प्रकाशनापूर्वी दीर्घ काळ सुटी घेऊन चिंतन करावे.

दुसऱ्या एका नवोदित लेखकाचा अनुभवही लक्षात घेण्याजोगा आहे. तो एका मोठ्या विषयाचा जीव ओतून अभ्यास करीत होता. निरनिराळ्या ग्रंथालयांतील शेकडो ग्रंथांचे त्याने परिशीलन केले, परंतु या व्यासंगाला व उत्साहाला शिस्तीची अननुभवामुळे जोड नव्हती.

त्याने मोठ्या घाईने या ग्रंथांच्या आधारे विस्तृत अशा टिप्पण्या तयार केल्या. शेवटचा मसुदा तयार करताना अचूकतेकडे काळजीपूर्वक लक्ष द्यायचे असे त्याने ठरविले. त्यामुळे त्याने निरनिराळ्या घटना, उदाहरणे यांच्या संदर्भाच्या नोंदी काळजीपूर्वक केल्या नव्हत्या. नंतर मात्र त्याला धक्काच बसला. कारण केवळ स्मृतीवर विश्वासणे धोक्याचे आहे असे त्याच्या लक्षात आले. आणि नंतर ह्या सर्व गोष्टी पडताळून पाहणे फारच अवघड होऊन बसले आणि त्याकरिता बेसुमार

वेळ लागला. परंतु यामुळे तो दोन साधेच पण महत्त्वाचे धडे शिकला. पहिला धडा असा की अचूकतेकडे प्रथमपासूनच लक्ष दिले पाहिजे आणि दुसरे असे की संदर्भांची वेळच्या वेळीच नोंद केली म्हणजे नंतर फेरतपासणी काम सुलभ होते. कामातूनच तो हे अमोल धडे शिकला आहे.

या संदर्भात सैनिकी इतिहासातील एका मनोरंजक घटनावृत्ताचा उल्लेख करणे इष्ट होईल. इअन हॅमिल्टन (१८५३–१९४७) हा आपल्या युद्धविषयक आणि प्रशासनविषयक लिखाणाबद्दल सुप्रसिद्ध आहे. त्याचा 'सोल ऑफ दि आर्मी' हा ग्रंथ व्यवस्थापनातील अभिजात ग्रंथ समजला जातो. त्याचा 'गॅलिपोली डायरी' हा ग्रंथही उठावदार आणि मनोज्ञ आहे. त्याची शैली सुस्पष्ट, सुमधुर आणि सुबोध आहे. विन्स्टन चर्चिलने त्याची बुद्धिमत्ता विशाल असल्याची ग्वाही दिली आहे. परंतु गॅलिपोलीच्या मोहिमेचा त्याने चुथडा केला. याचे कारण असे की लढाईमध्ये यशस्वी होण्याकरिता सेनापतीमध्ये काही गुणांची आवश्यकता असते. त्यांची सुस्पष्ट व्याख्या करता येत नाही. हे गुण म्हणजे आत्मविश्वास, व्यवहारज्ञान व विवेचक दृष्टी आणि खरीखुरी परिस्थिती ओळखण्याचे कसब. हे गुण एखाद्या सेनापतीमध्ये आहेत की नाही हे फक्त रणक्षेत्रावरच दिसून येते. त्यामुळे रणक्षेत्रावरील प्रत्यक्ष लढाईच्या अनुभवाला दुसरा पर्याय नाही. लढाईची कागदी योजना तयार करणे आणि प्रत्यक्ष रणक्षेत्रावरील धामधुमीत शांतपणाने आपले आपण निर्णय घेणे यामध्ये महदंतर आहे. आपल्या दिवाणखान्याच्या गालिच्यावर लाकडी फळी ठेवून चालणे निराळे आणि पाचशे फूट खोलीच्या खड्ड्यावर फळी ठेवून चालणे निराळे. चेस्टर बर्नर्ड ह्या व्यवस्थापन विचारवंताने असे म्हटले आहे की खराखुरा निर्णय घेण्याकरिता त्या निर्णयाची जबाबदारी स्वीकारावी लागते.

डग्लस मॅक्‌ग्रेग या व्यवस्थापन मानसशास्त्रज्ञाने असे रास्तपणे म्हटले आहे की व्यवस्थापकीय नैपुण्य प्रत्यक्ष व्यवस्थापनाच्या अनुभवातूनच निर्माण होऊ शकते. व्यवस्थापकाकडे जेव्हा जबाबदारी देण्यात येते तेव्हाच त्याच्या शिक्षणास प्रारंभ होतो. प्रत्यक्ष काम करीत असतानाच तो शिकतो. वर्गामध्ये किंवा परिसंवादामध्ये अत्यंत गुंतागुंतीच्या समस्यांवर अगदी साधे सोपे तोडगे सुचविता येतात, परंतु प्रत्यक्ष व्यवहारात असे आढळते की साध्या प्रश्नाबाबतही काही करता येत नाही.

सारांश असा की काम हा आपला सर्वश्रेष्ठ गुरू आहे. तो दयाळू आहे तसा अगदी कडकही आहे. हा गुरू बोलत नाही तरीही अत्यंत वक्तृत्वशाली आणि प्रभावी आहे. तो प्रकाश देतो, मार्गदर्शन व साहाय्य करतो. त्याचे आपल्यावर सतत लक्ष असते आणि आपल्या आवडी, आपली कार्यक्षमता, आपली निष्ठा व चिकाटी यांची परीक्षा घेतो. तो आपल्याला अनेक बहुमोल गोष्टींचे शिक्षण देतो. या गोष्टी अमूर्त स्वरूपाच्या असल्यामुळे त्या पुस्तकातून शिकता येत नाहीत. अशा या श्रेष्ठ गुरूस आपण सतत वंदन केले पाहिजे.

□ □

पंधरा

छोटया गोष्टी क्रांतिकारक असतात

प्रत्येक जण आपल्या देशावर प्रेम करतो आणि प्रत्येकाला देशसेवेची मोठी ओढ असते. स्वदेशाभिमानाची भावना सर्वत्र आढळते. परंतु आपल्या देशाची खरीखुरी सेवा आपले दैनंदिन काम उत्कृष्ट रीतीने करून कोणताही गाजावाजा न करता अगदी साध्या रीतीने आपण करू शकतो याची लोकांना क्वचितच जाणीव असते.

अर्थशास्त्रज्ञ असे सांगतात की मनुष्यबळ हीच राष्ट्रांची खरीखुरी संपत्ती होय. मनुष्यबळ याचा अर्थ लोकांची शक्ती, त्यांचे नैपुण्य, बुद्धिमत्ता, सर्जनशीलता, ज्ञान यांचा उत्पादनाकरिता किंवा उपयुक्त सेवेकरिता उपयोग करणे हा आहे.

लोक हीच आपली सर्वश्रेष्ठ मत्ता आहे हे खरेच आहे. यंत्रे, इमारती व इतर साधनसामग्री या निर्जीव गोष्टी आपण होऊन काहीच निर्माण करू शकत नाहीत. त्यांचा विधायक उपयोग फक्त माणूसच करू शकतो. यंत्रचालक नसेल तर यंत्र काहीच उत्पादन करू शकत नाही. माणसे विविध रीतीने सर्जनशील असू शकतात. ते संघटना निर्माण करतात, नवीन तंत्रे, यंत्रे व प्रक्रिया

यांचा शोध लावतात आणि स्वत:चा विकास करून घेतात. माणसाच्या विकासास मर्यादा अशी नाहीच म्हटले तरी चालेल. संघटनांची रचना आणि कार्यपद्धती व्यक्तीच्या विकासास अनुरूप अशा पद्धतीने केली तर दोहोंचा विकास होऊ शकतो.

आधुनिक जगात माणूस अनेकदा पोरका होतो, तो अलग पडतो. एकाकी-पणाच्या भावनेने तो दु:खीकष्टी होतो. आपल्या जीवनाला काहीच अर्थ नाही या भावनेने तो व्यथित होतो. कॉलिन विल्सनने म्हटल्याप्रमाणे आपण किडयासमान आहोत की नायक आहोत या संभ्रमात तो पडतो. हताशपणे काही लोक किडा होण्याचे पत्करतात. ही अधोगती आहे. प्रत्येक समाजाला कातारी, जोडकाम करणारे, घाण गोळा करणारे या सर्वांची शास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्ते यांच्याइतकीच जरुरी असते. हे सर्व आवश्यक अशी कामे करीत असतात.

असंख्य लहान लहान गोष्टीही क्रांतिकारक बदल अनेकदा करू शकतात. एखाद्या कारखान्याची संस्कृती आणि त्याची कार्यक्षमता असंख्य अशा सुव्यवस्थितपणे केलेल्या दैनंदिन कार्यावर व अनेक फलदायी औपचारिक व अनौपचारिक चर्चांवर अवलंबून असते. लोकांनी जर ही छोटी छोटी कामे जीव ओतून केली तर कारखान्याचा कायापालट होऊन तेथे सर्जनशीलतेला उधाण येईल. अॅब्रहम मॅस्लॉने लहान लहान गोष्टींचे महत्त्व सुरेख रीतीने सांगितले आहे. तो म्हणतो : "आपण सहभागी असलेली कोणतीही छोटी सुधारणा, छोटे कार्य यशस्वी रीतीने पार पडले तर त्याबद्दल आपण सर्व लोकांनी अभिमान बाळगण्यास, त्याबद्दल आपण फुलून जाण्यास, आपला स्वत:बद्दलचा आदर द्विगुणित करण्यास शिकले पाहिजे." एका तरुणाचे त्याने उदाहरण दिले आहे. त्याने मेक्सिकोमध्ये अनेक वर्षे पिण्याच्या स्वच्छ पाण्याचा पुरवठा करण्याकरिता विहिरी खोदण्यामध्ये खर्च केली. त्याला फक्त तीनच विहिरी खोदण्यात यश आले आणि दूषित पाण्याऐवजी स्वच्छ पाण्याचा उपयोग करण्यास लोकांना शिकविण्याकरिता पुष्कळच वेळ खर्ची घालावा लागला.

चार्ल्स डार्विन याने असे दाखवून दिले आहे की लहान आणि क्रमाक्रमाने होणाऱ्या बदलांमुळे कालांतराने मोठे व क्रांतिकारक बदल होऊ शकतात. त्याने

आपले शेवटचे पुस्तक गांडुळांवर (Earthworms) लिहिले. या विषयावर त्याचे संशोधन चाळीस वर्षे चालू होते. त्याने असे दाखवून दिले आहे की डाऊन (इंग्लंड) येथील खडूच्या टेकड्यांवर दर वर्षी प्रत्येक एकरी गांडुळे १८ टन माती वर आणतात. क्षुद्र आणि नगण्य अशा गांडुळांची ही केवढी मोठी कामगिरी होय ! ॲस्कॉट येथील सुप्रसिद्ध रेसकोर्सची सुधारणा करण्याकरिता तज्ज्ञांनी गांडुळांची संख्या वाढवावी अशी शिफारस केली.

अगदी निर्बुद्ध अशी व्यक्तीही गांडुळापेक्षा अनंत पटींनी सर्जनशील व विधायक असते. माणसे जर गांडुळांप्रमाणे सहकार्याने कार्य करू लागली तर लवकरच पृथ्वीवर नंदनवन निर्माण होईल. चांगल्या समाजात लोक आपल्या दैनंदिन कामाबद्दल दक्ष असतात आणि आपल्या क्षेत्रात मग ते कितीही छोटे असो, त्यामध्ये प्रथम दर्जाचे प्रावीण्य मिळविण्याकरिता सतत प्रयत्न करतात.

एका चिनी कल्पित कथेचे हेच तात्पर्य आहे. सामान्य लोक जर प्रखर ध्येयवादाने प्रेरित झाले आणि त्यांनी निष्ठेने काम केले तर ते अशक्यप्राय गोष्टी ही साध्य करू शकतात.

मूर्ख माणसाने डोंगर कसा हलविला

उत्तर चीनमध्ये एक वृद्ध माणूस राहात होता. तो उत्तर प्रदेशातील डोंगरातील मूर्ख माणूस म्हणून ओळखला जाई. त्याचे घर दक्षिणाभिमुख होते आणि त्याच्या दारासमोरच तैहँग व वँगवू ही दोन उत्तुंग शिखरे होती आणि त्यांचा त्याला अडथळा होई. त्याने आपल्या मुलांना बोलाविले आणि हा अडथळा दूर करण्याकरिता त्यांनी डोंगर उकरण्यास मोठ्या निर्धाराने सुरुवात केली. दुसऱ्या एका वृद्ध माणसाने, ज्याला सुज्ञ वृद्ध माणूस म्हणत, हे पाहिले आणि तो तुच्छतेने म्हणाला, "काय हा मूर्खपणा ! एवढ्या थोड्या लोकांना हे मोठे अवाढव्य डोंगर कधीच उकरता येणार नाहीत." तो मूर्ख समजला जाणारा माणूस म्हणाला, "माझ्या निधनानंतर माझे मुलगे हे काम चालू ठेवतील, त्यांच्या निधनानंतर माझे नातू असतील आणि नंतर त्यांचे पुत्र आणि नातू असतील आणि असेच हे अनंत काळ चालू राहील. डोंगर उंच आहेत परंतु त्यांची उंची काही वाढत नाही आणि आम्ही जेवढे थोडे उकरतो तेवढी त्यांची उंची कमी होते. अशा

रीतीने त्यांना का समूळ उकरून काढता येणार नाही?" त्या सुज्ञ वृद्धाचे अशा रीतीने खंडन केल्यावर, त्याने खणण्याचे काम दर दिवशी कोणत्याही प्रकारे विचलित न होता निर्धाराने चालू ठेवले. देवाला हे पाहून दया आली आणि त्याने पृथ्वीवर दोन देवदूत पाठविले आणि त्यांनी हे दोन डोंगर आपल्या पाठीवरून उचलून नेले.

आणि 'झिगुबी प्रॉडक्शन ब्रिगेड' या सेनेने या कल्पित कथेचा आदर्श डोळयांपुढे ठेवून एका उफाळणाऱ्या नदीच्या पात्रातून पुष्कळशी जमीन परत उपयोगात आणली. हे कधीही शक्य होणार नाही असा समज होता.

□ □

सोळा

काम हेच दुःखावरील रामबाण औषध आहे

मानवी जीवनाचा दुःख हा एक अपरिहार्य असा भाग आहे. जोपर्यंत मरण अटळ आहे तोपर्यंत दुःखदेखील अटळ आहे. परंतु आपल्या आवडत्या व्यक्तीच्या निधनानंतरही दुःखातिरेक टाळणे सुज्ञतेचे आहे. अत्यंत उद्विग्नतेच्या काळातही आपण आपली मन:शांती राखली पाहिजे. अशा वेळी कामच माणसाच्या मदतीस धावून येते आणि त्याचे चांगले सांत्वन करते. अशा वेळी फुरसत तापदायकच ठरते. फुरसतीचा वेळ खरोखर आनंदात घालवावयाचा असेल तर प्रथम कामामध्ये समाधान मिळाले पाहिजे. मादक औषधे आणि मद्यपान यांच्यापासून तात्काळ काही आराम पडला तरी अखेरीस या गोष्टी विनाशास आणि माणुसकीच्या ऱ्हासास कारणीभूत होतात. विधायक कामापासून मिळणारा आनंद हेच दुःखावरचे खरेखुरे औषध आहे आणि काही वेळा दुःखामुळेच काही महनीय काम करण्यास स्फूर्ती मिळते. सर जेम्स टॉमसन (१८०४–५३) याच्या बाबतीत असेच घडून आले. भारतातील सनदी नोकराचा तो मुकुटमणी समजला जातो.

जेम्स टॉमसन

टॉमसन हा बंगालमध्ये वयाच्या अठराव्या वर्षी एक लिपिक म्हणून नोकरीस लागला आणि सन १८४३ मध्ये वायव्य प्रांताचा लेफ्टनंट गव्हर्नर या हुद्द्यापर्यंत पोहोचला. सन १८५३ मध्ये या हुद्द्यावर काम करीत असतानाच तो मरण पावला.

जेम्स टॉमसनचे कर्तृत्व असामान्य समजले जाते. तो सार्वजनिक बांधकामाचा जनक समजला जातो. ग्रँड ट्रंक रोड व गंगा नदीवरील कालवा ही त्याची संस्मरणीय कामगिरी होय. रुकडी येथील इंजिनिअरिंग कॉलेज त्यानेच स्थापन केले. महसूल खात्याचा त्याच्या प्रांतातील तो वास्तुशास्त्रज्ञ समजला जातो. त्याचा 'डायरेक्शन्स टू रेव्हिन्यू ऑफिसर्स' हा सारग्रंथ महसूल खात्याच्या इतिहासात सुप्रसिद्ध आहे. कारागृहांच्या प्रशासनामध्ये त्याने अनेक मानवतावादी सुधारणा केल्या. तसेच कर्मचारीवर्गाच्या व्यवस्थापनात त्याने दूरदर्शी आणि सुज्ञपणाच्या सुधारणा केल्या. जनतेचे कल्याण हेच त्याच्या राज्यकारभाराचे सूत्र होते. त्याच्या हाताखाली अनेक प्रथम श्रेणीचे प्रशासक तयार झाले.

टॉमसनची प्रकृती नाजूकच होती तरी त्याने अत्यंत उत्साहाने अविश्रांत परिश्रम केले. त्याला इतके सामर्थ्य कोठून आले? त्याची स्फूर्तिदेवता कोण होती?

प्रिय पत्नीच्या निधनानंतर टॉमसनने स्वत:ला कामास सर्वस्वी वाहून घेतले. पत्नीच्या अकाली निधनामुळे त्याचे वैवाहिक जीवन दुर्दैवाने संपुष्टात आले. त्याच्या वैवाहिक जीवनाची प्रारंभीची काही वर्षे निरतिशय सौख्याची गेली. नंतर मात्र त्याची पत्नी फार आजारी पडली आणि तिला इंग्लंडला परतावे लागले. तेथे त्याने तिला बरे वाटावे म्हणून शर्थीचे प्रयत्न केले व तिची मोठ्या प्रेमाने शुश्रूषा केली परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही.

पत्नीच्या निधनामुळे टॉमसन फारच व्यथित झाला. यानंतर त्याने लोकसेवेचे व्रत स्वीकारून लोकांची मनोभावे सेवा केली. पत्नीच्या वियोगामुळे जरी तो अत्यंत दु:खीकष्टी झालेला होता तरी त्यामुळे तो खचून गेला नाही. असे म्हणतात की प्रिय व्यक्तीच्या निधनामुळे माणसाच्या स्वभावामध्ये अनेकदा हळुवारपणा येतो. टॉमसनच्या कार्यामध्ये या हळुवारपणाचा प्रत्यय येतो.

टॉमसनच्या अप्रतिहत प्रशासकीय कार्याची अव्याहत प्रेरणा प्रिय पत्नीची स्मृतीच होती. लोकहितैषी कार्याच्या विलक्षण ओढीमुळे त्याला आपले दु:ख सावरता आले. त्याने केलेली शाश्वत स्वरूपाची प्रशासकीय कामगिरी म्हणजे त्याच्या प्रिय पत्नीचे उत्कृष्ट स्मारकच होय.

☐ ☐

सतरा

कामामुळे आत्मसाफल्य शक्य होते

माणसाच्या गरजा अनंत आहेत. माणूस सतत काही शोधत असतो. तो नेहमी असमाधानीच असतो. आणि त्याच्या गरजा एकसारख्या बदलत असतात. अनेक दिवस उपाशी असलेला माणूस फक्त अन्नाचाच विचार करतो. त्या वेळी तो प्रेमाकडे तुच्छतेने पाहतो. परंतु पोट भरताक्षणीच प्रेमाकरिता तो झुरू लागतो. माणसाच्या विविध गरजांची श्रेणी आपल्याला पुढीलप्रमाणे उभारता येते. त्यावरून असे दिसेल की कौटुंबिक प्रेम सोडता इतर सर्व भावनांची परिपूर्णता कामातून होऊ शकते. काम ही अन्न किंवा पाणी याप्रमाणे अत्यावश्यक अशी गोष्ट आहे. माणूस आणि समाज यांचे यथार्थ आकलन होण्याकरिता कामाचा या दोहोंवर काय परिणाम होतो हे समजून घेणे आवश्यक आहे. माणसाला आपले जीवित-साफल्य कामातूनच साधता येते. कामाशिवाय सामाजिक जीवन तर अशक्य आहे.

मानवी गरजांची श्रेणी पुढीलप्रमाणे :

(१) पुरेसे उत्पन्न, चांगले घर, चांगले अन्न.

(२) नैसर्गिक अरिष्टांपासून म्हणजे पूर, धरणीकंप वगैरे, तसेच सामाजिक आपत्तींपासून उदाहरणार्थ अराजक, बेकारी यांपासून संरक्षण.

(३) कुटुंबियांचे, मित्रांचे, सहकाऱ्यांचे प्रेम.

(४) आत्मप्रशंसा, स्वाभिमान, आत्मविश्वास.

(५) प्रसिद्धी, मान्यता व प्रशंसा.

(६) ज्ञानाची आसक्ती आणि सखोल विचार करण्याची ओढ.

(७) आत्मसाफल्य, आत्मविकास.

(८) बिकट अडचणींवर मात करून अभूतपूर्व असा पराक्रम गाजविण्याची आंतरिक तळमळ (अतिशायितावाद).

(वरील विवेचन हे मॅस्लॉच्या सुप्रसिद्ध मानवी गरजांची श्रेणी या सिद्धांतावर आधारलेले आहे.)

या श्रेणीच्या कळसावर आत्मसाफल्य आहे. ही माणसाची सर्वांत महत्त्वाची गरज आहे. आत्मसाफल्य याचा साधा सरळ अर्थ असा, आपल्या अंगातील गुणांचा जास्तीत जास्त विकास. आत्मसाफल्य ही एक सतत चालू असणारी प्रक्रिया आहे. ती कधीही पूर्ण होत नाही. आत्मसाफल्याच्या मार्गाने वाटचाल करीत असलेल्या माणसाचे वर्णन थोडक्यात पुढीलप्रमाणे करता येईल : ही व्यक्ती आपल्या कामात पूजाभावाने रममाण झालेली असते. ती जबाबदारी स्वीकारण्यास तत्पर असते. ती स्वतंत्रपणे विचार करते. ती मूल्यांना महत्त्व देते. स्वत:ला समजावून घेण्याचा ती प्रयत्न करते व आपले अंतरंग खुले करण्यास सिद्ध असते. स्वत:बरोबर आणि इतरांशी सर्व बाबतींत ती प्रामाणिकपणे वागते. तिच्या वर्तनामध्ये उत्स्फूर्तता दिसून येते. तिचे वागणे साधे, सरळ व अकृत्रिम असते. तिच्या मनामध्ये दुर्विचारांना थारा नसल्यामुळे ती नेहमी प्रसन्न असते. आत्मसाफल्याकरिता जिद्दीने प्रयत्न करताना अशा व्यक्तीस आनंद होतो. आत्मसाफल्याच्या दिशेने आपली प्रगती होत आहे या भावनेने तिला परमोच्च आनंद होतो. आपले काम या जगातील सर्वांत पवित्र गोष्ट होय अशी तिची श्रद्धा असते. आणि मग काम हे काम राहात नाही. ते खेळाइतकेच हवेहवेसे वाटते. मग काम हेच कामाचे पारितोषिक होय अशी भावना होते.

अतिशायितावादी (Transcenders) हे आत्मसाफल्यवादी लोकांच्या पुढे एक पाऊल असतात. ते नवीन कल्पनांनी भारावलेले असतात. नावीन्याची त्यांना ओढ असते. अशक्य ते शक्य करण्याचा त्यांना ध्यास लागलेला असतो आणि त्याकरिता ते पराकाष्ठेचे प्रयत्न करतात. दुस्तर अशा अडचणींवर ते मात करतात.

महात्मा गांधी हे ह्या अर्थाने एक श्रेष्ठ अतिशायितावादी पुरुष होते. परंतु याचा अर्थ असा नाही की हा आदर्श गाठणे समाजातील सर्वश्रेष्ठ व्यक्तींनाच शक्य आहे. एखादा क्रिकेटपटूही आपल्या क्षेत्रात अतिशायितावादी असू शकेल. फलंदाजीचा तो एक नवीन विक्रम स्थापन करू शकेल. पीले हा सॉसरचा अनभिषिक्त राजा अतिशायितावादी आहे असे म्हटल्यास अनुचित होणार नाही. खेळातील त्याचे प्रावीण्य पाहून कोणीही चकित होतो. परंतु त्याला गर्व किंवा क्षुद्र वृत्ती यांचा स्पर्शही झालेला नाही. क्रीडांगणावर किंवा इतरत्र त्याचे वागणे अत्यंत सौजन्यशील असते.

(१) डग्लस बाडर : एक अतिशायितावादी आत्मसाफल्यसाधक

डग्लस बाडर हा दुसऱ्या महायुद्धातील पाय नसलेला फायटर स्कॉड्रन लीडर होता. त्याने व्यक्तिश: गाजविलेल्या शौर्याला बहुधा तुलनाच नाही. १९२८ मध्ये तो रॉयल एअर फोर्समध्ये दाखल झाला. १९३१ मध्ये हवाई कसरतीचे प्रात्यक्षिक दाखवीत असताना त्याचे विमान कोसळून त्याचा चक्काचूर झाला व त्याला आपले दोन्ही पाय गमवावे लागले.

रॉयल एअर फोर्सने त्याला दोन कृत्रिम पाय बसविले. या कृत्रिम पायांवर जवळजवळ खरे पाय असल्याप्रमाणे चालण्याचे शिकण्याकरिता त्याने फार मेहनत घेतली. परंतु १९३९ मध्ये युद्ध जाहीर होईपर्यंत त्याला परत विमानदलात दाखल होता आले नाही. पुढे त्याच्या २४२ क्रमांकाच्या स्कॉड्रनला फारच प्रसिद्धी मिळाली. त्याने स्वत: पंधरा विमाने पाडली. १९४१ मध्ये विंग कमांडर म्हणून त्याला बढती मिळाली.

१९४१ च्या ऑगस्टमध्ये त्याचे विमान पाडण्यात आले आणि त्याला कैद झाली. त्याच्या एका कृत्रिम पायासही धक्का लागला. या वेळेपर्यंत बाडर हा रॉयल एअर फोर्सप्रमाणेच लुफ्टवाफमध्ये (जर्मन हवाईदलामध्ये) दंतकथेचा विषय झालेला होता. जर्मन हवाईदलाने ही गोष्ट ब्रिटिश हवाईदलास कळविली व त्याचा पाय बदलण्याची व्यवस्था करण्यात आली. त्याच्या असामान्य धैर्याचा आणि कामगिरीचा गौरव करणारे हे एक खऱ्याखुऱ्या दाक्षिण्याचे उदाहरण आहे.

युद्धकैदी असतानाही बाडरने विलक्षण असे साहस दाखविले. तो पळून जाण्याचा सारखा प्रयत्न करी. विजयोत्सवामध्ये स्पिटफायर विमानदलाचे नेतृत्व त्याच्याकडे देण्यात आले होते.

बाडरच्या उदाहरणामुळे शेकडो अपंगांना स्फूर्ती मिळालेली आहे. त्याला आपण अतिशायितावादी आत्मसाफल्यसाधक असे म्हणणे योग्य होईल. याचे कारण असे की त्याने गंभीर स्वरूपाच्या अडचणींवर मात करून आपल्या क्षेत्रात असामान्य यश संपादन केले.

(२) विश्वेश्वरय्या : एक श्रेष्ठ आत्मसाफल्यसाधक

विश्वेश्वरय्या हे शतायुषी होते आणि भारत शासनाने 'भारतरत्न' हा सर्वोच्च किताब देऊन त्यांचा वहुमान केला. त्यांना सर्वार्थाने श्रेष्ठ आत्मसाफल्य-साधक म्हणणे योग्य होईल. आधुनिक भारतातील ते एक लोकांच्या कल्याणार्थ अहर्निश झटणारे साधुतुल्य पुरुष होते. राष्ट्राच्या सेवेत त्यांनी आपले दीर्घायुष्य खर्ची घातले.

तरुणपणी त्यांची प्रकृती नाजूक ठिसूळ होती. त्यांचे संस्कृत शिक्षक थट्टेने म्हणत की हा विश्वेश्वरय्या लवकरच खतम होईल. विश्वेश्वरय्यांना त्यांच्या दीर्घायुष्याचे रहस्य काय असा प्रश्न विचारण्यात आला तेव्हा ते म्हणाले, "खडतर परिश्रम, शिस्तबद्ध जीवन, बेताचा ऐषाराम, समाधानी आणि आनंदी वृत्ती."

ते एक प्रथम चतुरस्र इंजिनिअर होते. पुढे त्यांनी एक कल्पक व कार्यक्षम प्रशासक म्हणून लौकिक मिळविला. इंजिनिअर म्हणून अनेक कारणांकरिता त्यांनी नावलौकिक मिळविला होता. त्यांनी नवीन प्रकारची यंत्रे तयार केली, नवीन प्रकारच्या पाटबंधारे पद्धती सुरू केल्या व धरणाना स्वयंचलित द्वारे बसविली. म्हैसूर संस्थानचे दिवाण म्हणून काम करीत असताना त्यांनी त्या संस्थानाचा सर्व बाजूंनी विकास केला. त्यामुळे त्यांना आधुनिक म्हैसूरचे वास्तुशिल्पशास्त्रज्ञ म्हटले जाते. राष्ट्रीय आर्थिक नियोजनाच्या प्रथम पुरस्कर्त्यांमध्ये त्यांचा समावेश होतो. 'उत्पादन करा किंवा विनाश पावा!' हे घोषणावाक्य त्यांचेच.

विश्वेश्वरय्या यांना परिपूर्णतेची विलक्षण ओढ होती. सर्व काम पवित्र आहे अशी त्यांची भावना होती. ते म्हणत, "तुमचे काम रस्त्यातील एक चौक झाडण्याचे असले तरी आपला चौक जगातील सर्व चौकांमध्ये स्वच्छ असला पाहिजे असा तुमचा दृढ निर्धार असला पाहिजे." म्हैसूरचे दिवाण म्हणून राजीनामा दिल्यानंतर महाराजांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, "मी माझ्या मागे काहीच काम ठेवलेले नाही." त्यांना कामात गबाळेपणा मुळीच चालत नसे.

विश्वेश्वरय्या आपल्या वेळेचा उपयोग सर्वोत्कृष्ट रीतीने करण्याबद्दल फार दक्ष असत. त्यांनी एका अधिकाऱ्यास दुपारी ४ वाजून १५ मिनिटांनी भेटण्यास सांगितले होते. त्याने आपले भेटकार्ड ४ वाजून १० मिनिटांनी त्यांच्याकडे पाठविले. त्यावर ते त्याला म्हणाले, " तू माझी पाच मिनिटे वाया घालविलीस." आपले वेळेचे अंदाजपत्रक ते फारच काळजीपूर्वक तयार करीत. झोपेचेही त्यांनी अंदाजपत्रक तयार केले होते. निसर्गनियमाप्रमाणे पाच तास झोप, फारच उद्योगी माणसाकरिता सात आणि नऊ तास आळशाकरिता ! म्हैसूर राज्याचे दिवाण म्हणून त्यांची कामाची वेळ सकाळी ७ ते दुपारी १ व दुपारी ३ ते रात्रौ ८ अशी होती. रविवारी व सुटीच्या दिवशीही ते असेच काम करीत. ते दयाळू अंतःकरणाचे परंतु कडक शिस्तीचे प्रशासक होते.

वयाच्या ८७ व्या वर्षी १९४७ मध्ये दिल्ली येथील पहिल्याच औद्योगिक परिषदेचे ते अध्यक्ष होते. मुंबईमध्ये आदल्या दिवशी तयार केलेले आपले भाषण दुसरे दिवशी पहाटे चार वाजता उठून दिल्ली येथील हॉटेलमध्ये त्यांनी मुखोद्गत केले. सर्व बाबतीत आपण शंभर टक्के बिनचूक असले पाहिजे याबद्दल ते दक्ष असत. केवळ स्मृतीवर ते अवलंबून राहात नसत. सर्व तपशील, आकडेवारी ते नेहमीच पडताळून पाहात असत. त्यांचा पोषाखही असाच अत्यंत नीटनेटका असे आणि दिवसभर जरी ते कामात असले तरी कपड्यांवर एक धुळीचा कणही नसे.

आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते तत्त्वनिष्ठ होते. त्यांचे चारित्र्य निरपवाद होते. साहाय्यक इंजिनिअर म्हणून काम करीत असताना त्यांना खूप फिरती करावी लागे. मुक्कामातील आपल्या कार्यालयात सरकारी मेणबत्त्या शासकीय कामापुरत्याच ते वापरीत. ते काम संपताच आपल्या स्वतःच्या कामाकरिता आपल्या मेणबत्त्या वापरीत. म्हैसूर राज्याच्या दिवाणपदाचा राजीनामा दिल्यानंतर आपल्या खाजगी मोटारीतून ते घरी परतले. त्याकरिता आपली मोटार त्यांनी तयार ठेवली होती. नेमणुकी करताना किंवा पदोन्नती देताना पक्षपात त्यांनी कधीच केला नाही. कामातील गुणवत्ता हाच एक निकष त्यांना माहीत होता.

त्यांच्या जीवनात मानवी परिपूर्णतेचा प्रत्यय येतो. त्यांनी आत्मसाफल्य साधले होते.

□ □

अठरा

प्रेरणा–बाह्य सुखसोयी उपपत्ती

हरसबर्ग या मानसशास्त्रज्ञाची ही एक अत्यंत महत्त्वाची उपपत्ती आहे. मॅक्‌ग्रेग या व्यवस्थापन तत्त्ववेत्त्याने मांडलेल्या 'य' ह्या उपपत्तीसारखेच तिचे महत्त्व आहे. या पुस्तिकेत माणसांनी काम का केले पाहिजे याची अनेक कारणे सांगितली आहेत. माणसांनी काम करणे त्यांच्याच खऱ्या हिताचे आहे हा मुद्दा सर्वांत महत्त्वाचा आहे. चांगले अर्थपूर्ण काम नसेल तर माणूस पांगळा होतो. प्रेरणा—बाह्य सुखसोयी उपपत्ती याच गोष्टी अधिक तर्कशुद्ध व शास्त्रीय रीतीने मांडते.

प्रथम आपण एक साधेच उदाहरण घेऊ. समजा तुम्ही तुमच्या कार्यालयात एक अत्यंत महत्त्वाचा अहवाल तयार करीत आहात. परंतु तुमची खुर्ची ढेकणांनी भरलेली आहे आणि तुम्ही फार अस्वस्थ आहात. ही खुर्ची बदलल्यानंतर तुमची ही अस्वस्थता जाते.

परंतु तरीही तुम्ही अस्वस्थ आहात कारण कामाची प्रगती तुमच्या मनाप्रमाणे होत नाही. आपल्यापुढील समस्यांवर तुम्हांला जे जे तोडगे सुचतात त्यांच्या उपयुक्ततेबद्दल तुम्ही फार साशंक आहात आणि आपले विषयाचे विवरणही चांगले नाही, ही खंत तुमच्या मनाला लागून राहिली आहे.

खुर्चीत ठेकूण असल्यामुळे वाटणारी अस्वस्थता आणि आपले काम व्यवस्थित होत नाही म्हणून वाटणारी अस्वस्थता या गोष्टी अगदी भिन्न आहेत.

पहिली अस्वस्थता तुमच्या प्राणिसदृश गरजांशी निगडित आहे. जनावरांना-देखील भौतिक सुखसोयींची गरज भासते. परंतु जनावरे अहवाल कधीच तयार करीत नाहीत. अहवाल तयार करणे हा माणसाचा खास अधिकार आहे. ती एक माणसाची खास गरज आहे. गरजा दोन प्रकारच्या असतात : प्राणिसदृश व मानवी. हे गरजांचे वर्गीकरण हरसबर्गच्या उपपत्तीमध्ये मूलभूत महत्त्वाचे आहे. या उपपत्तीप्रमाणे व्यक्तीची मानसिक वाढ होत असते तेव्हाच ती खऱ्या अर्थाने निरोगी असते.

मानवी आणि प्राणिसदृश गरजा

माणसाला पुष्कळ गोष्टी लागतात. या गरजांचे वर म्हटल्याप्रमाणे प्राणि-सदृश आणि मानवी गरजा असे वर्गीकरण करता येते. प्राणिसदृश गरजा बाह्य परिस्थितीशी निगडित असतात आणि त्यांची माणसाप्रमाणे प्राण्यांनाही गरज भासते. मानवी गरजांचे उद्दिष्ट कामातून मानसिक विकास करणे हे आहे. या गरजांचा तपशील पुढील तक्त्यात दाखविला आहे :

प्राणिसदृश गरजा	मानवी गरजा
(१) संस्थेचे धोरण व व्यवस्थापन	(१) कार्यसिद्धी
(२) पर्यवेक्षण, देखरेख	(२) मान्यता
(३) व्यक्ती-व्यक्तीचे परस्पर संबंध	(३) प्रत्यक्ष काम
(४) कामाच्या सुखसोयी	(४) जबाबदारी
(५) वेतन	(५) प्रगती

प्राणिसदृश गरजा माणसाच्या प्राणिप्रवृत्तीशी निगडित आहेत. ह्या गरजा माणसाच्या प्राथमिक स्वरूपाच्या भावनांशी, उदाहरणार्थ क्षुधा, काम, भौतिक आराम, सुरक्षितता या गोष्टींशी निगडित आहेत. परंतु मानवाची सर्वांत महत्त्वाची गरज म्हणजे आपल्या शक्तीनुसार व परिस्थितीनुसार एक सर्जनशील व्यक्ती म्हणून आपला स्वतःचा मानसिक विकास करून घेणे ही आहे. माणूस आपल्या कामातूनच आपला जास्तीत जास्त मानसिक विकास

करून घेऊ शकतो. अशा रीतीने् अधिक अवघड अशा कामांची जबावदारी पेलण्यास तो पात्र होतो.

वरील उपपत्तीमध्ये ह्या गरजांचे वर्गीकरण स्पष्ट करण्याकरिता काही वाक्प्रयोगांचा विवक्षित प्रकारे उपयोग करण्यात आला आहे. ते पुढील तक्त्यावरून लक्षात येतील :

गरजेचा प्रकार	लक्षण	परिणाम	
		गरज न भागल्यास	गरज भागल्यास
प्राणिसदृश गरजा	बाह्य परिस्थितीतून निर्माण होणारा त्रास वाचविणे.	असमाधान	असमाधानाचा अभाव मानसिक आजाराचा अभाव.
मानवी गरजा	कामातून मानसिक वाढ.	आनंदाचा अभाव.	कामाचा आनंद. मानसिक आरोग्य.

या गरजांचे माणसावर होणारे परिणाम भिन्न स्वरूपाचे असतात. ऐकणे व पाहणे ह्या गोष्टी ज्याप्रमाणे भिन्न स्वरूपाच्या आहेत त्याप्रमाणे त्यांचे स्वरूप भिन्न आहे. असमाधानाचा अभाव म्हणजे कामातून मिळणारा आनंद नव्हे. मानसिक आजार नसणे म्हणजे मानसिक आरोग्य नव्हे. आराम खुर्चीत बसल्याने बरे वाटते परंतु अवघड काम केल्याने जो आनंद वाटतो तो अगदी निराळ्या स्वरूपाचा असतो.

हेच निराळ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे माणसाची सर्वांत महत्त्वाची गरज म्हणजे मानसिक विकास ही होय. हा विकास अर्थपूर्ण, आव्हानदायक, सर्जनशील कामातून होतो. आणि असा विकास जेव्हा होतो तेव्हाच खऱ्या अर्थाने माणूस आनंदी आणि निरोगी असतो.

मानसिक विकास

मानसिक विकासाचे पुढील टप्पे आहेत :

(१) ज्ञानात वाढ : माणूस आपल्या ज्ञानात भर घालू शकतो. अनुभवातूनही तो शिकत असतो. माणसाचे ज्ञान वाढत असले म्हणजे त्याचा माणूस म्हणून विकास होत असतो.

(२) **विविध घटकांचे संबंध जाणणे :** एखादी व्यक्ती अनेक गोष्टी तोंडपाठ करू शकेल, परंतु या माहितीचे महत्त्व तिला कळेलच असे नाही. उदाहरणार्थ, एखाद्या विद्यार्थ्यास ताळेबंदातील तपशील मुखोद्‌गत असेल, परंतु त्याला त्या संस्थेच्या आर्थिक परिस्थितीचे ज्ञान असेलच असे नाही. एखाद्याला 'हॅम्लेट' हे नाटक तोंडपाठ असेल, परंतु म्हणून त्या नाटकाचे मर्म त्याला कळेलच असे नाही. एका विद्यार्थ्यास मुलाखतीच्या वेळी एका नदीचे वय काय असे विचारले असताना त्याने सांगितले की ३,०००,०२१ वर्षे इतके. तेव्हा इतके काटेकोर गणिती उत्तर त्याने कसे दिले असे विचारले असताना त्याने खुलासा केला की एकवीस वर्षांपूर्वी एका तज्ज्ञाने ३,०००,००० वर्षे असा अंदाज केला होता ! या उदाहरणावरून हे स्पष्ट होते की त्या विद्यार्थ्यास जरी तपशील तोंडपाठ होता तरी त्या तपशिलाच्या मर्यादा, अर्थ या गोष्टी त्याला कळल्या नव्हत्या.

(३) **सर्जनशीलता :** जनावरे नवीन काही निर्माण करू शकत नाहीत. माणूस हे करू शकतो. माणूस नवीन कल्पना, नवीन संकल्पना आणि उपपत्ती मांडू शकतो. तो नवीन यंत्रे व नवीन प्रक्रिया यांचा शोध लावू शकतो. तो नवीन संस्था निर्माण करू शकतो. नवीन गोष्टी निर्माण करण्यामध्येच माणसाला परमोच्च आनंद होतो.

(४) **संदिग्धतेमध्ये निश्चितता :** मानवी जीवन गुंतागुंतीचे असून त्यामध्ये अनिश्चितता आहे. उदाहरणार्थ, उद्योगधंद्यांची परिस्थिती नजीकच्या भविष्यकाळातही कशी बदलेल हे निश्चितपणे कोणीच सांगू शकत नाही. ज्या व्यक्तीचा विकास झालेला आहे तीच व्यक्ती अनिश्चिततेला तोंड देऊ शकते व आपले निर्णय शांतपणे घेते. उच्च व्यवस्थापनामध्ये अस्पष्ट, बदलत्या व अनिश्चित परिस्थितीमध्ये काम करण्याची पात्रता अंगी असणे आवश्यक असते.

(५) **व्यक्तिविशेषांचे संवर्धन :** स्वतंत्रपणे विचार करणे हे मानसिक विकासाचे लक्षण आहे. अशी व्यक्ती प्रचारामुळे किंवा लोकांच्या दबावाने नमत नाही. उदाहरणार्थ, एखाद्या नाटकाची समीक्षकांनी भरमसाट स्तुती केली तरी आपल्याला ते नाटक आवडले नाही

तर तसे म्हणण्याचे धैर्य अंगी असले पाहिजे. प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वाचे काही ना काही वैशिष्ट्य असते आणि त्याची जोपासना केली पाहिजे.

(६) खरा विकास : याची व्याख्या करणे कठीण आहे. परंतु खरे काय आणि भ्रम कोणता हे व्यक्ती जाणू शकते. खऱ्या विकासाचे एक गमक म्हणजे खरोखर महत्त्वाचे काय आहे हे जाणणे. पुढील गोष्टीत हे फार सुरेख रीतीने सांगितले आहे :

"एका क्रोडोपतीने एका विवाह संस्थेच्या प्रमुखास भेटून आपण वधूच्या शोधात असल्याचे सांगितले. त्या प्रमुखाने मिस अमेरिका म्हणून लागोपाठ तीनदा निवडून आलेल्या सुंदरीची मुक्त कंठाने प्रशंसा केली. परंतु त्याचा त्या श्रीमंत तरुणावर काहीच परिणाम झाला नाही. तो नकारात्मक डोके हलवीत म्हणाला, 'मी स्वत: चांगलाच सुंदर आहे.' दलालाने नेहमीच्या चिकाटीने दुसऱ्या एका (लक्षावधी डॉलर्स हुंडा देऊ शकणाऱ्या) अत्यंत धनवान वधूची स्तुती केली. तो तरुण म्हणाला, 'मला पैशाची काय गरज ? मी स्वत:च गर्भश्रीमंत आहे.' त्यावर त्या दलालाने दुसरी एक फाईल बाहेर काढून एका बुद्धिमान तरुणीची माहिती सांगितली. एकविसाव्या वर्षी ती गणितातील अधिव्याख्याती झाली होती आणि आता चोविसाव्या वर्षी ती एम्.आय्.टी. या संस्थेत 'अवगम सिद्धांत' या विषयाची प्राध्यापिका होती. तो क्रोडोपती तुच्छतेने म्हणाला, 'मी स्वत: तैलबुद्धीचा आहे.' तेव्हा मात्र त्या दलालाने हताशपणे म्हटले, 'मग खरोखर देवाची शपथ तुम्हाला पाहिजे तरी काय ? ' त्यावर तो क्रोडोपती म्हणाला, चांगुलपणा '"

थोडक्यात असे म्हणता येईल की ही उपपत्ती आपले मानसिक आरोग्य मानसिक विकासावर कसे अवलंबून आहे आणि मानसिक विकास अर्थपूर्ण, जबाबदारीच्या, आव्हान देणाऱ्या व सर्जनशील कामावर कसे अवलंबून आहे हे स्पष्ट करते.

पुढील तक्त्यात मानसिक विकासास कोणत्या गोष्टी कारणीभूत होतात ते दाखविले आहे :

प्रेरणा घटक	विकासाचे तत्त्व
कार्यसिद्धी व कार्यसिद्धीबद्दल मान्यता	ज्ञान वाढविण्याची संधी.
जबाबदारी	आकलन वाढविण्याची संधी.
विकासाची संधी	सर्जनशीलतेची संधी.
प्रगती	निर्णय घेताना संदिग्धता अनुभवणे.
स्वारस्य	स्वतःचे व्यक्तिमत्त्व अबाधित राखणे व आपला विकास करून घेणे.

हरसबर्ग आपल्या उपपत्तीच्या आधारे कार्यालये व कारखान्यांतील कामाची पुनर्रचना करण्याचा आग्रह धरतो. माणसाच्या विकासास फार मोठा अवसर आहे आणि त्या दृष्टीने माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार व्हावा, त्याचा विकास व्हावा याकरिता कामाचे स्वरूप संपन्न केले पाहिजे.

कॉनरॅड लॉरेंझ या नोबेल पारितोषिक विजेत्या शास्त्रज्ञाने आपल्या 'सिव्हिलाइज्ड् मॅन्स एट डेड्ली सिन्स' या पुस्तकात आव्हानात्मक कामाच्या अभावी आयुष्य कसे असह्य होते हे दाखविले आहे. कर्ट हान या शिक्षणतज्ज्ञाने आयुष्याबद्दल अगदी उदास झालेल्या काही तरुणांना समुद्रकिनाऱ्यावर संरक्षण बोटीवर काम करण्याचे काम देऊन त्यांचे औदासीन्य दूर केले. स्वतःच्या डोक्यावर गोळी मारून आत्महत्या करण्याच्या प्रयत्नात अंध झालेल्या लोकांनी नंतर आत्महत्येचा कधीच प्रयत्न केला नाही असे व्हिएन्नामधील अंधांच्या एका शिक्षकाने म्हटले आहे. याच्या उलट पुढे त्यांचा समतोल मानसिक विकास होऊन ते सुखी झाले. कंटाळवाण्या आयुष्यातून आपली सुटका करण्याकरिता एका मुलीने खिडकीतून उडी मारून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नात पाठीस गंभीर दुखापत होऊन तिला अर्धांग झाला आणि कमरेखालचे तिचे अंग लुळे पडले. परंतु यानंतर तिचे जीवन सुखी समाधानी होते.

व्यक्ती जेव्हा काही विधायक आणि आव्हानात्मक कामामध्ये रममाण होते तेव्हाच तिच्या आयुष्याला काही अर्थ असतो, त्यामध्ये काही स्वारस्य असते. लॉरेंझने म्हटले आहे : "अंग मोडून काम न करता क्षणिक सुख मिळू शकेल, परंतु आनंद तसा मिळणार नाही."

मॉंटेग्यू नॉर्मन

या उपपत्तीच्या समर्थनासाठी मॉंटेग्यू नॉर्मन (१८७१–१९५०) याचे उदाहरण देणे योग्य होईल. तो १९२०–४४ या काळामध्ये बँक ऑफ इंग्लंडचा गव्हर्नर होता. या बँकेच्या सबंध इतिहासात या पदावर कोणतीच व्यक्ती इतकी वर्षे नव्हती. मॉंटेग्यू नॉर्मन तरुणपणी डोकेदुखी व मानसिक संभ्रमामुळे अगदी गळून गेलेला होता. कित्येक दिवस तो कोणाला भेटत नसे किंवा कोणाशी बोलत नसे. १९११ मध्ये तर तो मनोव्यथेने जर्जर झाला होता. दोन महिने तो अगदी निपचीत पडून होता. त्याला काहीही आठवत नव्हते. १९१३ मध्ये कार्ल यंग या विख्यात मानसशास्त्रज्ञाचा सल्ला घेण्यास त्याचे मन वळविण्यात आले. काही प्राथमिक चाचण्या केल्यानंतर यंगने त्याला काही महिने संपूर्ण विश्रांती घेण्याचा सल्ला दिला व नंतर त्याच्याकडून मनोविश्लेषणात्मक उपचार करून घेण्याचा सल्ला दिला. हे निदान ऐकून नॉर्मनचे मनोधैर्य अगदी खचून गेले. नॉर्मन हा कित्येक आठवडे काळोख्या खोलीत आपल्या गरगरणाऱ्या डोक्याची शुश्रूषा करीत असहाय स्थितीत पडलेला होता. त्याच्या डॉक्टरांना तो फार तर काही महिनेच अशा अवस्थेत जगेल असे वाटत होते. यानंतर त्याला डॉ. रॉजर व्हिटोझ या दुसऱ्या एका स्वित्झर्लंडमधील तंत्रिका विकारतज्ज्ञाचा सल्ला घेण्यास सुचविले. व्हिटोझने नॉर्मनला कामाचाच एकमेव ध्यास घेण्यास सांगितले. काम इतके कष्टाचे असले पाहिजे की इतर कशाचाच विचार करण्याची फुरसत मिळता कामा नये. हा सल्ला अगदी प्रभावी ठरला. नॉर्मनला मानसिक स्वास्थ्य मिळाले आणि नंतर बँक ऑफ इंग्लंडचा गव्हर्नर म्हणून चोवीस वर्षे तो आपल्या कामात दंग झालेला होता आणि त्याचे आयुष्य समाधानाचे गेले. या अभिजात घटनावृत्तावरून हरसबर्ग उपपत्ती ग्राह्य असल्याचे दिसते. शेवटी तात्पर्य असे की आपले आरोग्य व आपले सुख आपल्या कामावर अवलंबून असते.

□ □

एकोणीस

समारोप

माणसाचे काम हा विषय फार मोठा तसाच मनोज्ञ आहे. त्याचा विचार करावा तेवढा थोडाच. माणसाच्या आयुष्यातील काम ही एक सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे असे म्हणावे लागते. परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होते. त्याचप्रमाणे अनेक दृष्टींनी अपूर्ण असलेल्या माणसास कामामुळे पूर्णत्व येते.

टॉयन्बी हा इतिहासकार म्हणे : "आयुष्याच्या अखेरीपर्यंत काम करीत राहणे, परिश्रम करणे हे माणसाचे वैशिष्ट्य होय." बर्ट्रांड रसेलने अशाच अर्थाचे उद्‌गार काढले आहेत : "शहाणा माणूस आपण कामात मग्न असतानाच आपल्याला मृत्यू यावा अशी इच्छा करतो." लंडनमधील नॅशनल हार्ट हॉस्पिटलचे शस्त्रक्रिया संचालक डॉ. डोनाल्ड रॉस यांनी म्हटले आहे : "कामाच्या ओझ्यामुळे कोणाला मरण येत नाही. मरण येते ते काम नसल्यामुळे."

चांगले स्वारस्यपूर्ण भरपूर काम नसेल तर आपल्याला आयुष्यात खराखुरा आनंद मिळणारच नाही. त्याचप्रमाणे जर आपल्या कामावर खरीखुरी निष्ठा नसेल तर माणसाला मन:शांती अशी कधी लाभणार नाही. भारताचे

दारिद्र्य इतके सर्वव्यापी आहे की राष्ट्रीय दृष्टिकोनातून विचार करता आज सर्वांत तातडीची जरुरी आहे ती प्रत्येकाने आपले काम निष्ठेने आणि सुव्यवस्थितपणे करण्याची.

ही पुस्तिका छोटीच आहे आणि ती परिपूर्णही नाही. आपले प्राचीन प्रज्ञावंत ऋषिमुनी याज्ञवल्क्य यांच्या शब्दांत या पुस्तिकेचे सार थोडक्यात सांगता येईल. ते म्हणतात : " माणसाचे व्यक्तिमत्त्व म्हणजे तो करीत असलेल्या कार्यांची गोळाबेरीज होय. माणसाच्या मरणोत्तर हीच कार्ये मागे उरतात. चांगल्या कृत्यांमुळे माणूस पवित्र होतो तर वाईट कृत्यांमुळे तो पापी ठरतो."

□ □

संदर्भ ग्रंथ

Anderson Harold, H. (Ed.)—*Creativity and Its Cultivation.*

Argyle Michael—*The Social Psychology of Work.*

Awasthi, D.—*The Dawn of Modern Administration in India.*

Baritz, Loren—*The Servants of Power.*

Bendix, Reinhard—*Work and Authority in Industry.*

Birth Centenary Commemoration Volume (Dr. M. Visvesvaraya).

Blumberg, Paul—*Industrial Democracy : The Sociology of Participation.*

Book of the Year 1975 (Britannica).

Brian, Robert—*Friends and Lovers.*

Brooks, John (Ed.)—*The One and the Many.*

Brown, J.A.C.—*The Social Psychology of Industry.*

Bullock, Alan (Introduction)—*History of the Twentieth Century.*

Canning, John (Ed.)—*100 Great Modern Lives.*

Carver, Sir Michael—*The War Lords.*

Committee of Concerned Asians—*China : Inside the People's Republic.*

Constitution, The Forty-second Amendment Act, 1976.

Davis, E. Louis and Cherns, Albert B. (Ed.)—*The Quality of Working Life, Volumes I and II.*

Doig Desmond—*Mother Teresa.*

Dore, Ronald—*British Factory—Japanese Factory.*

Drucker, Peter—*Management, Task, Responsibilities and Practices.*

Drucker, Peter—*The Practice of Management.*

Feinberg Barry and Kasrils Ronald (Ed.)—*Dear Bertrand Russell.*

Fraser, Ronald (Ed.)—*Work, Volume II.*

Galbraith, J. K.—*The New Industrial State.*

Gay, Peter—*The Enlightenment.*

Ghiselin, Brewster—*The Creative Process.*

Herzberg, F.—*Work and the Nature of Man.*

Holt, John—*Freedom and Beyond.*

Huizinga, Johan—*Homo Ludens.*

Huxley, Julian and H.B.D. Kettlewell—*Charles Darwin and His World.*

Kerr, Clark; Dunlop, John T.; Harbison, Frederick H.; Myers, Charles A.—*Industrialism and Industrial Man.*

Lederer, Muriel—*The Guide to Career Education.*

Leger, Fernand—*The Documents of Twentieth Century Art.*

Lewis W. Arthur—*Theory of Economic Growth.*

Lorenz, Konrad—*Civilized Man's Eight Deadly Sins.*

Lorenz, Konrad—*On Aggression.*

Magee, Bryan (Ed.)—*Modern British Philosophy.*

Malcolm, Norman—*Ludwig Wittgenstein.*

Maraini Fosco—*Japan—Patterns of Continuity.*

Maslow, Abraham H.—*Eupsychian Management.*

McClelland, David C. and Winter, David G.—*Motivating Economic Achievement.*

McClelland, David C.—*The Achieving Society.*

McGregor, Douglas—*The Human Side of Enterprise.*

Mehta, Ved—*Fly and the Fly-bottle.*

Mikes, George—*The Land of the Rising Yen.*

Ross, Donald—*The Times of India, December 30, 1976 (Interview).*

Rowland, Jon—*Community Decay.*

Russell, Bertrand—*In Praise of Idleness.*

Russell, Bertrand—*New Hopes for a Changing World.*

Russell, Bertrand—*Portraits from Memory.*

Rustomji, Nari—*Enchanted Frontiers.*

Schumacher, E. F.—*Small is Beautiful.*

Scitovsky, Tibor—*The Joyless Economy.*

Setalvad, Motilal C.—*My Life.*

Toynbee, Arnold J.—*Experiences.*

Tulpule, Bagaram—*My Experiences at the Durgapur Steel Works—A Public Sector Undertaking—Sadhana (Marathi) Special Issue, 1 May 1977.*

Verney, Richard E. (Ed.)—*The Student Life* (The Philosophy of Sir William Osler).

Vernon, P. E. (Ed.)—*Creativity.*

Voltaire—*Candide.*

Whitefield, P. R.—*Creativity in Industry.*

Whitehead, A. N.—*The Aims of Education.*

Williams Francis—*A Pattern of Rulers.*

Wilson Harold—*The Governance of Britain.*

Worsley, Peter (Ed.)—*Introducing Sociology.*

Zaehner, R.C.—*Concordant Discord.*

Zweig, F.—*The Quest for Fellowship.*

□ □

Printed at Prabhat Offset Press, 2841, Kucha Chellan, Darya Ganj New Delhi-110 002.